**प्रकरण ३**

# मध्ययुगीन भारतीय समाज, धर्म आणि अर्थव्यवस्था

## मध्ययुगीन काळातील समाज रचना

### प्रस्तावना

समाज हा व्यक्तीच्या परस्परसंवादाद्वारे एकत्र आलेला सर्वात मोठा घटक आहे. व्यक्ती सामाजिक संस्थेत परस्परसंवादाची देवाणघेवाण करतो सर्व व्यक्ती, त्यांचे गट आणि संबंध याद्वारे समाजाचे संपूर्ण चित्र उदयास येते. या परस्परसंवादाने कुटुंब, कुळ, जमात, राष्ट्र इत्यादी वेगवेगळ्या रूपांमध्ये समाज स्फटिकासारखा प्रतिबिंबित होतो. प्रत्येक समाजाची संरचना स्वतंत्र असून आणि त्यामध्ये सातत्य असते. सामाजिक व्यवस्था ही सामाजिक जीवनाची मूलभूत गरज आहे. समाजीक रीतिरिवाज, कायदे, भिन्न रूढी आणि आचरणाचे नियम आणि या आचारसंहितेचे नियंत्रित करणारी शासन प्रणाली असते. मध्ययुगीन काळात भारतीय समाजाच्या सामाजिक रचनेत विभिन्नता जास्त होती. या कालावधीत अनेक राज्ये आणि साम्राज्य याचा उदय आणि अस्त झाला. मध्ययुगीन इतिहासावर प्रभुत्व असलेल्या दिल्ली सल्तनत, विजयनगर आणि बहामनी साम्राज्य व मराठी स्वराज्याच्या उदययांच्या विश्लेषणात्मक अभ्यासावर अनेक इतिहासकारांनी विशेष जोर दिला आहे जरी विविध शक्तींनी देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचे नियमन केले असले तरी भारतीय सांस्कृतिक सल्लाम्नता टिकून राहिली याचा तुलनात्मकदृष्ट्या कमी अभ्यास केला गेला.

### मध्ययुगीन काळातील सामाजिक रचना

इतिहास म्हणजे केवळ राजांचा, त्यांनी केलेल्या विविध लढाया आणि त्यानंतरच्या शांततेच्या तहातील तरतूदीचा अभ्यास नव्हे, त्याचबरोबर सामाजिक संरचना, आर्थिक जीवन, व्यापार आणि वाणिज्य यांचा विस्तृत अभ्यास होय. इतिहासाचा सामाजिक- आर्थिक दृष्टीकोनटतून केलेला अभ्यास एखाद्या विशिष्ट कालावधीतील समाजाच्या सपूर्ण चित्र स्पष्ट करू शकते. याठिकाणी मध्ययुगीन भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यासाबरोबर (ई.स. १२०० ते. ई.स. १७००), मध्ययुगीन काळाची सामाजिक स्वना, मध्ययुगीन समाजातील विविध वर्ग, जातीव्यवस्थेचे स्वरूप, हे जाणून घेणे आवश्यक आहे. समाजात

महिलांचे स्थान आणि गुलामगिरी यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. मध्ययुगीन कालखंडात मुसलमान समाज तुर्की, आपहागन अरब मुघल तर्तर अश्याविविध लोकांनी आणि भारतातील धर्मांतरित मुसलमानांनी बनलेला होता. परकीय मुसाल्मानामध्ये तुरानी आणि इराणी असे दोन प्रकार होते. तुरानी लोकांचा मुळ देश पश्चिम ख्वारीझाम, दक्षिण ओखसस नदी आणि बादक्षन यांच्या मध्ये होता. बर्नियरच्यामते, मुघल काळातील अतिमहत्वाची पदे इराणी लोकांच्या ताब्यात होती. तुरानी सुस्वभ्वी सुन, परोपकारी अंड निर्भावी होते. भारतीय मुसालमानामध्ये स्थाईक परकीय मुसलमान अंड धर्मातरित मुसलमान असे दोन प्रकार होते. माद्यायुगीण समाज रचनेत सत्ताधारी वर्ग, श्रीमंत वर्ग कारागीर वर्ग, शेतकरी वर्ग व गुलाम वर्ग असे स्थूल वर्गीकरण होते.

### शहरी समाज

मध्ययुगीन काळातील सामाजिक आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन सर्वसाधारणपणे ग्रामीण केंद्रित होते. परंतु काही शहरे राजकीय सत्ता केंद्रे होती. सुभेदारासारख्या महत्वाच्या अधिकाऱ्याचे मुख्यालय, जागीरदाराचे निवसस्तान आणि मनसबदारांचे कामांचे ठिकाणी प्रामुख्यानी शहरे होती. पश्चिम किनारपट्टीवरील व्यापारी केंद्रे आणि बंदर शहरे आणि तीर्थक्षेत्र ही मोठ्या लोकसंख्येची ठिकाणे होती. मध्ययुगीन काळात परकीय व स्थानिक व्यापार वाढीमुळे बरीच शहरे व शहरे भरभराट आली परंतु असंख्य गावे मात्र स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेची राहिली.

साम्राज्याची सर्वात महत्वाची शहरे उत्तर भारतात होती आणि त्यापैकी काही दिल्ली, आग्रा, फतेहपूर, सिक्री, अजमेर, मुलतान, बनारस, जौनपुस, अलाहाबाद, पटना, हूगली, डाक्का आणि चिताँग ही होती. ही शहरे खूप समृद्ध असून श्रीमंत व्यापारी आणि राजघराणी या शहरांमध्ये राहत होती. या शहरामधील कारागीर वर्ग आर्थिकदृष्ट्या चांगला होता.

दक्षिणेतील अहमदनगर आणि विजापूर या राजधान्याची शहरे वैभवशाली व समृद्ध होती विजयनगर साम्राज्याचा हास झाला त्यावेळी घट झाली होती परंतु काही शहरे समृद्ध होती. मध्य भारतातील उज्जैन आणि बुरहानपुर आणि पश्चिम भारतात अहमदाबाद ही अतिशय संपन्न शहर होती. अबुल फजलच्या म्हणण्यानुसार अहमदाबाद हे 'समृद्धीचे उच्च शहर होते.' याशिवाय काही पश्चिम किनारपट्टीवर महत्वाची शहरी केंद्रे म्हणून उदयास येल होती. राजधानीच्या शहरामध्ये कारागीर, कलाकार आणि श्रीमंत व्यापारी आणि खानदानी लोकांची संख्या भरपूर होती. व्यापार केंद्रांमधील लोकसंख्या वैविध्यपूर्ण होती. सुरत येथे स्थानिक नौदल लोकांचे हबशी व्यापारी आणि खलाशी यांच्याशी चागले संबंध होते. राजकीय महत्त्व असलेल्या निजामशाही आणि आदिलशाही अधिपत्य खालील शहरामध्ये हिंदू जागीरदारांचा राजकीय प्रभाव असे.

**ग्रामीण समाज**

सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा केंद्रबिंदू खेडी होती. खेडी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असल्याने शासनसत्ता बदलली तरी त्याचा खेड्याच्या सामाजरचनेवर, जीवन पद्धतीवर व अर्थरचनेवर काडीचाही परिणाम झाला नाही. खेड्याची स्वयंपूर्ण रचना मुघल कालखडाच्या अस्तापर्यंत सातत्याने टिकून राहिली. सरकारी अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली खेड्यातील समुदायांना त्यांची स्वतःची कामे करण्याची परवानगी होती. भारताच्या ग्रामीण भागात, खेड्यांची स्वयंपूर्ण आर्थिक संरचना टिकून राहिली, परंतु खेड्यांतील लोकांशी अकबरच्या चांगल्या धोरणामुळे आणि आसपासच्या ठिकाणी व्यापार वाढल्यामुळे विकासाची चिन्हे दिसू लागली. दक्षिण भारतातहि खेड्यातील प्रस्थापित आर्थिक संरचना चालूच राहिली आणि जवळपासच्या मंदिरांमध्ये त्यांची भरभराट झाली. हिंदू समजामध्ये लोहार, सोनार, सुतार, विणकर, कुंभार इ. कारागीर, पहारेकरी, शेतमजूर, वेठबिगार, गुलाम इ. कामकरी लीकांचा समावेश होता. पटेल, पाटील, मुखिया, मुकादम पटवारी इ. नावाने ओळखला जाणारा गावाचा प्रमुख होता. वतनदार, बलुतेदार, मिरासदार यांचा समावेस असलेला पाटील प्रमुख होता. गावचा लेखापाल जमिनीची नोंद ठेवी व महसूल खाते पाही. देशाच्या वेगवेगळ्या भागांत, जसे की पटवारी, शानबाग, मेनन इत्यादी वेगवेगळ्या नावाने त्यांची ओळख होती.

**ग्रामीण समाजात शेतकरी, छोटे व्यावसाईक आणि सामान्यमजूर वर्ग**

**अ. शेतकरी -**

प्राचीन काळापासून शेती हे उत्पन्नाचे मुख्य स्रोत राहिले आहे. म्हणूनच गावची लोकसंख्या मुख्यत्वे शेती व्यवस्थेशी बनलेली होती. शेतकरी वर्गाची स्थिती जेमतेम गुजराण करता येईल इतकी साधारण होती. आपत्तीकाळात आणि दुष्काळात शेतकऱ्यांच्या हालांना सीमा नसे.

**ब. कारागीर व छोटे व्यावसाईक -**

या वर्गात सुतार, कुंभार लोहार, विणकर, सोनार, तेली, न्हावी इ. समावेश होता. ते गावच्या लोकांच्या स्थानिक गरजा भागवण्यासाठी काम करत.

**क. कनिष्ठ वर्ग-**

हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरात शुद्र आणि अतीशुद्र -बहिष्क्रीत हलकी कामे करणारे अस्पृशांचा वर्ग होता. त्यांची स्तिती अत्यंत शोचनीय होती. त्यांच्या सावलीचाहि विटाळ मनाला जात होता. समाजात त्यांचा तिरस्कार केला जाई.

अशाप्रकारे खेड्यांमधील समाज स्वयंपूर्ण, एकांगी आणि बदल न स्वीकारणारा झाल्याने तो स्वाभाविकच स्वार्थी आणि संकुचित वृत्तीचे बनला होता, हा समाज अज्ञानी आणि अधश्रद्धाळू होता. म्हणून त्यांची फारच कमी प्रगती झाली.

ग्रामीण भागातील पारंपारिक व्यवसाय आणि शेती हे गुजराणीचे मुख्य साधन होते. शहरी लोकसंख्येमध्ये व्यापार आणि लष्करी सक्तीच्या आवश्यकतेनुसार पारंपारिक व्यवसाय बदलत होते. खेड्यापाड्यात जातीपंचायत व ग्रामपंचायती कार्यरत होत्या. शहरे आणि वेगवेगळ्या देशातील माणसे एकत्र येत असल्याने लोकसंख्या एकसमान नव्हती. व्यापारी श्रेणी आणि सरकारी नियम अधिक महत्वाचे होते. शहरी लोकांची प्रगती कायदा व सुव्यवस्थेच्या राज्यावर अवलंबून होती. शहरी लोकांना जमीन ताब्यात घेण्यापेक्षा आणि लागवडीपेक्षा व्यापार आणि आर्थिक व्यवहार महत्त्वाचे होते.

## मध्ययुगीन समाजातील वर्ग संरचना

आधुनिक काळात वर्ग एखाद्या व्यक्तीची किवा एखाद्या व्यक्तीच्या गटाची आर्थिक स्थिती दर्शवितो. मध्ययुगीन भारतातील सर्वसाधारणपणे समाज म्हणजे राजा, खानदानी मनसबदार, मध्यमवर्गीय आणि जनता होती. समाजव्यवस्थेच्या वरच्या स्तरात सम्राट आणि राजवंशाशी संबधित लोक असून चैन व उधळपट्टीचे जीवन जगत. मध्यभागी 'छोटा व काटकसरी' हा मध्यम वर्ग ज्यामध्ये लहान व्यापारी, कर्मचारी, कनिष्ठ कामगार, कलाकार इत्यादींचा समावेश होता. सर्वात खालच्या स्तरात या गावातील बहुसंख्य गरीब शेतकरी व कारागीर होते.

## सम्राट

इस्लामिक राजकीय सिद्धांत दिल्लीच्या सल्तनत स्थापनेच्या फार पूर्वीपासून हळूहळू विकसित झाला होता आणि काळाच्या ओघात त्याच्यात अमुलाग्र मुलभूत बदल झाले. पारंपारिक इस्लामिक सिद्धांतानुसार, सुलतान सामान्यतः इस्लामिक कायदा अंमलात आणणारा प्रमुख दावेदार होता. त्याच्याद्वारे स्थापित केलेल्या राजकीय सस्था नेहमीच कट्टर धार्मिक इस्लामिक तत्त्वांचे पालन करीत नसत. भारतीय परंपरा आणि चालीरीतींचा मध्ययुगीन राजसिद्धांताचा खोलवर परिणाम झाला होता. सुलतानाची खरी शक्ती किंवा दुर्बलता सुलतानाच्या व्यक्तिमत्त्वावर आणि चारित्र्यावर अवलंबून होती.

## मुगल सरदार वर्ग

मुघल राज्यकर्त्यांनी राजपूत राजवटीतील अनेक पटक बदल न करता किवा ते एकत्रित स्वीकारले. सम्राट हा सर्वोच्च शासक म्हणून सामाज व्यवस्थेचा प्रमुख होता. मुघल काळात सम्राट साम्राज्यातील सर्वोच्च अधिकारी होता. मुघल सम्राट सार्वभौम, निरंकुश व स्वछाचारी राज्यकर्ता होता. मुघल राजपदाच्या सिद्धांताचा पूर्ण विकास अकबराच्या काळात झाला. राजकारणातील उलेमा वर्गाचे धार्मिक वर्चस्व बाजूला सारून राजापादाविषयी आपल्या स्वताच्य कल्पना प्रस्तापित केल्या. धर्मनिरपेक्षता, राजामध्ये ईबरी अंशाचे प्रकटीकरण यावर अकबराच्या राजपदाच्या संकल्पना आधारित होत्या. अकबराच्या संकल्पनेत राजाचे निरंकुश सार्वभौमत्व आणि लोककल्याणाची आस्था हे गुणधर्म आढळतात. मुघल सम्राटानी राजकीय सिद्धांतापेक्षा आपल्या दर्जा आणि सत्तेचा अतिरिक्त वापर केला. संपूर्ण देशावर मालकी हक्क आत्मसात करत देशाचे प्रभुत्व व सार्वभौमत्व आपल्या हाती घेतले. तसेच राजघराण्यातील सदस्य, त्याचे रक्ताचे नातेसंबंध, त्यांचे मित्र आणि राजाच्या मर्जीतील व्यक्ती यांना हाताशी धरून समाजात विशेषाधिकार प्राप्त केला.

## उलेमा वर्ग

सुलतानशाहीतील समाजात उलेमाचे स्थान उच्च होते. धार्मिक सिद्धांतानुसार उलेमा वर्गाला सुलतानापेक्षा अधिक महत्व होते. सुलतानाची व्यक्तिगत योग्यता, उलेमा वर्गाबद्दल सुलतानाचा असलेला दृष्टीकोन आणि उलेमांच्या अंगातील गुण या सर्वांचा मुसलमान समाजावर प्रभाव पडत होता. समाजातील कोणतेही कार्य उलेमांच्या सल्ल्याशिवाय

किंवा मार्गदर्शनाशिवाय होत नसे. सुलतानशाहीत उलेमा बहुतेक तुर्क असून काझी, मुफ्ती, सदर, शेख-उल इस्लाम था पदावर त्यांची योग्यतेनुसार नियुक्ती करण्यात येई धर्मकार्य आणि न्यायदानात उलेमांचा शब्द अंतिम होता. सुलतानशाहीच्या सुरवातीच्या काळात गुलामधराण्यातील सुलतान इस्लाम धर्माच्या व कुरणाच्या आज्ञानुसार वागणारे असल्यामुळे उलेमा वर्गाची शक्ती वाढल्याने राज्यकारभारात त्यांचा अतिशय प्रभाव पडला. सुरवातीच्या काळात या वर्गाने सुलतानाला राज्यकारभारात मार्गदर्शन करून सुलतानाच्या पाठीशी इस्लामची मोठी शक्ती निर्माण केली, उत्तरोत्तर उलेमावार्गाचा हस्तक्षेप वाढत गेल्याने सुलतानाला त्यांच्या पाठींब्याशिवाय आपली पदावर टिकून राहणे अवघड झाले. सर्वप्रथम बल्बनाने उलेमा वर्गाचा राज्यकारभारातील हस्तक्षेप बंद केला. त्याने सुलतानाला ईश्वराचा प्रतिनिधी ठरवून त्याला निरंकुश व स्वचाचारी बनवले.

**मनसबदार**

वरील दोन विशेषाधिकारप्राप्त वर्गाच्या नंतर समाजात मध्यम वर्ग अस्तित्वात होता. या वर्गाकडे कमी जमीन असे. विविध सेवांमधून किंवा प्रशासनातील निम्न पदाच्या कामावरुन यांना पुरेसे उत्पन्न मिळे. मुस्लिम समाज सत्ताधारी असल्याने हिंदू समाजातीला मध्यम वर्गीय लोकांपेक्षा मुस्लीम समाजातील मध्यमवर्गाला उच्च वर्गात म्हणजेच कुलीन वर्गात जाण्याची संधी मिळत असे. मुघलकाळात मध्यमवर्गीयात कनिष्ठ मनसबदार, नागरी सेवक, न्यायिक अधिकारी, जमीनदार, व्यापारी, व्यावसायिक, पुजारी, उच्चशिक्षित लोक आणि कलाकार यांचा समावेश होता. जमीन ताब्यात असणे समाजात प्रतिष्टचे होते.

**मध्यम वर्ग**

हिंदूमध्ये सामाजिक ध्रुवीकरण हे वंशपरंपरागत जात व्यावास्तेवर आधारित होते, परिणामी केवळ समृद्ध आणि प्रभावशाली हिंदूच मध्यमवर्गाचा असे. मुस्लिमसमाजात जन्म व वांशिकतेच्या आधारावर सामाजिक दर्जा निश्चित होत होता. सर्वसाधारणपणे मध्यमवर्ग बऱ्यापैकी जीवन व्यतीत होता, उत्पन कमी असल्याने त्याची जीवनशैली उच्च किया विलासी नव्हती. पण कनिष्ठ मनसबदार मोठ्या मनसबदारांच्या चैन विलासी जीवनपद्धतीचे अनुकरण करीत असत. त्यांचा वेळप्रसंगी दिखाऊपाणासाठी कर्ज घेण्यास अजिबात संकोच नसे. आपली स्थिती टिकवून ठेवण्यासाठी भ्रष्टाचार आणि खंडणी यासारख्या सर्व गैरप्रकारांचा अवलंब करीत. व्यापारी आणि सावकार बहुतेक हिंदू होते, ते आपली संपत्ती लपवून ठेवत. भ्रष्टाचारी आणि बेईमान नोकरवर्गकडून शोषण टाळण्यासाठी हा वर्ग श्रीमंत नसण्याचा अविर्भाव आणत.

**सर्वसामान्य जनसमुदाय**

मुघल काळात भारतीय लोकसंख्येपैकी दहा ते पंधरा टक्के शाही आणि मध्यमवर्गीय होते. बाकीची सर्व जनता किवा वर्ग कनिष्ठ मानला जात होता. शेतकरी, कारागीर, छोटे व्यापारी, दुकानदार, घरकामगार, गुलाम इ. हलाखीचे आणि दुर्लक्षित जीवन जगत होता. उदार निर्वाहासाठी हा वर्ग शेतीवरच अवलंबून होता. अलाउद्दीन खिलजीच्या काळात अतिरिक्त कर म्हणजे उत्पनाच्या ५०% हिस्सा कर म्हाणून आकारला जात असे. लोकांना दोन वेळेचे जेवण घेणे दुरापास्त झाले होते. सर्वसाधारण लोकांचे जीवनमान अतिशय निकृष्ट होते आणि त्यांच्या गरजा खूपच कमी होत्या. अकबरच्या काळात शेतकऱ्याऱ्यांची परीस्थिती वाईट नव्हती. अधिकारी व सरकारनेही त्याच्या कल्याणाचा विचार केला. परंतु भ्रष्ट अधिकाऱ्यामुळे परिस्थिती अत्यंत वाईट बनली होती.

**भक्ती चळवळ**

**प्रस्तावना**

मध्ययुगीन कालखंडात भक्ति चळवळीचा झालेला उदय ही तत्कालीन भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना मानली जाते. तत्कालीन भारतीय समाजात प्रचलित चुकीच्या रूढी परंपरा विरुद्ध जागृती निर्माण करणे तसेच परकीय सत्तेला विरोध करण्यासाठी भारतीय समाजात जागृती निर्माण करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता. प्रस्तुत प्रकरणात आपण भक्ती चळवळ, या चळवळीचा उगम, या चळवळीच्या उदयाची कारणे तसेच या चळवळीतील संतांची कामगिरी व चळवळीचा प्रभाव आदींची माहिती पाहणार आहोत.

**भक्ती चळवळीचा उगम**

भारतात प्राचीन कालखंडात भक्ती चळवळ उदयाला आली होती. सर आर.जी. भंडारकर यांच्यामतेः उपनिषधे म्हणजे भक्तीमार्गाचे प्रवेशद्वार आहे. महाभारत काळापासून शिवपंथात शिवाची पूजा सुरू झाली. डॉ. सत्येंद्र यांच्यामतेः प्रागैतिहासीक काळापासून भक्ती चळवळीचा प्रारंभ झालेला दिसतो. प्रारंभी भक्ती परंपरेचा दक्षिण भारतात उदय झाला. आलवार आणि नायनार या संतानी लोकांच्यात भक्ती भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्रा. कृष्णास्वामी यांच्यामते, "आलवार संघाचा काळ हा प्राचीन कालखंडापासून तामिळी प्रदेशात होता. भक्ती चळवळ द्रविड प्रदेशात जन्माला आली. भक्ती चळवळ कर्नाटकात विकसित झाली. महाराष्ट्रात पसरली आणि गुजरातमध्ये जाऊन म्हातारी झाली."

भक्ती चळवळीच्या उदयाची कारणे

**ईश्वराचा आश्रमः** मुस्लीम सत्तेने मुस्लीमोत्तर लोकांच्यावर अनेक अत्याचार केले. यातून मुक्ती मिळवण्यासाठी परमेश्वराला शरण जावे. या हेतूने ईश्वराच्या आश्रयाला लोक गेले. त्यातून भक्ती चळवळीचा उदय झाला.

**हिंदूवरील अत्याचारः** मुसलमानी राजवटीत हिंदूवर राजकीय, आर्थिक, धार्मिक अत्याचार होत होता. उदा. हिंदूना सरकारी नोकरीत प्राधान्य नव्हते. शेतकरयाकडून प्रचंड शेतसारा घेतला जात असे. अनेक सामाजिक बंधने लादली होती. हे संकट नष्ट व्हावे म्हणून भावनिक दृष्टीकोनातून परमेश्वराची पूजा लोक करुन लागले. यातून भक्ती चळवळीचा उदय झाला.

**हिंदू धर्मातील जटील कर्मकाठः** भारतात बाह्मण कालखंडापासून हिंदू धर्मामध्ये अनेक स्वरूपाचे कर्मकांड निर्माण झाले. त्यामध्ये यज्ञाविधी, पुजापाठ इ. कर्मकांड निर्माण झाले. यातून मुक्ती मिळवण्यासाठी सरळ साध्या पद्धतीने धर्माचा प्रसार केला गेला. त्यामुळे भवती चळवळीचा उदय झाला.

**हिंदू समाजातील जातीय व्यवस्थाः** प्राचीन कालखंडात वर्णव्यवस्था होती. वर्ण व्यवस्थेचे विभाजन जाती-उपजातीमध्ये झाले. ऋग्वेद, ब्राह्मण, सुत्र, महाकाव्य, पुराण या वेगवेगळ्या काळात जातीव्यवस्था भक्कम उभ्या राहिल्य, जातीप्रथेमध्ये शीतीलता निर्माण करण्याचा प्रयत्नातून भक्ती चळवळीचा उगम झाला.

**हिंदू-मुसलमान याच्यात ऐक्यः** मध्ययुगीन काळात इस्लामांचे किंवा मुसलमानांचे भारतावर आक्रमण होऊन, त्यांची राजकीय सत्ता स्थापना झाली. त्यांची रूढी, परपंरा आणि संस्कृती आणि भारतातील संस्कृती यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. यातूनच ऐकमेकांच्यात देवदेवताबद्दल आकर्षण निर्माण झाल्याने भक्ती चळवळीचा उदय झाला.

**ईस्लाम धर्माचा वाढता प्रभावः** मुसलमानाची सत्ता स्थापना झाल्यानंतर, त्यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न करत असताना, त्यांनी धर्मात्तराला प्रोत्साहन दिले. जे धर्मात्तर करतील त्यांना जहागीरया दिल्या.

त्याच्यावरचे कर कमी केले. तर काही प्रसंगी सर्वांना सक्तीने मुसलमान बनविण्यात आले. इस्लामी धर्माच्या आक्रमणापासून आपल्या धर्माचे संरक्षण आणि प्रसार करावा या उद्देशाने भक्ती चळवळ सुरू झाली.

**सुफी पंथाचा प्रभाव:** इस्लाम धर्माचा पुरस्कार करणारे लोक कट्टर धर्माभिमानी होते. याच मुसलमानांनी सुफी संप्रदाय निर्माण करून लोकांना प्रेम, सहिष्णूता, माणुसकी, दुसरयाबद्दल आदर व दुसऱ्यांना मदत करणे इ. संदेश लोकांना दिला. त्यामुळे भक्ती चळवळीचा उदय झाला.

**उपेक्षीतांसाठी कार्य:** भक्ती चळवळीने प्रामुख्याने अपेक्षित समाजाला आचार देण्याचे काम केले. त्यांच्यात ईश्वर भक्ती, प्रेम निर्माण केले. त्यामुळे अनेक जाती - जमातीतून संत निर्माण झाले. या संतांच्या प्रयत्नातून भवती चळवळ उदयास आली.

**हिंदू धर्म व समाज यांची दुरावस्था:** शंकराचार्याच्या प्रयत्नाने हिंदू धर्माचे पुर्नजीवन होऊन ब्राह्मणाचे वर्चस्व व महत्त्व वाढले व कर्मकांडास महत्त्व प्राप्त झाले. त्याच्या काही लोकांनी आवाज उठवला. पण त्यांनी लोकांना परमेश्वराचे महत्त्व पटवून दिले. त्यातूनच भवती चळवळीचा उदय झाला.

**मुस्लीम राजवटीची स्थापना:** मुस्लीम राजवटीची स्थापना होऊन भारताची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती धोक्यात आली. काही लोक मुस्लीम धर्म स्वीकारत होते. त्यांना आळा घालण्यासाठी व हिंदू धर्मीचे संरक्षण करण्यासाठीच भक्ती मार्गाच्या चळवळीस चालना मिळाली.

**हिंदू तत्त्वज्ञानाचे वितरण व सामान्य जनता:** शंकराचार्याचा अदवैतवादाचा सिद्धांत व त्यासंबंधीची तात्विक चर्चा व युक्तीवाद सर्व सामान्य हिंदू जनतेच्या आकलना बाहेरचा होता. त्यामुळे त्यांनी वितरणाऐवजी सोपी व तात्विक चर्चा हवी होती. की ज्यामध्ये त्यांना सहज सहभागी होता येईल. ही गरज भक्ती मार्गाने पूर्ण केली.

**भक्ती चळवळीची वैशिष्ट्ये / कामगिरी**

भक्ती चळवळीमध्ये अनेक संतांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. त्यांनी भक्ती चळवळीतून समतेचा मार्ग दाखवला. त्याची वैशिष्ट्ये किंवा संताचे कार्ये पुढील प्रमाणे -

**सामाजिक समतेचा मार्ग दाखवला:** दक्षिण भारतामध्ये भक्ती चळवळीला प्रारंभ झाला. अलवार व नयनार असे दोन पंथ चळवळीत होते. या दोन्ही पंथानी सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परिणामी समाजातील काही प्रमाणात जाती विषमता कमी होऊन समतेचा मार्ग निर्माण झाला.

**धार्मिक कर्मकांडाला विरोध केला:** हिंदू समाजात यज्ञ विधी, देवदेवतांची पूजा, नवस इ. स्वरूपात कर्मकांड होते. यांच्या माध्यमातून ईश्वर प्राप्ती होणार नाही. असा संदेश संतांनी दिला. परमेश्वर हा केवळ तुमच्या प्रेमाचा भुकेलेला आहे हे सांगून त्यांनी कर्मकांठाला विरोध केला.

**संतांनी एकेश्वरवादाचा मार्ग सांगितला:** प्राचीन कालापासून हिंदू समाजात अनेक देवातांची निर्मिती झाली होती. मानवाने आपल्या भक्तीच्या व श्रेद्धेच्या जोरावर वेगवेगळ्या देवतांची पूजा करण्यास सुरूवात केली होती. परंतु परमेश्वर एक आहे. त्यांची रूपे अनेक आहेत हा संदेश संतांनी लोकांना समजावून देऊन एकेश्वरवादाचा प्रसार केला.

**लोकभाषेचा उपयोग:** भक्ती चळवळीच्या उगमापर्यंत जे साहित्य होते ते संस्कृत भाषेत होते. त्यामुळे सामान्य लोकांना ती भाषा कळत नव्हती. संतांनी आपला भक्ती मार्ग सर्वांना कळावा, सामान्य जनतेपर्यंत त्याचा प्रसार व्हावा, यासाठी लोकभाषेत सहित्याची निर्मिती केली. त्यामुळे अभंग, भारूड, कर्कीतन इ.ची रचना केली.

**ग्रह जीवनाला महत्त्व:** भक्ती चळवळीने संन्यास, आश्रम व वानप्रस्थ आश्रमाला विरोध केला. कारण मानव जन्म पुन्हा नाही. म्हणून संतांनी ग्रहस्थाश्रमाला महत्त्व दिले. परमार्थ करूनही परमेश्वर प्राप्त करता येतो. असा सल्ला समाजाला दिला.

**हिंदू-मुस्लीम ऐक्य:** तत्कालीन मुसलमान राज्यांच्या धर्मांधतेमुळे हिंदू-मुस्लीम समाजात संघर्ष निर्माण झाला होता. परंतू या चळवळीने एकेश्वरवादाचा पुरस्कार केल्याने हिंदू-मुसलमान समाजात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**परमेश्वराच्या सच्चा भक्तीचा संदेश:** भक्ती चळवळीने ईश्वराचे खरे रूप समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. दिन-दुबळ्यांची, गोर-गरीबांची प्राणी मांत्रांची सेवा करा. त्यांच्यावर प्रेम करा ही खरी भक्ती असून, तो परमेश्वराचा खरा संदेश आहे. असे सांगून लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

**दलित जातीचा उद्धार:** सर्व जाती-जमातीतील लोकांना भक्ती करण्याचा अधिकार आहे, असे भक्ती चळवळीने सांगितले. त्यांनी भक्तीचा खरा मार्ग दलीतापर्यंत पोचवला. त्यामुळे दलित जातीतून अनेक संत निर्माण झाले.

**धार्मिक अहिष्णुतेवर भर:** भक्ती चळवळीच्या माध्यमातून संतांनी धार्मिक विषमता कमी केली. सर्व धर्मामध्ये प्रेम, मैत्री निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**धर्मांतरास बंदी:** मुस्लीम राजवटीत सक्तीने किंवा आमिष दाखवून धर्मात्तर सक्तीने केले जात असे. या धर्मांतरास संतांनी विरोध केला व त्याच्यावर बंदी घातली.

**सदुरूचे महत्त्व:** गुरुशिवाय ज्ञान नाही आणि ज्ञानाशिवाय भक्ती नाही. भक्तीमूळेच मनुष्य जीवाला मोक्ष प्राप्ती होते. परमेश्वराची आराधना केल्यास मोक्ष मिळतो असे त्यांनी समाजापर्यंत विचार पोहचवला.

**भक्ती चळवळ हे एक आंदोलन होते:** भक्ती चळवळीच्या माध्यमातून समाजात समता निर्माण करण्याचा प्रयत्न करून धर्माची माहिती दिली, धर्माचे स्वरूप सांगितले, हिंदू-मुसलमानाच्यात ऐक्य निर्माण केले त्यामुळे सामान्य जनता भक्ती चळवळीकडे आकर्षित झाली. परिणामी हे एक सामाजिक आंदोलन निर्माण झाले.

**भक्ती चळवळीचे परिणाम / प्रभाव**

भक्ती चळवळीच्या वाटचाली धर्मातील व समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. भारतीय लोकांच्या जीवनावर याचा दिर्घकाळ परिणाम पडला तो पुढील प्रमाणे-

**सामाजिक सुधारणेला उत्तेजन:** भक्ती चळवळीने ढोंगी, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा या अशा अनेक हानीकारक घटनाच्यावर घटकावर टिका करून, सामाजिक सुधारणेला प्राधान्य दिले. त्यामुळे समाज्याला नवीन उत्तेजन मिळाले.

**लोक जागृती:** भक्ती चळवळीतील संतांनी ओव्या, अभंग, भारूड यांच्या माध्यमातून लोक जागती केली. सामान्य लोकांना परमेश्वराची प्रार्थना करण्याचा अधिकार आहे. याची जाणीव करून दिली.

**हिंदे-मुसलमान यांच्यात मैत्री:** हिंदू मुसलमान धर्मांना ऐकमेकांच्या जवळ आणण्याचे महत्त्वाचे कार्य भक्ती चळवळीने केले. दोन्ही धर्मातील कटूता त्यामुळे बरीच कमी झाली.

**एकात्मतेची भावना:** भक्ती चळवळ ज्या-ज्या ठिकाणी जाऊन पोहोचली. त्या- त्या ठिकाणी एकात्मतेची भावना निर्माण झाली. उदा. पंजाब, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामीळनाडू भभ्ती चळवळीमुळे ऐक्याच्या भावनेवर स्वतच्या संस्कृतीचा आणि धर्माचा अभिमान वाढीस लागला.

**समतेचे मार्ग प्रस्तापित केले:** समाज्यामध्ये कनिष्ट जाती-जमातीना सर्वच क्षेत्रात स्थान नव्हते. भक्ती चळवळीने त्या लोकांना या चळवळीचा प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. व त्यांना निंदा नालस्तीपासून दूर करून भक्तीचा मार्ग दाखवला व समाजातील विषमता नष्ट होऊन सामाजिक समता निर्माण झाली.

**भाषा व वाङ्गयाचा विकास:** भक्तीचा मार्ग सर्व सामान्य लोकांना समजावा यासाठी लोकभाषेचा स्विकार करुन, या भाषेतून आपले विचार अभंग, भारुड, ओव्या समाज्यासमोर मांडल्या. त्यामुळे भाषा वाड्याचा विकास झाला.

**एकेश्वर वादाचा प्रभाव:** भक्ती चळवळीने ऐकेश्वर हा विचार समाजात मांडला. परमेश्वर एकच आहे. म्हणून एकाच परमेश्वराची पूजा, प्रार्थना करावी त्यामुळे व्यक्तील मोक्ष प्राप्त होतो. हा ऐकेश्वरवादाचा विचार समाजात निर्माण झाला.

**राजनैतिक प्रभाव:** भक्ती चळवळीने राजकीय क्षेत्रात ही जागृती केली. धर्माचे, समाजाचे संरक्षण करावे या उद्देशाने स्वतची राजकीय सत्ता असावी असा विचार मांडला. त्यामुळे विजयनगरची सत्ता, मराठ्याची सत्ता अशा राजकीय सत्ता निर्माण झाल्या.

**सांस्कृतिक प्रगती:** भक्ती चळवळीने समाजात मंदिरे बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू केली. विशिष्ट देवताची मूर्ती पूजा सुरू झाली. त्यामुळे समाज्यात सांस्कृतिक जागृती निर्माण झाली. हिंदू धर्माचे रक्षण मध्ययुगीन कालखंडामध्ये इस्लामी सत्ता असून ते सक्तीने धर्मांतर करत होते. याच्या विरोधात भक्ती चळवळीने कार्य करून मुस्लीम राज्यकर्ताच्या अन्याय, अत्याचार धोरणापासून हिंदू धर्माचे, समाजाचे रक्षण केले.

## भक्ती चळवळीतील संत

मध्ययुगीन कालखंडात संतांनी भक्ती चळवळ विकसित करून या चळवळीचे कार्यक्षेत्र विशेषत संपूर्ण देशात विस्तारले होते. संतांनी साध्या सोप्या काव्य अंभगाची निर्मिती करून लोकांपर्यंत पोहचवले ते संत पुढीलप्रमाणे-

## भक्ती चळवळ

### रामानुजाचार्य: (१०१७ –११३७).

आद्य शंकराचार्यांनंतर दक्षिणेत तीनशे वर्षांनी अकराव्या शतकात रामानुजाचार्य जन्मले. त्यांनी त्यांच्या अगोदर सु. दीड हजार वर्षे प्रचलित असलेल्या वैष्णव संप्रदायाला ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहून वेदान्ताचा आधार दिला आणि भक्तिमार्गाला ज्ञान व कर्म यांच्यापेक्षा अधिक माहात्म्य प्राप्त करून दिले. कर्म व ज्ञान यांनी चित्त शुद्ध होते आणि भक्तियोगानेच मोक्षाधिकार प्राप्त होतो, असा शंकराचार्यांपेक्षा काहीसा वेगळा सिद्धांत त्यांनी स्थापन केला. दक्षिणेत तमिळनाडूमध्ये रामानुजाचार्यांच्या अगोदरपासून सु. ६०० वर्षे आळवार नावाच्या वैष्णव साधुसंतांचा संप्रदाय सुरू होता. त्यांचे तमिळ भाषेतील उच्च धार्मिक आशयाचे ‘प्रबंध’ होते. त्या प्रबंधांना वेदांच्या इतकेच प्रामाण्य होते म्हणून त्यांना ‘द्राविड वेद’ अशी पदवी प्राप्त झाली होती. या आळवारांच्या संतमालिकेत नम्माळवार किंवा शठकोपमुनी यांना सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. त्यांच्या प्रबंधाचा तिरुवायमोळि वा दिव्य प्रबंधम् असा निर्देश होतो. महाराष्ट्रात गेल्या सातशे वर्षांत ज्ञानदेव-नामदेव, एकनाथ-तुकाराम ही जशी संतमालिका प्रसिद्ध आहे तशीच रामानुजाचार्यांच्या अगोदर सु. ६०० वर्षांमध्ये दक्षिणेत अनेक संतकवींची मालिका निर्माण झाली. आचार्यही अनेक झाले. नाथमुनी (नववे-दहावे शतक), यामुनमुनी (सु. ९१८ – सु. १०३८) आणि त्यानंतर रामानुजाचार्य आणि वेदान्तदेशिक वा वेंकटनाथ (सु. १२६९ –सु. १३७१) झाले. यामुनमुनींचे सिद्धित्रय, आगमप्रामाण्य, गीतार्थसंग्रह, महापुरुषनिर्णय, चतुःश्लोकी व स्तोत्ररत्न हे संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. शांकर वेदान्तामध्ये गौडपादाचार्यांना जे स्थान आहे, तेच स्थान वैष्णव संप्रदायात यामुनमुनींना आहे. रामानुजांना भाष्यकार म्हणून व वैष्णव संप्रदायाचे श्रेष्ठ तत्वज्ञ म्हणून स्थान प्राप्त झाले त्यांच्या पाठीमागे यामुनमुनींची प्रेरणा होती.

आळवार संतांच्या परंपरेमध्ये शूद्रातिशूद्रांचाही अंतर्भाव झालेला दिसतो. मुक्ताबाईसारख्या महिला संतही या आळवारांच्या मालिकेत चमकून गेल्या आहेत. गोदा किंवा आंडाळ हिच्या १७३ कविता तमिळ भाषेमध्ये अप्रतिम म्हणून गणल्या जातात. तिने मनाने देवालाच वरले होते.

तिरुप्पाण आळवार हा पंचम जातीत म्हणजे दलितात जन्मलेला चोखामेळ्यासारखा संत होता. हा सतत वीणाधारी आणि भजनात निरंतर दंग असलेला संत होता. तिरुप्पाण आळवाराची एक मोठी सूचक गोष्ट सांगण्यात येते, ती अशी : श्रीरंगम् येथे तिरुप्पाण आळवार कावेरी नदीच्या घाटावर बसून वीणेवर भक्तांच्या कविता गात बसे. एकदा तो श्रीरंगनाथस्वामींच्या मंदिरासमोर द्वारमार्गावर वीणेच्या तारा छेडीत भजनात दंग झाला होता येणाऱ्या जाणाऱ्यांचे भान राहिले नाही तेव्हा मंदिराचा लोकसारंगमुनी हा पुजारी मंदिराकडे जाऊ लागला असताना, मंदिराच्या दरवाज्यात बेभान होऊन गाणाऱ्या तिरुप्पाण आळवाराला बाजूला होण्यास त्याने सांगितले कारण तो अस्पृश्य असावा असे लक्षात आले. तो भजनात दंग असल्याने त्याला हे ऐकू आले नाही. लोकसारंगमुनीने त्याला दगड हाणला आणि जोराची शिवीगाळ केली. तो बिचारा काही न बोलता अधिक मार बसू नये म्हणून भिऊन पळाला. हे घडत असताना मंदिराचे दरवाजे आपोआप बंद झाले. ही वेळ देवपूजेची होती. यावेळी दरवाजे सताड उघडे रहावयाचे. लोकसारंगमुनीने दरवाजे जोरात हलवले. आतून कोणी बंद केले असतील म्हणून बाहेरून हाका मारल्या. आतून उत्तर आले नाही आणि दरवाजेही उघडले नाहीत. लोक जमले, सर्वांनी प्रयत्न केला. दरवाजे उघडेनात. आतून आकाशवाणी ऐकू आली, 'मी रंगनाथस्वामी मला दगड मारला, शिवी दिली. म्हणून मी दरवाजा बंद केला आहे. कावेरीच्या घाटावर एक महापुरुष माझ्या नामस्मरणात तल्लीन झाला आहे. त्याला खांद्यावर घ्या, मंदिराची प्रदक्षिणा करा, तर हे दरवाजे उघडतील, नाहीतर दरवाजे उघडणे शक्य नाही'. लोकसारंगमुनी घाटावर धावत गेला आणि तिरुप्पाण आळवाराला खांद्यावर बसण्याची त्याने विनंती केली. त्याने उत्तर दिले, 'मी अस्पृश्य, अतिशूद्र आहे. मी त्या द्वारमार्गावर भजन करीत बसलो, हा माझा अपराध आहे. मी तुमच्या देहाला दूषित करू इच्छित नाही'. तिरुप्पाण आळवाराचे हे बोलणे न मानता क्षमा मागून लोकसारंगमुनीने तिरुप्पाणला खांद्यावर घेतले, प्रदक्षिणा केली रंगनाथस्वामीचे दरवाजे आपोआप उघडले गेले. तेव्हापासून तिरुप्पाणला 'मुनिवाहन' अशी पदवी प्राप्त झाली.

आळवार संत महाराष्ट्रातील वारकरी संतांप्रमाणेच वरपासून खालपर्यंतच्या सगळ्या जातिजमातींमध्ये जन्मून प्रसिद्धीस आले. त्यांच्यात संतकवी आणि संतपंडित वा आचार्य निर्माण झाले. यामुनाचार्य आळवार संतांच्या मालिकेतीलच संतपंडित होत. यामुनाचार्यांचे शिष्य महापूर्ण (नम्बी) यांच्या दोन बहिणी कांतिमती व द्युतिमती वडील बहीण कांतिमती ही रामानुजांची माता होय आणि आसुरीकेशवाचार्य हे पिता होत. मद्रास शहरापासून सु. ४५ किमी. अंतरावर नैर्ऋत्य दिशेस श्रीपेरुंबूदूर (भूतपुरी) या छोट्या गावात रामानुजांचा जन्म झाला. महापूर्णांच्या धाकट्या बहिणीने-द्युतिमतीने-कमलनयनभट्ट यांच्याशी विवाह केला. तिला गोविंद नावाचा मुलगा झाला.

रामानुजांच्या जन्मापूर्वीची हकीकत अशी : आसुरीकेशवाचार्यांना दीर्घकालपर्यंत संतती झाली नाही. त्यांनी अनेक यज्ञ केले याचे निदर्शक म्हणून त्यांना 'सर्वक्रतु' अशी पदवी प्राप्त झाली. सागरतीरावर वृंदारण्यात श्रीपार्थसारथी म्हणजे श्रीकृष्ण याची आराधना करण्याकरता त्यांनी अनेक यज्ञ केले. या स्थानाला हल्ली ट्रिप्लिकेन म्हणतात. त्यांना स्वप्नात पार्थसारथी श्रीकृष्णाचे दर्शन झाले. 'तुझी पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण होईल', असे आश्वासन पार्थसारथीने त्यांना दिले.

चैत्र शुद्ध पंचमी शके ९३९ रोजी रामानुजांचा जन्म झाला. त्याच सुमारास द्युतिमतीलाही पुत्र झाला. महापूर्ण किंवा शैलपूर्ण हे संन्यासी झाले होते परंतु त्यांनी जवळ जाऊन आपल्या बहिणींच्या पुत्रांचे अवलोकन केले. लहान बालक रामानुज याच्या शरीरावरील दिव्य चिन्हे पाहून वैष्णव पंथाचा पुरस्कर्ता महापुरुष जन्मला, हे त्यांच्या लक्षात आले. असा महापुरुष जन्मेल असे नम्माळवार शठकोपमुनी यांनी भविष्य वर्तविले होते, ते त्यांना आठवले.

रामानुजांचे उपनयन झाल्यावर शिक्षण सुरू झाले. त्यांचे वडील वेदशास्त्रसंपन्न होते. तरी रामानुजांचे शिक्षण दुसऱ्या एका विद्वान गृहस्थांकडे झाले. कांचीपुरीमध्ये कांचीपूर्णनामक वैष्णव संत राहत होते. पूनुमुलाई या जवळच्या

गावातील लक्ष्मीनारायणाचे दर्शन घेण्याची त्यांची परिपाठी होती. श्रीपेरुंबूदूर या गावातून त्या मंदिराकडे वाट होती. ती वाट रामानुजांच्या घरावरून जात होती. कांचीपूर्ण हे सिद्धपुरुष होते. विद्वान ब्राह्मणही त्यांना साधुपुरुष म्हणून वंदन करीत. एके दिवशी रामानुजांना पाठशाळेतून परत येत असताना कांचीपूर्णांचे दर्शन झाले. रामानुजांनी त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु कांचीपूर्णांनी तो नमस्कार नाकारला आणि म्हटले, 'मी खालच्या जातीतला आहे, मी शूद्र आहे. तू ब्राह्मण आहेस, तू असा नमस्कार मला करू नकोस'. रामानुज उत्तरले, 'मी हे दुर्दैव समजतो, की मला तुमच्या चरणांचा स्पर्श तुम्ही होऊ देत नाही. मी यज्ञोपवीत धारण केले, म्हणून मी ब्राह्मण आहे हे खरे नाही. तिरुप्पाण आळवार अंत्यज होते परंतु ब्राह्मणांनाही वंदनीय होते'. त्या दिवसापासून कांचीपूर्ण व रामानुज यांचे चांगले सख्य झाले.

वयाच्या सोळाव्या वर्षी रामानुजांचे रक्षकांबाळ या मुलीशी लग्न झाले. त्याच वर्षी त्यांचे वडील आसुरीकेशवाचार्य वारले. रामानुज सहकुटुंब कांचीपुरीला राहण्यास आले कारण कांचीपूर्ण हे वैष्णव संत कांचीपुरीतच राहत होते. कांचीपुरीला तेथील सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ, विद्वान, अद्वैतवादी यादवप्रकाश (अकरावे शतक) यांच्यापाशी रामानुजांच्या अध्ययनास सुरुवात झाली. यादवप्रकाश मायावादी नव्हते. त्यांच्या सिद्धांताला शुद्धाद्वैतवाद अशी संज्ञा देता येते. ह्या शुद्धाद्वैतवादाप्रमाणे परब्रह्माची नित्य परिवर्तन पावणारे आणि परिवर्तन न पावणारे अशी दोन रूपे. नित्य बदलणारे विश्व हे परब्रह्माचे एक स्वरूप आणि सच्चिदानंद केवलब्रह्म हे परिवर्तन न पावणारे दुसरे स्वरूप आहे. रामानुजांना यादवप्रकाशांचा हा शुद्धाद्वैतवाद मान्य झाला नाही परंतु रामानुजांनी यादवप्रकाशांपाशी आपले अध्ययन सुरू ठेवले. गुरु-शिष्यांचे मतभेद होत. कित्येक वेळा ते मतभेद पराकाष्ठेचे असत. रामानुज आपली बाजू मांडत असताना गुरूंची मती कुंठित करीत. कांची येथील एका सरदाराच्या मुलीला भूतबाधा झाली होती. यादवप्रकाशांकडे आपल्या कन्येला घेऊन सरदार आले. परंतु यादव-प्रकाशांचे मंत्रतंत्र विफल झाले. अत्यंत तेजस्वी शिष्य म्हणून रामानुजांची प्रसिद्धी झाली होती. त्यांच्याकडे कन्येला घेऊन ते सरदार आले. रामानुजांच्या चरणस्पर्शाबरोबर त्या कन्येची भुताटकी झटक्यासरशी उतरली.

यादवप्रकाशांनी एके दिवशी आपले पाय दाबण्याकरिता रामानुजांना बोलावून घेतले. रामानुज सेवा करीत असताना गुरूंशी शास्त्रचर्चाही करीत. छांदोग्यउपनिषदात 'तस्य यथा कप्यासं पुण्डरीकमेवमक्षिणी' असे देवाच्या डोळ्यांचे वर्णन आले आहे. 'कपीच्या कमरेखालच्या भागाप्रमाणे असलेल्या कमळाप्रमाणे शोभणारे डोळे', असा अर्थ यादवप्रकाशांनी सांगितला. रामानुजांनी ही कमरेखालच्या भागाची उपमा देवाच्या डोळ्यांना शोभत नाही म्हणून निराळा अर्थ सांगितला. 'कपि' म्हणजे सूर्य 'कप्यासं' म्हणजे सूर्याप्रमाणे विकसित आणि त्या विकसित कमळाप्रमाणे डोळे, असा अर्थ केला. 'कपि' शब्दाचा 'क' म्हणजे जल, त्याचे पान करणारा म्हणजे सूर्य असाही अर्थ त्यांनी केला. यादवप्रकाशांना रामानुजांच्या विचारकुशलतेचा हेवा वाटला. असे पदोपदी मतभेद व्हायचे. तैत्तिरीय उपनिषदातील 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' याचा सरळ अर्थ विशिष्टाद्वैत सिद्धांताशी जमणारा नाही. त्याचा सरळ अर्थ — 'सत्य, ज्ञान आणि अनंत ब्रह्म' यात 'ब्रह्मच ज्ञान आहे' हे विधान विशिष्टाद्वैताशी जुळत नाही. कारण ब्रह्माचा म्हणजे परमेश्वराचा ज्ञान हा गुण आहे, असे विशिष्टाद्वैतमताने म्हणावे लागते. यादवप्रकाशांच्या हे लक्षात आले, की हा आपला प्रखर बुद्धिमान विद्यार्थी अद्वैतवेदान्ताचे खंडन करणारा विजयी पंडित होणार आहे. हे मोठे संकटच आहे. म्हणून या जगातून त्याला कायम रजा द्यावी. प्रयाग यात्रेला शिष्यगणांसह त्यांनी प्रस्थान मांडले. त्यात रामानुजाला आणि त्याचा मावसभाऊ गोविंद याला बरोबर घेतले. काही शिष्यांशी गुप्त खलबत करून प्रयागला त्रिवेणीच्या संगमात रामानुजांना जलसमाधी द्यावी, असे ठरविले परंतु हे खलबत गुप्त राहिले नाही. ते गोविंदाला कळले. गोविंदाने अत्यंत प्रिय मित्र असलेल्या आपल्या मावसभावाला म्हणजे रामानुजांना, कोणालाही न कळू देता हे संकट सांगून पळ काढावयास लावले. रामानुजांनी पळ काढला. बऱ्याच वेळाने रामानुज दिसेनात म्हणून यादवप्रकाशांनी शोध सुरू केला, पत्ता लागला नाही. रामानुज आडवाटेने जंगलांमधून दक्षिणेकडे निघाले. फार हाल झाले नशिबाने पारध्याचे कुटुंब जंगलात भेटले. त्या कुटुंबाने कांचीपुरीपर्यंत मार्गदर्शन करीत त्यांना सोबत केली. या संकटातून रामानुज उत्तीर्ण झाले. कांचीपुरीत कांचीपूर्ण या

संतांना भेटले. कांचीपूर्णांनी सांगितले, की यादवप्रकाशांबद्दलचा राग मनातून काढून टाक. ही घटना सुचवते, की तुझ्यावर देवाची कृपा आहे. कालांतराने यादवप्रकाशही यात्रा संपवून सुखरूप परतले.

शिक्षण चालू असतानाच रामानुजांची एक प्रज्ञावंत, प्रतिभाशाली तत्त्वज्ञ म्हणून कांचीपुरीमध्ये ख्याती झाली. ही कीर्ती श्रीरंगम् येथील वैष्णव भक्त यामुनाचार्यांच्यापर्यंत पोहोचली आणि त्यांना हेही कळले, की अद्वैतसिद्धांतापेक्षा द्वैतसिद्धांतच म्हणजे जीव आणि ईश्वर हे एक नव्हेत हा सिद्धांत, उपनिषदांद्वारे रामानुज सिद्ध करतात त्यामुळे यादवप्रकाशांपासून त्यांना दूर व्हावे लागले. रामानुज हे विष्णुकथा आणि कीर्तन यांच्यामध्ये पूर्ण रममाण होतात, वैष्णव भक्तांचे भाव भजनरंगी रंगत असताना त्यांच्यात स्पष्ट दिसतात, गहिवरून येतात, रोमांचित होऊन अश्रुपात होतो, भोवतालच्या जगाचे भान नाहीसे होते आणि सर्व जग त्यांना विष्णुमय दिसते. ही सगळी हकीकत कांचीपूर्णांनी यामुनाचार्यांना निवेदन केली. आचार्य यामुनांनी यादवप्रकाशांच्या शिष्यांच्या मेळाव्यात रामानुजांना पाहिले होते. भेट घेतली नाही पण आशीर्वाद देऊन ते श्रीरंगम्‌ला परतले.

यादवप्रकाशांशी उपनिषदांच्या अर्थासंबंधी पदोपदी मतभेद व्हायला लागल्यामुळे यादवप्रकाशांनी रामानुजांना आपली पाठशाळा बंद केली. तेव्हापासून कांची येथे हस्तिशैलावरील नारायणाच्या पूजेमध्ये ते रममाण झाले. तेथे नारायण मंदिरातच यामुनाचार्यांचे शिष्य, रामानुजांचे मामा, महापूर्ण यांच्या मुखातून यामुनांचे स्तोत्ररत्न रामानुजांच्या श्रवणपथावर आले. वैष्णव संप्रदायाचे म्हणजे आळवारांचे भक्तियोग आणि प्रपत्ती यांसंबंधांचे विचार सतत ऐकावयास मिळू लागले. म्हणून यामुनांचे दर्शन घेण्याकरता त्यांना उत्कंठा लागली. रामानुज महापूर्णांबरोबर श्रीरंगम् येथे यामुनाचार्यांचे दर्शन घेण्याकरिता त्यांच्या निवासस्थानी गेले परंतु त्यावेळी नेमकी यामुनाचार्यांची जीवनज्योती मालवली होती. अंत्येष्टी व्हावयाची होती. देहाचे दर्शन झाले. रामानुजांना देहाचे दर्शन घेत असताना उजव्या हाताची तीन अंगुले मिटलेली दिसली. त्याचा गूढार्थ उमगला. ती मिटलेली तीन बोटे तीन अपेक्षा सूचित करीत होती : (१) जनतेला आळवार संतांचा वैष्णव मार्ग शिकविण्याकरिता द्राविड वेद म्हणजे आळवारांचे दिव्य प्रबंधम् शिकवायचे आणि प्रपत्तीचा सिद्धांत जनमनावर बिंबवायचा (२) वैष्णव संप्रदायाप्रमाणे विशिष्टाद्वैतवादी भाष्य ब्रह्मसूत्रावर लिहावयाचे आणि (३) वैष्णव संप्रदायाच्या स्पष्टीकरणाचे अनेक 'प्रबंध' स्वतः व पराशरादी शिष्यांच्या द्वारे निर्माण करावयाचे. या तिन्ही अपेक्षा पूर्ण करीन, असे रामानुजांनी यामुनाचार्यांच्या शवापुढे जाहीर केल्याबरोबर मिटलेली तिन्ही बोटे सरळ झाली. रामानुज कांचीला परतले. तेथे यामुनांचे शिष्य कांचीपूर्ण यांच्या सहवासात काळ घालवू लागले. कांचीपूर्ण शूद्र होते. तरी त्यांच्यापाशी वैष्णव दीक्षेची रामानुजांनी मागणी केली. कांचीपूर्णांनी 'मी शूद्र आहे, मी ब्राह्मणाला दीक्षा देऊन त्याचा गुरू बनू शकत नाही' असे सांगितले. रामानुजांना हे केव्हाच पटले नाही. कांचीपूर्णांना ते गुरू मानून त्यांच्या संगतीत राहू लागले. नंतर श्रीरंगम्‌ला जाऊन तेथे वैष्णव संप्रदायाची दीक्षा महापूर्णांपासून प्राप्त करून घेतली. या दीक्षाविधीचे पाच भाग म्हणजे पाच संस्कार आहेत. ताप, पुण्ड्र, नाम, मंत्र आणि याग हे ते पाच संस्कार होत. कपाळ आणि बाहू यांच्यावर तप्तमुद्रा, मस्तकावर आणि बाहूंवर चंदनाचा उभा लेप, नवे नामधारण, मंत्रग्रहण आणि याग म्हणजे हवन करावयाचे. पंचसंस्कार झाल्यावर महापूर्ण आणि रामानुज हे दोघेही सहकुटुंब एकत्र राहू लागले. रामानुजांची पत्नी सुंदर पण घमेंडखोर होती. ती महापूर्णांच्या पत्नीशी भांडायला लागली. कुणी दारात भिक्षुक आला, तर ती त्याचा कित्येक वेळ सत्कार न करता तिरस्कार करीत असे. ती सोवळेओवळे व जातिभेद कडक रीतीने पाळत होती पण रामानुजांना ते सर्व अमान्य होते. रामानुजांच्या लक्षात आले, की या पत्नीबरोबर आदर्शरूपात गृहस्थाश्रम चालवता येणार नाही म्हणून ऐन उमेदीतच सुमारे ३२ व्या वर्षी, पत्नीला युक्तिप्रयुक्तीने त्यांनी माहेरी कायम पाठविले आणि संन्यास घेतला. यादवप्रकाशांच्या कानावर ही संन्यासाची वार्ता गेल्यावर तेच रामानुजांचे शिष्य बनले. पंचसंस्कारांमध्ये 'गोविंददास' असे अभिधान यादवप्रकाशांना दीक्षेच्या वेळी रामानुजांनी दिले. गोष्ठीपूर्णनामक एक वैष्णव संत होते. रामानुज त्यांच्याही चरणाशी बसून काही गूढ आध्यात्मिक सिद्धांत आणि मंत्र शिकले. 'नमो भगवते वासुदेवाय' इ. मंत्र कोणाला ऐकू जाऊ नयेत, असा मंत्रोपदेश करणाऱ्या गुरूंचा निर्बंध होता. हा निर्बंध रामानुजांना पूर्ण अमान्य होता. ते मोठ्या मंदिरांच्या गच्चीवरून उच्च तारस्वराने मंत्रोच्चार करीत भजन करू लागले. त्या भजनात जातपात न मानता जनता

सामील होऊ लागली. योगमार्गातील ही गुप्ततेची प्रथा रामानुजांनी मोडली. तेव्हापासून भक्तिसंप्रदायातील भजनांमध्ये उच्च स्वराने मंत्रजप होऊ लागला. शंकराचार्यांप्रमाणेच रामानुज अद्वैती पंडितांशी वादसभा करून विजय मिळवू लागले. यज्ञमूर्ती नावाच्या अद्वैती विद्वानाशी त्यांनी अनेक दिवस वाद करून त्याला विशिष्टाद्वैती वैष्णव संप्रदायाचा अंगीकार करावयास लावला.

ब्रह्मसूत्रावरची शंकराचार्य पूर्वकालीन मायावादी नसलेली भाष्ये वा टीका यांचे अध्ययन करून नवे भाष्य लिहावे, असा विचार करून रामानुज बोधायनवृत्ति नावाचे ब्रह्मसूत्रभाष्य मिळवण्याकरता काश्मीरला गेले. तेथील शारदा मठात बोधायनवृत्ति आहे, असे कळले होते. आपल्या बरोबर त्यांनी कुरेश वा कूरनाथ या शिष्याला घेतले. कारण त्याची स्मरणशक्ती उत्कृष्ट एकपाठी होती. ग्रंथ मिळाला नाही, तरी ग्रंथ वाचून तेथल्या तेथे परत करावयाचा, असे मनाशी ठरविले होते. कुरेशालाच श्रीवत्सांकमिश्रही म्हणत. अनेक रात्री जागून कुरेशाने बोधायनवृत्तीचे अध्ययन केले. शारदा मठाचे ग्रंथपाल बोधायनवृत्तीची पोथी देण्यास तयार नव्हते. त्यांनी ती परत मागून घेतली. रामानुजांनी त्या बोधायनवृत्तीचे सार ध्यानात धरून श्रीभाष्यास प्रारंभ केला. कुरेशाला ते तोंडाने सांगत आणि कुरेश लिहीत असे. कुरेशाच्या स्मरणशक्तीचा प्रत्यय भाष्य सांगत असताना रामानुजांना पदोपदी येऊ लागला आणि त्यांनी श्रीभाष्य पूर्ण केले. वेदान्तदीप आणि वेदान्तसार या ब्रह्मसूत्रभाष्यावरील संक्षिप्त टीकासुद्धा रामानुजांनी लिहिल्या. वेदार्थसंग्रह, 'गद्यत्रय' (शरणागति-गद्य, श्रीरंग-गद्य आणि श्रीवैकुंठ-गद्य) व भगवद्आराधनाकर्मावर नित्यग्रंथ हे स्वतंत्र निबंध आणि गीताभाष्य त्यांनी लिहिले. रामानुजांनी उपनिषदांवर भाष्य लिहिले नाही. त्यांच्या संप्रदायातील रंगरामानुज या पंडिताने विशिष्टाद्वैतमताप्रमाणे उपनिषदांवर टीका लिहिल्या.

वैष्णव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे आणि भक्तियोगाचे तर्कशुद्ध विवेचन केल्यानंतर प्रथम दक्षिणेच्या आणि त्यानंतर उत्तरेच्या विजययात्रा रामानुजांनी केल्या. नंतर श्रीरंगम् येथे ते परतले. त्या वेळी तेथे पहिला कुलोत्तुंग किंवा कृमिकंठ (कार. १०७० — ११२०) हा चोल राजा राज्य करीत होता. तो कट्टर शैवपंथी आणि वैष्णवांचा द्वेष्टा होता. त्याने महापूर्ण आणि कुरेश यांच्या डोळ्यांना इजा करून अंध केले. श्रीरंगम्हून संन्यासवेष टाकून साध्या वेषात रामानुज बाहेर पडले. त्यांनी होयसळवंशी बिट्टिदेव या जैन राजाला वैष्णव दीक्षा दिली आणि विष्णुवर्धनदेव असे त्याचे नवे नामकरण केले. या राजाच्या मदतीने मेलकोटे येथे मंदिर बांधून तेथे बारा वर्षे वसती केली. श्रीरंगम्चा चोल राजा पहिला कुलोत्तुंग निवर्तल्यावर रामानुजाचार्य श्रीरंगम्ला परत आले. तेथेच ११३७ मध्ये (माघ शुद्ध दशमी शके १०५९) त्यांनी अखेरची समाधी घेतली. रामानुजांचा जीवनकाल १२० वर्षांचा आहे.

या दीर्घ जीवनकालात शेकडो शिष्य त्यांना मिळाले. त्यांनी वैष्णव भक्तिमार्गाचा संप्रदाय देशभर प्रसृत केला पिढ्यानपिढ्या आतापर्यंत तो चालू राहिला. जैन व बौद्ध जनांना संप्रदायात त्यांनी समाविष्ट केले. ते स्वतः शूद्र गुरूंचे शिष्य बनले. ते अस्पृश्य मित्रांच्या झोपडीमध्येही दीर्घकालपर्यंत परमार्थचर्चेत काळ घालवीत होते. ७४ मठांच्या पीठांवर त्यांचे पूजोत्सव, अभिषेक झाले. ७०० गोसावी, १२,००० संन्यासी, ३०० संन्यासिनी त्यांच्या अनुयायांमध्ये होत्या. अनेक राजे व धनिक यांच्या शिष्यगणांमध्ये समाविष्ट झाले होते. कुरेश, दाशरथी, नडाडूर अम्माळ आणि पराशर भट्ट हे त्यांचे पंडित शिष्य शास्त्रार्थचर्चेत पुढाकार घेऊन शंकासमाधान करीत. धार्मिक कर्मकांड एका शिष्याकडे, दुसऱ्या शिष्याकडे मुदपाकखाना, तिसऱ्याकडे द्रव्यनिधी, चवथ्याकडे भोजनालय अशा प्रकारे या श्रेष्ठ पारमार्थिक आचार्यांचे धर्मपीठ मोठ्या इतमामाने या दीर्घ जीवनात चालू राहिले.

**निंबार्क : (सु. अकरावे शतक).**

निंबार्क, निंबादित्य अथवा नियमानंद हे वैष्णव पंथातील द्वैताद्वैतवादी सनक संप्रदायाचे संस्थापक अकराव्या शतकाच्या सुमारास होऊन गेले. त्यांचे जन्मस्थान कर्नाटकात बेल्लारी जिल्ह्यातील निंब किंवा निंबापूर हे असावे. त्यांच्या वडिलांचे नाव जगन्नाथ होते, असे त्यांच्या दशश्लोकीवरील हरिव्यासदेवांच्या टीकेत म्हटले आहे. ते जन्माने तेलुगू ब्राह्मण होते परंतु त्यांच्या जन्माविषयी तसेच घराण्याविषयी फारशी माहिती मिळत नाही. रा. गो. भांडारकरांच्या

मते त्यांचा मृत्यू इ. स. ११६५ च्या सुमारास झाला असावा. राधाकृष्णन त्यांच्या मते ते रामानुजांनंतर पण मध्वाचार्यांच्या पूर्वी होऊन गेले. काहींच्या मते ते वल्लभाचार्यांनंतर होऊन गेले. निंबार्कांच्या लेखनात रामनुजांच्या श्री संप्रदायाचा व मध्वाचार्यांच्या ब्रह्म संप्रदायाचा उल्लेख आहे. शिवाय मध्वमुखमर्दन नावाची एक टीकाही त्यांच्या नावावर आहे. यावरून ते रामानुज व मध्वाचार्य या दोघांच्याही नंतर, पण वल्लभाचार्यांच्या पूर्वी होऊन गेले असावे, असेही म्हणता येईल.

निंबार्काचार्यांच्या वेदान्तपारिजातसौरभ या ब्रह्मसूत्रंभाष्यात स्वत:चे गुरू नारद आणि नारदाचे गुरू परमाचार्यकुमार म्हणजे सनत्कुमार यांचा उल्लेख केला आहे. छांदोग्योपनिषदातील सातव्या अध्यायात सनत्कुमाराने नारदाला ‘भूमा’ हेच परब्रह्म असल्याचा उपदेश केला आहे. त्याचाही निर्देश या संदर्भात निंबार्कांनी केला आहे. भविष्यपुराणात निंबार्कांचा निर्देश केला आहे. भविष्यपुराणात निंबार्कांचा निर्देश असून त्यांना सुदर्शन हेही नाव दिले आहे. ब्रह्मवैवर्तपुराणात विष्णूच्या प्रिय सुदर्शन आयुधाचा हा अवतार होय, असे म्हटले आहे. श्रीमद्‌भागवतातील (६·१५) ऋषिगणांच्या नावांमध्ये आरुणीऋषी म्हणजे निंबार्क होय, असे निंबार्क संप्रदाय मानतो. द्वारपयुगाच्या शेवटी निंबार्कांचा जन्म झाला, असे भविष्यपुराणात म्हटले आहे. ऐतिहासिक दृष्टीने हे मत रा. गो. भांडारकरांनी मान्य केले नाही.

निंबार्कांनी ब्रह्मसूत्रावर वेदान्तपारिजातसौरभ नावाचे भाष्य लिहिले आहे. त्यांनी आपल्या दशश्लोकीत जीव, जगत व ईश्वर यांतील भेद स्पष्ट करणारे द्वैताद्वैत तत्त्वज्ञान स्पष्ट केले आहे. याशिवाय श्रीकृष्णस्तवराज व मध्वमुखमर्दन हे त्यांचे इतर ग्रंथ आहेत. केशवकाश्मीरी याने भगवद्‌गीतेवरील तत्त्वप्रकाशिका नावाच्या आपल्या टीकेत मुख्यत्वे निंबार्कांचे तत्त्वज्ञान विशद केले आहे. पुरुषोत्तमाचार्य यांनी त्यांच्या दशश्लोकीवर वेदान्तरत्नमंजूषा नावाची टीका लिहिली आहे.

भाष्यकार श्रीनिवासाचार्य हे निंबार्कांचा शिष्य म्हणून स्वत:चा निर्देश करतात. लक्ष्मणभट्ट, उदुंबर, गौरमुख व हरिव्यास हेही त्यांचेच शिष्य होत. मधुरा किंवा रागात्मक भक्तीचा एक संप्रदाय म्हणूनही यांचा संप्रदाय ओळखला जातो. निंबार्कांना ‘कृष्णसखी रंगदेवी’चा अवतार मानतात. या संप्रदायाचे मठ आणि मंदिरे राजस्थानातील सलेमाबाद, तसेच वृंदावन, मथुरा, राधाकुंड, गोवर्धन, निंबगाव, मथुरेजवळील ध्रुवसेन येथे आहेत. या संप्रदायातील अनुयायांचे विरक्त व गृहस्थ असे दोन भेद आहेत.

कपाळावर गोपीचंदन व बुक्क्याचा टिळा, गळयात तुळशीची माळ, ‘जयसर्वेश्वर’ असा घोष आणि नावापुढे ‘दास’ किंवा ‘शरण’ असे उपपद ही संप्रदायाची बाह्य लक्षणे होत.

**वल्लभाचार्य : (१४७९-१५३१).**

वल्लभ पंथ, शुद्धाद्वैती संप्रदाय, रूद्र संप्रदाय, पुष्टिमार्ग अशा वेगवेगळ्या नावांनी प्रसिद्ध असलेल्या एका भक्तीमार्गी वैष्णव संप्रदायाचे प्रवर्तक. ते तेलुगू ब्राह्मण होते. त्यांचे घराणे आंध्र प्रदेशातील कांकरव नावाच्या गावचे. कंकर खम्ल्ह, कांकरवाड ही ह्याच गावाची पर्यायी नावे. वल्लभाचार्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मणभट्ट आणि आईचे इल्लमगरू. यलमागार, इल्लम्मागारू असाही तिच्या नावांचा निर्देश काही ठिकाणी आढळतो. गणपतीभट्ट हे त्यांचे आजोबा आणि गंगाधरभट्ट हे पणजोबा. वल्लभाचार्यांचे घराणे सोमयाजी असून त्यांच्या घराण्यातील पुरुषांनी शंभर सोमयज्ञ केले होते, असे म्हणतात. इ.स. १४७९ हे वल्लभाचार्यांच्या जन्माचे वर्ष मानले जात असले, तरी आख्यायिका असे सांगते, की लक्ष्मणभट्ट आपल्या कुटुंबियांसह बनारसला असताना, त्या शहरावर इस्लामी आक्रमण होणार, अशा वार्ता कानांवर येऊ लागल्या त्यामुळे घाबरून लक्ष्मणभट्ट बनारस सोडून अन्यत्र निघाले. वाट एका रानातून जात होती. ह्या रानाचे नाव ‘पंपारण्य’ व ‘चंपारण्य’ असे दोन प्रकारे दिले जाते. या रानातच इल्लमगरू प्रसूत होऊन तिच्या पोटी वल्लभाचार्यांचा जन्म १४८१ साली झाला.

वल्लभाचार्य आठ वर्षांचे होताच त्यांना विष्णुचित्तनामक गुरुंकडे अध्ययनार्थ पाठविण्यात आले. वेदांचे अध्ययन त्यांनी अनेक गुरूंकडे केले. त्रिरम्मलय, अंधनारायण दीक्षित आणि माधवयतींद्र ह्यांचा ह्यांत समावेश होतो. हे सर्व माध्वमताचे होते तथापि वल्लभाचार्यांना मात्र माध्वमत मान्य नव्हते. त्यांचा पंथ अद्वैती आहे. भागवत, ब्रह्मसूत्रे आणि गीता ह्यांचाही त्यांनी सखोल अभ्यास केला होता. षड्दर्शने, पुराणे इत्यादींचेही त्यांनी अध्ययन केल्याचे उल्लेख आढळतात. वल्लभाचार्यांनी विवाह केला होता. महालक्ष्मी हे त्यांच्या पत्नीचे नाव. गोपीनाथ आणि गोस्वामी विठ्ठलनाथ असे दोन पुत्र त्यांना होते. त्यांच्या लक्ष्मी ह्या मुलीचा विवाह चैतन्य महाप्रभूंशी झाला होता, असाही एक उल्लेख आढळतो.

देवदमन वा श्रीनाथजी ह्या रूपाने गोवर्धन पर्वतावर प्रकट होऊन श्रीकृष्णाने वल्लभाचार्यांना दृष्टान्त दिला आणि कृष्णमंदिर बांधून नवा भक्तिसंप्रदाय सुरू करण्यास सांगितले, अशी पुष्टिमार्गाच्या अनुयायांची श्रद्धा आहे.

वल्लभाचार्यांचे तत्त्वज्ञान ‘शुद्धाद्वैत’ या नावाने ओळखले जाते. वल्लभाचार्यांचा संप्रदाय नवा असला, तरी त्यांचे वेदान्त तत्त्वज्ञान त्यांनी विष्णुस्वामींच्या रुद्र संप्रदायातून घेतले. अग्नीपासून स्फुल्लिंग निघावेत, तसे ईश्वरापासून जीव निघतात. जीव हा शुद्ध ईश्वराचा शुद्ध अंश असून ईश्वर व जीव ह्या दोघांत अद्वैत असते ब्रह्म हे मायासंबंधरहित शुद्ध आहे, ही ह्या तत्त्वज्ञानाची मूलभूत तत्त्वे.

पुष्टिमार्गातील भक्तीचे स्वरूप पाहता, त्याचे अनुयायी श्रीकृष्णाला सर्वोच्च ब्रह्म मानतात. श्रीकृष्ण हा कर्ताही आहे भोक्ताही आहे. स्वतःच्या इच्छेने तो जग निर्माण करतो. विष्णूच्या वैकुंठापेक्षाही श्रेष्ठ असलेल्या व्यापिवैकुंठात राहून तो आपल्या भक्तांसह लीला करतो. कृष्णलीलांत सामील होणे हे मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ ध्येय होय

वल्लभाचार्यांनी अनेकदा तीर्थयात्रा केल्या. त्या करीत असताना त्यांनी आपल्या नव्या पंथाचाही प्रचार केला. त्यांना अनेक शिष्य लाभले. दामोदर, शंभू, स्वभू, स्वयंभू, कृष्णदास अधिकारी, कुंभन दास, परमानंद दास, सद्दू पांडे, रामदास चौहान, कृष्णदास ह्यांचा त्यांत समावेश केला जातो. अंधकवी आणि कृष्णभक्त सूरदास ह्यांनीही त्यांचे शिष्यत्व स्वीकारले होते, असे म्हटले जाते. वल्लभाचार्य हे पंढरपूरलाही येऊन गेले होते. वल्लभाचार्यांच्या दक्षिण यात्रेत विजयानगरच्या कृष्णदेवरायाच्या दरबारात अनेक विद्वानांशी त्यांनी वादविवाद केला व त्यात त्यांना विजय मिळाला. त्यांच्यावर संतुष्ट झालेल्या कृष्णदेवरायाने त्यांच्यावर कनकाभिषेक करून त्यांचा सन्मान केला. श्रीकृष्णाच्या सांगण्यानुसार गोवर्धन येथे श्रीनाथमंदिर बांधण्याची त्यांची उत्कट इच्छा १५०२ मध्ये प्रत्यक्षात येऊ लागली. अंबाला येथील पूरणमल खत्री ह्यांनी वल्लभाचार्यांच्या प्रेरणेने हे मंदिर बांधावयास प्रारंभ केला व ते यथावकाश पूर्ण झाले. त्यानंतर ते अडैल येथे आले आणि प्रपंच-परमार्थात काळ घालवू लागले. वयाच्या बावन्नाव्या वर्षी त्यांनी प्रयागला जाऊन संन्यास घेतला. काशीच्या हनुमानघाटावरून गंगेत उडी घेऊन त्यांनी आत्मसमर्पण केले, असे म्हणतात.

वल्लभाचार्यांनी ८४ ग्रंथ रचिले, असे म्हणतात तथापि त्यांच्या नावावर ३१ ग्रंथच असल्याचे दिसते. त्यांत विशेष महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे भागवत पुराणावरील सुबोधिनी ही टीका, तत्त्वार्थदीप अथवा तत्त्वदीपनिबंध आणि ब्रह्मसूत्र-अणुभाष्य हे होत.

षोडशग्रंथ म्हणून त्यांच्या १६ ग्रंथांचा एक समूह आहे. त्यात यमुनाष्टक, बालबोध, सिद्धांतमुक्तावली, पुष्टिप्रवाहमर्यादाभेद, सिद्धांतरहस्य, नवरत्न, अंतःकरणप्रबोध, विवेकधैर्याश्रय, कृष्णाश्रय , चतुःश्लोकी, भक्तीवर्धिनी, जलभेद, पंचपद्य, संन्यासनिर्णय, निरोधलक्षण आणि सेवाफल ह्यांचा समावेश होतो. ह्यांशिवाय त्यांनी मधुराष्टक, श्रीकृष्णाष्टक, गोपीजन-वल्लभाष्टक, अशी काही अष्टकेही लिहिली आहेत.

**चैतन्य महाप्रभु:(सु. २७ फेब्रुवारी १४८५—सु. ९ जुलै १५३३).**

बंगालमधील एक लोकोत्तर वैष्णव संत व पंथप्रवर्तक. बंगालमध्ये गंगाकिनारी नवद्वीप अथवा नडिया नावाच्या गावी फाल्गुन शुद्ध पौर्णिमा, संवत १५४२ मध्ये चैतन्यांचा जन्म झाला. त्या दिवशी चंद्रग्रहण होते. त्यांच्या वडिलांचे नाव

जगन्नाथ (टोपणनाव पुरंदरमिश्र) व आईचे नाव शचीदेवी. शचीदेवींचे वडील नीलांबर चक्रवर्ती प्रख्यात ज्योतिषी होते व त्यांनी हा मुलगा श्रेष्ठ पुरुष होणार, असे भविष्य वर्तविले होते. चैतन्यांचे पाळण्यातील नाव विश्वंभर होते. आई त्यास 'निमाई'(निंब वृक्षाच्या सावलीत जन्मला म्हणून) म्हणायची. त्यांच्या गौर वर्णामुळे व सुंदर रूपामुळे 'गौर', 'गौरांग', 'गौरहरी'ह्या नावांनीही त्यांना संबोधले जाई. संन्यास घेतल्यानंतर 'श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभू'असे नाव त्यांनी धारण केले व याच नावाने ते प्रख्यात झाले.

लहानपणापासून चैतन्यांना नृत्याची आवड होती. 'हरी'नाम उच्चारताच ते नाच करीत व त्यांचे ते नृत्य सर्वांना मोहक वाटे. नृत्य, खेळ व खोड्या करण्यात त्यांचे बालपण गेले. चैतन्यांचे वडीलबंधू विश्वरूप सोळा वर्षांचे असतानाच त्यांना वैराग्य उत्पन्न झाले आणि संसारात पडण्यापूर्वीच एके दिवशी ते घरातून निघून गेले. त्या वेळी चैतन्यांचे वय अवघे सहा वर्षांचे होते. त्यांचा वडीलभावावर फार जीव होता. त्यांच्या नाहीशा होण्याने चैतन्यांच्या बालमनावर आघात झाला व ते हूडपणा सोडून देऊन शांत बनले. ते अकरा वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले व आतापर्यंत शिक्षणाकडे दुर्लक्ष केलेल्या चैतन्यांनी आईच्या आग्रहास्तव पंडित गंगादास यांच्या पाठशाळेत नाव घातले. तेथे दोन वर्षे व्याकरण व दोन वर्षे साहित्याचा अभ्यास करून विष्णुमिश्र पंडितांकडे 'स्मृति' व ज्योतिषाचा त्यांनी अभ्यास केला. त्यानंतर दोन वर्षे सुदर्शन मिश्र यांच्याकडे षड्दर्शनांचा अभ्यास करून वासुदेव सार्वभौम यांच्या पाठशाळेत न्याय व तर्कशास्त्राचा त्यांनी अभ्यास केला. अद्वैताचार्यांकडे त्यांनी वेदपठण व भागवताचे अध्ययन केले व 'विद्यासागर' ही पदवी मिळवली. कुशाग्र बुद्धीचे चैतन्य सर्व विद्याशास्त्र पारंगत होऊन विद्वत्श्रेष्ठ म्हणून आपल्या सहाध्यायांत गणले जाऊ लागले. शास्त्रार्थ करण्यात ते निष्णात होते. त्यांची तर्कसंगत विधाने ऐकून महान विद्वान व पंडितही स्तंभित होत.

वयाच्या सोळाव्या वर्षी वल्लभाचार्यांची कन्या लक्ष्मी हिच्याशी चैतन्यांचा विवाह झाला. त्याच वेळी म्हणजे १५०२ मध्ये त्यांनी आपली स्वतःची पाठशाळा काढली व तेथे ते व्याकरणाचे शिक्षण देऊ लागले. १५०३ मध्ये त्यांनी पूर्व बंगालची यात्रा केली व आपल्या पूर्वजांच्या श्रीहट्टस्थानाला भेट दिली. तेथे त्यांना बरीच द्रव्यप्राप्ती झाली. इकडे घरी त्यांची पत्नी सर्पदंशाने मरण पावली. त्यानंतर पंडित सनातनमिश्र यांची कन्या विष्णुप्रिया हिच्याशी त्यांनी दुसरे लग्न केले (१५०४). दिग्विजयी विद्वान केशव काश्मीरीस त्यांनी साहित्यचर्चेत पराभूत केल्याने नडियातील सर्वश्रेष्ठ विद्वानांत त्यांची गणना होऊ लागली. दुसऱ्या वर्षी ते वडिलांचे पिंडदान करण्यासाठी गयेला गेले. तेथे विष्णुपदाच्या दर्शनास गेले असता, त्यांची माधवेंद्रपुरी यांचे शिष्य ईश्वरपुरी यांच्याशी भेट झाली. ईश्वरपुरींची भेट चैतन्यांच्या जीवनातील महत्त्वाची घटना होय. दर्शन करता करताच ते एकाएकी उन्मनी अवस्थेत पोहोचले व खाली कोसळले. ईश्वरपुरींनी त्यांना सावरले आणि शुद्धीवर आणले. चैतन्यांतील पंडित नाहीसा झाला व प्रेमळ भक्त अवतरला. ईश्वरपुरींनी त्यांना 'गोपी जनवल्लभाय नमः' हा दशाक्षरी मंत्र देऊन अनुग्रहित केले. चैतन्यांच्या मनात लगेचच वैष्णवांचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या मथुरेला जायचे होते परंतु त्यांच्या सोबत्यांनी त्यांचे मन वळवून त्यांना परत आपल्या गावी नेले. निमाई पंडित नडियास परतले ते पार बदलून. श्रीहरीचे ध्यान व स्मरण करीत त्याच्या भेटीकरिता ते तळमळू लागले. 'माझा कृष्ण मला भेटवा' असे म्हणत ते हिंडू लागले. अध्यापन व संसारातील त्यांचे लक्ष पार उडाले. तहानभूकही ते विसरले. नामसंकीर्तन करीत ते घरात बसून असत. हळूहळू त्यांचा शिष्यसंप्रदाय वाढू लागला व चैतन्य त्यांच्या अनुयायांसह कृष्णविष्णूचे नामसंकीर्तन करीत नाचू लागले. सार्वजनिक रीत्या नामसंकीर्तनाचा हा प्रारंभ होय. चैतन्यांच्या या संकीर्तनाला खूपच गर्दी लोटू लागल्याने चैतन्य आणखी काही मंडळींसह आपला शिष्य श्रीवास पंडित याच्या घरी रात्री संकीर्तन करू लागले. हळूहळू त्यांना माधवाचार्य, शुक्लांबर, पुंडरीक, हरिदास, नित्यानंद ही मंडळीही मिळाली व त्यांचे शिष्य बनली. १५०८ मध्ये चैतन्यांना भगवंताचा साक्षात्कार झाला आणि ते परमेश्वरावतार समजले जाऊ लागले. त्यांनी हरिनामाचा व भजनकीर्तनाचा असा काही प्रचार केला, की बंगालच नव्हे तर संपूर्ण उत्तर भारतात त्यांच्या नावाचा उद्घोष ऐकू येऊ लागला. चैतन्यांचा भक्तिसंप्रदाय व लोकप्रियता जशी वाढत होती तसा त्यांना होणारा विरोधही वाढत होता. हे विरोधक शाक्तपंथी तसेच सनातनी पंडित होते. त्यांनी चैतन्यांना त्रास देण्याकरिता चाँद काजी नावाच्या मुसलमान अधिकाऱ्याकडे तक्रार केली. परिणामी सार्वजनिक संकीर्तन बंद करण्यात आले. चैतन्यांनी या

विरोधास न जुमानता गावभर फिरून संकीर्तन करण्याचे ठरविले.'हरिबोल'गजरात अलोट गर्दीत चैतन्य गात, नाचत चाँद काजीच्या घरापुढे आले. ती मिरवणूक उधळून लावण्याकरता काजीने शिपाई धाडले पण चैतन्यांचे दिव्यतेज व हरिनामाचा गजर यांत ते शिपाई भान हरपले व तेही त्या गजरात सामील झाले. एवढेच नव्हे, तर स्वतः काजीही नंतर त्यात सामील झाला. हळूहळू सर्व नवद्वीप चैतन्यांच्या हरिनामाने फुलून गेले. इस्लामधर्मीय जगाई व माधाई यांचे धर्मांतर आणि मतपरिवर्तन हे चैतन्यांच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचे कार्य होय. १५०८ मध्ये त्यांनी श्रीकृष्णलीलांच्या अज्ञात स्थळांचा शोध केला.

चोविसाव्या वर्षी (१५०९) चैतन्यांनी केशव भारतींकडून संन्यासदीक्षा घेतली. आईच्या आग्रहास्तव ते जगन्नाथपुरीस जाऊन राहिले व त्यांनी भक्तिमार्गाचा प्रचार सुरू केला. ते स्वतःस राधा समजत व कृष्णाच्या भेटीकरिता तळमळत भजन करीत. येथेच त्यांनी त्यांचे न्यायशास्त्राचे गुरू वासुदेव सार्वभौम यांना ब्रह्मज्ञानापेक्षा भगवत्‌भक्तीचे श्रेष्ठत्व पटवून दिले व आपल्या पंथात आणले. काही वर्षांनंतर त्यांनी उत्तर, पश्चिम आणि दक्षिण भारताच्या तीर्थयात्रा केल्या. वृंदावन येथे चैतन्यांनी आपल्या वैष्णव संप्रदायाची प्रतिष्ठापना केली. त्यांच्या आधी माधवेंद्रपुरी यांनी मथुरेस कृष्णभक्तीचा प्रचार सुरू केला होताच. वृंदावनाहून परत येताना चैतन्यांना रूप व सनातन हे गोस्वामी भेटले. चैतन्यांनी त्या दोघांना वृंदावनास वैष्णवधर्माचा प्रसार करण्यासाठी पाठविले.

आयुष्याची शेवटची अठरा वर्षे (१५१५—३३) चैतन्य महाप्रभूपुरतीच भगवत्‌भक्तीचा प्रचार करत होते. जगन्नाथमंदिरात गरुडस्तंभापाशी डोळे मिटून ते तासन्‌तास उभे रहायचे. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असायच्या. मठात परतल्यावर गंगाधर पंडित त्यांना भागवत वाचून दाखवायचे. त्यांचे बालमित्र स्वरूप, दामोदर हे त्यांना निरनिराळ्या कवींची कृष्णाविषयीची गाणी म्हणून दाखवायचे. त्यातच चैतन्यप्रभूंची समाधी लागायची. दरवर्षी रथोत्सवाच्या वेळी बंगालच्या कानाकोपऱ्यांतून चैतन्यांची भक्तमंडळी पुरीला जमून चार महिने त्यांच्या सहवासात काढायची. या रथोत्सवाने बंगाल व ओरिसा प्रांतीयांत जवळीक उत्पन्न झाली.

आषाढ शके १४५५ मध्ये जगन्नाथाच्या रथयात्रेत आनंदाने आत्मविस्मृत होऊन रथासमोर नाचत असताना महाप्रभूंच्या डाव्या पायाला विटकरीची कोच बोचली. तिसऱ्या दिवशी पायाच्या वेदना वाढल्या व त्यांना वात झाला. त्यातच भजनयात्रा समुद्रकिनाऱ्यावरून चालली असता अथांग समुद्राचे निळे-निळे पाणी पाहून चैतन्यांना भास झाला, की घननीळ श्रीकृष्ण समोर उभा आहे. त्यांनी 'हे कृष्ण, हे श्याम'म्हणत समुद्राकडे धाव घेतली व पाहता पाहता ते त्यात विलीन झाले. रविवार सप्तमीला चैतन्य महाप्रभूंची प्राणज्योत निमाली.

चैतन्य महाप्रभूंचा विलक्षण प्रभाव बंगाल आणि लगतच्या प्रदेशावर पडला. भगवत्‌भक्तीचा प्रचार व प्रसार महाराष्ट्र आणि अन्य प्रांतांत चैतन्यांच्या पूर्वीच झालेला होता पण बंगाल, ओरिसा इ. पूर्वाचल प्रदेशांत पूर्वापार चालत आलेला सनातन धर्मच रूढ होता. चैतन्य महाप्रभूंनी ब्रह्मज्ञानापेक्षा भगवत्‌भक्तीचे सामर्थ्य लक्षात घेऊन तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यापेक्षा विद्वानांपासून जडांपर्यंत, ब्राह्मणांपासून शूद्र, अंत्यज, चांडालांपर्यंत सर्वांना सहजसुलभ असा भक्तिमार्ग उपलब्ध करून दिला हरिनामसंकीर्तनाचा प्रसार सुरू केला. कृष्णाला आपले उपास्य दैवत समजून शुद्ध, निर्मळ आणि पवित्र आचरणाने व अढळ श्रद्धेने त्यांनी बंगाल-ओरिसातच नव्हे, तर मथुरा-काशीपर्यंत 'हरिनामा'चे माहात्म्य प्रस्थापित केले. त्यांनी त्याकरिता स्वतः ग्रंथरचना केली नाही परंतु इतरांना काव्यनिर्मितीची प्रेरणा दिली. त्यांचे शिष्य कृष्णदास कविराज यांनी चैतन्यचरितामृत हा ग्रंथ लिहून बंगाली काव्यरचनेस सुरुवात केली. वृंदावनदासाने चैतन्यभागवत रचले. लोचनदास कवीने चैतन्यमंगलची रचना केली. अशा प्रकारे चैतन्यांनंतर (सोळाव्या शतकात) बंगाल-ओरिसात पांचाली शैलीत साहित्यनिर्मितीस आरंभ झाला आणि नंतर साहित्यिक दृष्ट्या बंगाली भाषा व साहित्य मान्यता पावू लागले.

**नामदेव : (२६ ऑक्टोबर १२७०—३जुलै १३५०).**

वारकरी संप्रदायाच्या ज्ञानदेवादी श्रेष्ठ संतकवींपैकी एक. पित्याचे नाव दामाशेटी आईचे गोणाई. नरसी-बामणी हे त्यांच्या घराण्याचे मूळ गाव म्हणून सांगितले जाते तथापि हे गाव नेमके कोठले ह्याबद्दल अभ्यासकांत ऐकमत्य नाही. कराडजवळील नरसिंगपूर हेच ते गाव असावे, असे एक मत आहे. नरसी-बामणीचा 'नरसी-ब्राह्मणी' असा उल्लेख करूनमहाराष्ट्र—सारस्वतकार वि.ल. भावे ह्यांनी ते सोलापूरकडचे गाव असल्याचे म्हटले आहे तथापि असे गाव सोलापूर जिल्ह्यात नाही. मराठवाड्यात नरसी आणि बामणी अशी दोन गावे आहेत.त्यांतील अंतरही फारसे नाही. नरसी ह्या गावाजवळच नामदेवांची समाधी व देऊळ आहे. ह्या गावी त्यांच्या घराची जागा दाखविली जाते. त्यांचे आजोळ कल्याणी किंवा काणणी हेही ह्याच परिसरातले. नरसी आणि बामणी ही दोन स्वतंत्र गावे असली, तरी त्यांचा उल्लेख एकत्रच केला जातो. हे लक्षात घेऊन नामदेवांची नरसी-बामणी ही ह्या दोन गावांत सामावलेली असावी, असे सामान्यतः मानले जाते.नामदेवकृत म्हणून समजले जाणारे एक 'आत्मचरित्र' नामदेवांच्या संकलित गाथ्यात अंतर्भूत आहे.त्यात "गोणाई दामाशेटी झाले पाणिग्रहण । संसारी असोन नरसीगावी ।।" असा निर्देश सापडतो.

नामदेवांचा जन्म नरसी-बामणीचा, की पंढरपूरचा ह्या संबंधीही वाद आहे. वि.ल.भावे व महाराष्ट्रकवि चरित्रकार ज.र.आजगावकर ह्यांच्या मते नामदेव नरसी-बामणी येथेच जन्मले तथापि नामदेव पंढरपुरी जन्मल्याचा निर्वाळा बहुतेक प्राचीन संतचरित्रकारांनी दिलेला आहे. एकनाथांनी लिहिलेल्या नामदेव-चरित्रावरून नामदेवांच्या आईने पुत्रप्राप्तीसाठी पंढरीच्या विठोबास नवस केला होता आणि त्यापूर्वीच नामदेवांचे आईवडील पंढरपुरात येऊन राहू लागल्याचे दिसते. नामदेवांचे बालपण पंढरपुरात गेल्याचेही ह्या चरित्रात नमूद आहे.

नामदेवांच्या नावावर मोडणारे उपर्युक्त 'आत्मचरित्र' हा नामदेवांचे चरित्रविषयक तपशील जाणून घेण्याच्या दृष्टीने उपयोगात आणला जाणारा एक मुख्य आधार आहे.त्यानुसार असे दिसते,कीनामदेवांच्या घरचा व्यवसाय शिंप्याचा होता.'शिंपियाचे कुळी जन्म मज झाला' असेत् यातम् हटले आहे.नामदेवांच्या घरात विठ्ठलभक्तीचे वातावरण होते. नामदेवांनाही बाळपणापासून विठ्ठलभक्तीची ओढ लागली. एकदा विठ्ठलासाठी नैवेद्य घेऊन देवळात गेलेले नामदेव देव नैवेद्य खाईना, म्हणून त्याच्या पायांवर डोके आपटून प्राण द्यावयास निघाले आणि भक्तवत्सल देवाने त्यांची ही भक्ती पाहून नैवेद्य आनंदाने खाल्ला, अशी आख्यायिका आहे. नामदेवांचा विवाह राजाई नावाच्या स्त्रीशी झालेला होता आणि तिच्यापासून त्यांना नारायण, महादेव, गोविंद आणि विठ्ठल असे चार पुत्र झाले लिंबाई नावाची एक मुलगी झाली. विठ्ठलभक्तीमुळे नामदेव उत्तरोत्तर विरक्त होत चालले. घरातील परिवार मोठा होता. त्याची जबाबदारी नामदेवांनी घेतली पाहिजे, असे त्यांच्या मातापित्यांस वाटे. त्यामुळे नामदेवांच्या विठ्ठल वेडाला त्यांच्या घरातून विरोध होऊ लागला.नामदेव भक्ती-परमार्थाच्या मार्गावरून ढळले नाहीत उलट हे कुटुंबच भक्तिमार्गाशी समरसले.

सुमारे १२९१ मध्ये नामदेवांची ज्ञानदेवांशी भेट झाली असावी.आपली भक्ती गुरूपदेशावाचून अपुरीच आहे, ह्याची जाणीव ह्या भेटीनंतर त्यांना झाली आणि त्यांनी औंढा नागनाथ येथे जाऊन विसोबा खेचरांकडून उपदेश घेतला त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. अशी आख्यायिका आहे, की नामदेवविसोबांना भेटावयास गेले असता, विसोबा शंकराच्या देवळात पिंडीवर पाय ठेवून निजले होते. ते दृश्य पाहून नामदेवांना चीड आली व त्यांनी विसोबांची निर्भर्त्सना केली परंतु विसोबांनी देव नसेल तेथे माझे पाय उचलून ठेव, असे म्हटल्यावर 'देवाविण ठाव हे बोलणेचि वाव' हा विचार नामदेवांच्या मनाला भिडला. गुरूपदेशामुळे त्यांचा अहंकार नष्ट झाला.विशुद्धभक्तीला अद्वैतबोधाचे अधिष्ठान प्राप्त झाले.

पुढे श्रीज्ञानदेव पंढरपूर येथे आले आणि 'भूतळीची तीर्थे पहावी नयनी' अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. 'सर्वसुख आहे मज पांडुरंगी' अशीच नामदेवांची धारणा असल्यामुळे तीर्थयात्रा करण्याची त्यांना आवश्यकता वाटत नव्हती परंतु अखेरीस ते ज्ञानदेवांबरोबर निघाले. महाराष्ट्रातील अनेक संत ह्या तीर्थयात्रेत सामील झालेले होते.

रतातील अनेक तीर्थे त्यांनी पाहिली. ह्या तीर्थयात्रेहून परतल्यानंतर ज्ञानदेवांनी लवकरच समाधी घेतली (१२९६). तो रसंग नामदेवांनी पाहिला. नामदेव त्यावेळी अवघे सव्वीस वर्षांचे होते आणि त्यानंतर आपल्या आयुष्याची उर्वरित ५४ वर्षे त्यांनी भागवत धर्माच्या प्रचारासाठी वेचिली.'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूजगी' ही त्यांची भूमिका होती. नामदेवांच्या चरित्राचे आणि कार्याचे एक अभ्यासक ग. वि. कविटकर ह्यांनी असे मत मांडले आहे, की ह्या दीर्घकाल खंडात मदेवांनी भारतभर अनेक पदयात्रा केल्या दक्षिणेतील श्री शैलशिखर, अरुणाचल, चिदंबरम्, विष्णुकांची, रामेश्वर आदी ठिकाणांना त्यांनी भेटी दिल्या होत्या त्यांच्या प्रभावामुळे दक्षिणेतील दर्जी ही जात स्वतःला नामदेव म्हणवून घेऊ लागली, तर भूसागर आणि मल्ला ह्या जातींनी 'नामदेव' हे आपल्या जातीचे एक पर्यायी नाव म्हणून स्वीकारले गुजरात, सौराष्ट्र, सिंधुप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब, हिमाचल प्रदेश येथेही नामदेवांचे वास्तव्य झाले होते. लोक जागृतीच्या ध्येयपूर्तीसाठी विविध प्रदेशांतील भाषा त्यांनी आत्मसात केल्या होत्या, असे ही कविटकर ह्यांचे प्रतिपादन आहे.

नामदेव उत्तर भारतात गेले असल्याची प्रमाणे अनेक प्रकारे मिळतात.विशेषतः पंजाबातील त्यांच्या वास्तव्याची व कार्याची जाणीव आजही ठळकपणे मिळते. 'नामदेवजी की मुखबानी' म्हणून प्रसिद्ध असलेली नामदेवांची हिंदी भाषेतील ६१ पदे शिखांच्या ग्रंथसाहिबात अंतर्भूत आहेत.त्यांतील ३ विवक्षित पदे अन्य कवींची आहेत, असे एक मत आहे. नामदेवांच्या हिंदीवर मराठीची छाप तर आहेच परंतु व्रज, अवधी, राजस्थानी अशा भाषांचेही संस्कार आहेत. व्रजादी भाषा बोलणाऱ्या प्रदेशांत त्यांचे वास्तव्य झाल्याचे आणि त्यांनी ह्या भाषा निदान काही प्रमाणात आत्मसात केल्याचे हे द्योतक आहे.नामदेवांची सुमारे सव्वाशे हिंदी पदेही आता उपलब्ध झालेली आहेत.विष्णुस्वामी, बहोरदास किंवा बोहरदास, जाल्लो, लध्धा, केसो कलंधर किंवा कलधारी ह्यांसारखे अनेक शिष्य नामदेवांना पंजाबात मिळाले. त्यांपैकी जाल्लो किंवा जाल्हण सुतारासारखे काही शिष्य नामदेवांसोबत पंढरपूरला आले. केसो कलधारी ह्याने भावलपूर संस्थानात भागवत धर्माची ध्वजा फडकविली. तेथे 'कलधारिकी गद्दी' ह्या नावाने प्रसिद्ध असलेला त्याचा आश्रम तसेच त्याची समाधीही आहे. नामदेवांची अनेक मंदिरे आज पंजाबात पहावयास मिळतात. पंजाबातील गुरदासपूर जिल्ह्यात घुमान किंवा घोमान गावी असलेले मंदिर (गुरुद्वारा बाबा नामदेवजी) प्रसिद्ध आहे. नामदेवांचे शिष्य बोहरदास यांनी हे मंदिर उभारले, असे म्हणतात. प्रतिवर्षी माघ शुद्ध द्वितीयेस येथे मोठी यात्रा भरते. राजस्थानात आणि उत्तर प्रदेशातही नामदेवमंदिरे आहेत. उत्तर भारतातील रैदास (रविदास किंवा रोहिदास), धना, रज्जब, तुलसीदास, पीपा, रामानंद, कबीर आदींनी नामदेवांचा उल्लेख केलेला आहे. गुजरातमधील विख्यात संत नरसी मेहतांनीही आपल्या काव्यातून नामदेवांचा निर्देश अनेकदा केलेला आहे. देवाने नामदेवांच्या घराचे छप्पर शाकारले, असे राजस्थानातील संत मिराबाईंनी आपल्या एका कवनात म्हटले आहे. उत्तर भारतात प्रसिद्धी पावलेले नामदेव हे दुसरेच कुणी नामदेव असावेत, ही शंका विविध अभ्यासकांनी साधार खोडून काढलेली आहे. ग्रंथसाहिबातील पदांवरील मराठीची छाप, त्यांत येणारा 'बीठलु' हा विठ्ठलवाचक शब्द, नामदेवांच्या रूढ चरित्राशी मिळतेजुळते असे ह्या पदांतून येणारे काही उल्लेख पाहता पंजाबात गेलेले नामदेव कुणी वेगळे नव्हते, ही बाब स्पष्ट होते.

ऐंशी वर्षांचे वय झाल्यानंतर इहलोक सोडून जाण्याचे त्यांनी ठरविले. आषाढ शुद्ध एकादशी, शके१२७२ रोजी विठ्ठलापुढे जाऊन 'आज्ञा द्यावी' अशी विनंती केली. त्यानंतर आषाढ वद्य त्रयोदशी, शके१२७२ ह्या दिवशी त्यांनी पंढरपूर येथे विठ्ठलमंदिराच्या महाद्वारात समाधी घेतली. विठ्ठलदर्शनासाठी येणाऱ्या सर्व संतसज्जनांची धूळ आपल्या मस्तकी लागावी, ही त्यांची इच्छा असल्यामुळे महाद्वाराच्या पहिल्या पायरीखालीच हे समाधिस्थान तयार करण्यात आले होते.

नामदेवांच्या कुटुंबीयांनीही जनाबाईसह ह्याच दिवशी समाधी घेतली, असे म्हटले जाते. नामदेवांची सून लाडाई हिचे नाव शेवटी गुंफलेला एक अभंग मिळतो. त्यातून मिळणाऱ्या वृत्तांतानुसार लाडाई ही ह्या प्रसंगी कल्याणी येथे प्रसूतीसाठी गेलेली होती त्यामुळे तिला मात्र ह्या भाग्याला वंचित व्हावे लागले. 'ऐकिला वृत्तांत सर्व जाले गुप्त । माझेंचि संचित खोटे कैसें ।।' असे उद्गार ह्या अभंगात आढळतात. 'सर्व जाले गुप्त' ह्या शब्दांचा आधार उपर्युक्त वदंतेस आहे तथापि नामदेवांच्या वर्तुळातील एक संत परिसा भागवत ह्यांनी मात्र ह्या प्रसंगाचे वर्णन करीत असताना एकट्या

नामदेवांच्या समाधीचाच उल्लेख केलेला आहे. शिवाय ह्या समाधीनंतर नामदेवांचा पुत्र विठा किंवा विठ्ठल ह्याने लिहिलेले काही अभंग आहेत.'तळहाताची सावली करून तुमची वंशावळी पोशीन असे वचन, हे पांडुरंगा, तू दिल्याचे आमचे वडील आम्हाला सांगत असत पण ते तू विसरलास' अशा आशयाची तक्रार विठाने पांडुरंगाला उद्देशून रचिलेल्या एका अभंगात केल्याचे दिसते. त्यामुळे साऱ्यांनीच समाधी घेतली, ह्या वदंतेत तथ्य दिसत नाही.

नामदेवांच्या पूर्वचरित्राविषयी वाद आहेत. संत होण्यापूर्वी ते दरवडेखोर होते, असे मत महाराष्ट्रकविचरित्रकार आजगावकरांनी मांडलेले आहे. ह्या मताला नामदेवगाथेतील एका ५६ चरणी अभंगाचा आधार आहे. त्यात नामदेवाविषयी 'प्राक्तनाचे योगे । भरलासे ओहटा । पाडितसे वाटा चोरांसंगे ।। ब्राह्मण, कापडी । गरीब साबडी । केली प्राणघडी बहुतांची ।।' असे म्हटलेले आहे. तथापि हा अभंग त्यात आढळणाऱ्या काही फार्सी शब्दप्रयोगांवरून उत्तरकालीन आणि प्रक्षिप्त वाटतो. नामदेवगाथेत नामदेवांचे आत्मचरित्र म्हणून ओळखले जाणारे १६५ अभंग आहेत.नामदेवांची पत्नी राजाई हिने रुक्मिणीकडे नामदेवांसंबंधी केलेली तक्रार त्यांत आलेली आहे. त्यात राजाई सांगते, की सुई आणि कातर हीच शिंप्याची शस्त्रे असता 'हा बाण आणि सुरी वागवीतसे'. तथापि उपर्युक्त १६५ अभंगांना नामदेवांचे आत्मचरित्र निःसंदेहपणे म्हणण्यासारखी परिस्थिती नाहीच, हे रा. चिं. ढेरे ह्यांनी दाखवून दिले आहे. वर उल्लेखिलेल्या ५६ चरणी अभंगातच नव्हे, तर ह्या तथाकथित आत्मचरित्रातही अन्य काही ठिकाणीही बरेच फार्सी शब्द आलेले आहेत. शिवाय त्यात एके ठिकाणी नामदेवांच्या तोंडून कबीर आणि रोहिदास ह्या उत्तरकालीन संतांची स्तुती वदविली आहे. त्यामुळे नामदेवांनंतर काही शतकांनी कुणी तरी हे अभंग लिहिले असावेत, असे मत ढेरे ह्यांनी मांडलेले आहे.

नामदेवांनी शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली होती, असे म्हटले जाते तथापि ती त्यांना पूर्ण करता आली, असे दिसत नाही. नामदेवांचे म्हणता येतील असे सु. पाच-सहाशे अभंगच आज उपलब्ध होतात.नामदेवगाथांमध्ये अंतर्भूत असलेले पुष्कळसे अभंग नामदेवांचे वाटत नाहीत. 'विष्णुदास नामा' नावाचा एक संत सोळाव्या शतकात होऊन गेला. त्याचे पुष्कळसे अभंग नामदेवांचे म्हणून समजण्याची चूक घडत आलेली आहे. नामदेवगाथांत ह्या विष्णुदास नाम्याचे, तसेच 'नामदेव' आणि 'नामा यशंवत' ह्या दोन अन्य नामदेवांचे अभंगही अंतर्भूत आहेत. आजही खरीखुरी नामदेवगाथा निर्णायकपणे निश्चित करणे अभ्यासकांना शक्य झालेले नाही. अशा ह्या गाथांतून जे अभंग सामान्यतः नामदेवांचे मानले जातात त्यांत 'आदि', 'तीर्थावळी' आणि 'समाधी' अशा तीन प्रकरणांत सांगितलेले ज्ञानेश्वरचरित्र आहे. त्या आधारे ते ज्ञानेश्वरांचे आद्य चरित्रकार समजले जातात परंतु हे चरित्रसुद्धा खरोखरच नामदेवकृत आहे किंवा काय, ह्या बद्दलही ढेरे ह्यांच्यासारख्या साक्षेपी अभ्यासकांनी शंका व्यक्त केलेली आहे. त्या चरित्राची निवेदनशैली पौराणिक आहे.नामदेवांसारखा समकालीन करणार नाही अशा चुकाही त्यात आहेत.साधी पण भावोत्कट अभिव्यक्ती हे नामदेवांच्या म्हणून मानल्यागेलेल्या बहुतेक रचनांचे वैशिष्ट्य आहे.शब्दकळेचे प्राचीनत्वही ह्या रचनांतून लक्षणीयपणे प्रत्ययास येते. नामदेवांच्या उत्कट ईश्वरभक्तीचा अत्यंत विलोभनीय असा आविष्कार त्यांत आढळतो. पहाटेच्या वेळी चारा आणावयास जाणाऱ्या पक्षिणीची वाट तिचे उपाशी पिलू पाहात राहते तशीच ईश्वरचरणांची आस आपणास रात्रंदिवस लागली असल्याचे त्यांनी एका अभंगात म्हटले आहे.'भेटी लागे माझा फुटतसे प्राण', असा आवेग व्यक्तविणारे नामदेव प्रसंगी देवावर रुसून 'पतितपावन नाम ऐकूनी आलो मी द्वारा । पतितपावन नव्हेसी म्हणूनी जातो माघारा' असे बोलही त्याला ऐकवितात परंतु देवावरचा त्यांचा रुसवाही भक्तीचे एक निरागस रूप म्हणून पुढे येतो, कारण विठ्ठलाशी त्यांनी जोडलेले नाते मूल माऊलीचे आहे.'तू माझी माऊली मी तुझे वासरू । नको पान्हा चोरू पांडुरंगे ।' असा त्यांचा आर्तोद्‌गार ह्याच नात्यातून सहजपणे उमटतो. 'विठ्ठल आमुचे सुखाचे जीवन ।' विठ्ठलस्मरण प्रेमपान्हा ।।' व 'विठ्ठलचि पाही सर्वांभूती ' ह्या शब्दांत त्यांनी आपल्या जीवनाचा आशय सांगून टाकलेला आहे.विठ्ठलाचे हे सर्वांभूती असणे ग्रंथसाहिबात अंतर्भूत असलेल्या आपल्या पदांतूनही नामदेव आवर्जून सांगतात (जत्र जाऊ तत बिठलू भैला).एका पदात आपल्या व्यवसायावर एक रूपक करून त्यातून आपले अंतःकरण हरीशी शिवले गेले असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे(सुईने की सुई रूपे का धागा । नामे का चितु हरि सउ लागा ।।).नामदेवांचे

म्हणून सांगितले जाणारे एक चित्र लॉरेन्सबिनयन आणि आर्नोल्ड ह्यांच्या द कोर्ट पेंटर्स ऑफ द ग्रँड मुघल्स ह्या पुस्तकात दिलेले आढळते. धाबळी पांघरलेले आणि गळ्यात तुळशीमाळ घातलेले नामदेव विविध हिंदू-मुसलमान साधूंसमवेत त्यात दाखविलेले आहेत. नामदेवांच्या चित्रावर त्यांचे नावही अरबी लिपीत आहे.मात्र हे चित्र समकालीन नसून सतराव्या शतकातले आहे.

**एकनाथ, संत : (१५३३—१५९९).**

महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ संतकवी. जन्म पैठण येथे. संत भानुदासांचे पणतू. वडिलांचे नाव सूर्यनारायण आणि आईचे रुक्मिणी. त्यांचे वडील मोठे पंडित असावेत, असे एक मत आहे. बालपणीच आईवडील निवर्तल्यामुळे एकनाथांचे संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी केले. वयाच्या बाराव्या वर्षी एकनाथांनी देवगिरी येथील जनार्दनस्वामींकडे जाऊन त्यांचे शिष्यत्व पतकरले. तेथे सहा वर्षे राहून संस्कृत शास्त्रपुराणांचे व ज्ञानेश्वरीसारख्या अध्यात्मग्रंथांचे अध्ययन त्यांनी केले. गुरुकृपेने परमेश्वरी साक्षात्कार झाल्यावर एकूण सात वर्षे त्यांची तीर्थयात्रेत घालविली. या तीर्थयात्रेत प्रथम काही दिवस जनार्दनस्वामी त्यांच्याबरोबर होते. तीर्थयात्रेनंतर त्यांनी गृहस्थाश्रभ स्वीकारला. गिरिजा हे त्यांच्या पत्नीचे नाव. एकनाथांना हरिपंडित नावाचा एक मुलगा आणि गोदा, गंगा या नावाच्या दोन मुली होत्या. कर्नाटकातील डंबळ येथील बाळकृष्णवंत चंद्रकेत ह्यांना दुसरी मुलगी दिली होती. प्रसिद्ध मराठी पंडित कवी मुक्तेश्वर हा गोदेचा मुलगा. कवी शिवराम पूर्णानंद हा नाथांचा मुलीकडून पणतू. हरिपंडित हा कर्मठ व सनातनी असल्याने काही काळ एकनाथांचा विरोधक होता. आळंदीस जाऊन नाथांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला (१५८३) आणि त्यानंतर ज्ञानेश्वरीची संहिता शुद्ध केली (१५८४). पैठण येथेच फाल्गुन वद्य षष्ठीस त्यांनी देह ठेवला. अस्पृश्याच्या चुकलेल्या मुलास कडेवर घेऊन महारवाड्यात पोहोचवणे, श्राद्धाला ब्राह्मण येईनात, तेव्हा शिजवलेले अन्न अस्पृश्यांना खाऊ घालणे व गाढवाला गंगोदक पाजणे यासारख्या एकनाथांच्या चरित्रातील आख्यायिकावरून अद्वैत वेदान्ताचा व्यापक अर्थ त्यांच्या अंगी प्रत्यक्ष बाणलेला होता, हे दिसून येते. एकनाथ, विठा रेणुकानंदन, जनी जनार्दन, रामा जमार्दन आणि दासोपंत ह्या पाच समकालीन सत्पुरुषांना नाथपंचक म्हटले जाते. यांपैकी दासोपंतांची बरीच आणि जनी जनार्दनांची काही मराठी रचना उपलब्ध आहे. चतु:श्लोकी भागवत (सु. १५५५) ही नाथांची पहिली रचना. भागवत पुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायातील ३२ ते ३५ श्लोकांवरील १,०३६ ओव्यांचे हे भाष्य आहे. सृष्टीच्या आद्यंती असलेल्या नारायणाचे व भागवत धर्माचे निरूपण त्यात आढळते. प्राकृत भाष्याग्रंथांना पंडितवर्गाकडून होणाऱ्या विरोधाचे पडसाद येथे उमटले आहेत.

वरील भाष्यानंतर एकनाथांनी काही आध्यात्मिक स्वरूपाची स्फुट प्रकरणे लिहिली. शंकराचार्यांच्या हस्तामलक या चौदा श्लोकांच्या स्तोत्रावर ६७४ ओव्यांची रसाळ टीका त्याच नावाने त्यांनी लिहिली. शुकाष्टक हे प्रसिद्ध संस्कृत अष्टकावरील ४४७ ओव्यांचे विवरण आहे. स्वात्मसुखात ५१० ओव्या असून गुरुस्तवन, अद्वैतभक्ती व भक्तिमार्गातील परमार्थ हे विषय त्यात आले आहेत. आनंदलहरीतील १५० ओव्यांत आत्मस्थितीतील आनंदाचे व गुरुभक्तांचे वर्णन आहे. चिरंजीवपदात साधकाला उपदेश केलेला आहे.

रुक्मिणी स्वयंवर (१५७१) हे भागवत संप्रदायातील पहिले व परंपराप्रवर्तक आख्यानक काव्य होय. भागवताच्या दशम स्कंधातील अध्याय ५२ ते ५४ मधील १४४ श्लोकांच्या व हरिवंशातील विष्णुपर्वाच्या अध्याय ५९-६० च्या आधारे एकनाथांनी त्याची रचनी केली. त्याची ओवीसंख्या १,७१२ आहे. श्रीकृष्ण-रुक्मिणीचा विवाह म्हणजे जिवाशिवांचे मीलन, अशा रूपकाभोवती हे संपूर्ण काव्य रचलेले आहे. या काव्याचा प्रभाव पुढील अनेक कवींवर पडलेला दिसतो. कृष्णदयार्णव ह्या कवीने तर आपल्या हरिवरदा या रचनेत प्रस्तुत काव्य संपूर्णपणे अंतर्भूत केले. एकनाथी भागवत ही एकनाथांची सर्वश्रेष्ठ रचना होय. भागवत पुराणाच्या एकादश स्कंधावरील ही विस्तृत टीका आहे.

भावार्थ रामायण ही त्यांची अखेरची रचना. वाल्मीकी रामायण, अध्यात्म रामायण, क्रौंच रामायण, आनंद रामायण, योगवासिष्ठ इ. ग्रंथांच्या आधारे ही रचना केलेली आहे. 'बाल', 'अयोध्या', 'अरण्य', 'किष्किंधा', 'सुंदर' ही पहिली पाच कांडे आणि सहाव्या युद्ध कांडाचे ४४ अध्याय लिहून झाल्यानंतर नाथांनी देह ठेविला. त्यापुढील भाग गावबा नावाच्या त्यांच्या शिष्याने पूर्ण केला, असे परंपरा सांगते. याशिवाय मुक्तेश्वर, कोनेरीसुतशेष व एक अनाम कवी यांनी 'एका-जनार्दन' या नानानेच 'उत्तर'कांड लिहून भावार्थ रामायणाच्या पूर्तीचे प्रयत्न केले आहेत. भावार्थ रामायणाचे स्वरूप रामचरित्रावरील स्वतंत्र पौराणिक महाकाव्यासारखे आहे. एकनाथांच्या आवडत्य आध्यात्मिक रूपकांबरोबरच या काव्यात सामाजिक रूपकात्मताही आढळते. तत्कालीन यावनी सत्तेचा मराठी समाजावर झालेला अंतर्बाह्य अनिष्ट परिणाम त्यातून सूचित केला आहे.

या रचनांखेरीज बहुजनसमाजासाठी एकनाथांनी केलेली कथात्मक रचनाही वेधक आहे. सुबोध शैलीने लिहिलेल्या तुळशीमाहात्म्य व सीतामंदोदरीची एकात्मता या पुराणकथा, सांसारिकांच्या मनोवृत्तीचा आल्हादक व विनोदरम्य आविष्कार करणाऱ्या हळदुली व कृष्णदान ह्या श्रीकृष्णकथा, कृपण माणसाचे हास्यजनक स्वभावचित्र रेखाटणारे कदर्यु-आख्यान, ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यू आणि सुदामा यांच्या नाट्यपूर्ण लघुचरित्रकथा आणि ज्ञानेश्वरादी संतांच्या संक्षिप्त जीवनकथा ही अशा रचनेची उदाहरणे होत.

एकनाथांनी गेय पदरचनाही केली आहे. ही पदे मुख्यतः श्रीकृष्ण-चरित्रपर आहेत. त्यांत सुंदर शब्दचित्रे, भावपूर्णता, कल्पकता, ध्रुव-पदांची वेधकता, मार्मिक तत्त्वसूचकता इ. वैशिष्ट्ये आढळतात. 'वारियाने कुंडल हाले', 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा' इ. त्यांची पदे प्रसिद्ध आहेत.

प्राचीन मराठीतील भारूडरचनेत नवचैतन्य, विविधता व विपुलता निर्माण करण्याचे कार्य एकनाथांनीच केले. १२५ विषयांवर सु. तीनशे भारुडे त्यांनी रचली. पुरातन काळापासून मराठी बहुजन-वर्गाचे आपल्या मनोरंजक व नाट्यपूर्ण गीतरचनेने रंजन करणाऱ्या गोंधळी, भराडी, वासुदेव, डोंबारी, बाळसंतोष वगैरे जमातींचा एक वर्ग होता. एकनाथांनी त्यांच्या अलिखित लोककाव्याचे पुनरुज्जीवन केले. त्यांच्या कवित्वाची व्यापकता व लौकिकता यावरून स्पष्ट होते. आदिमाया, विंचू, जागल्या, कुडबुड्या जोशी या विषयांवरील त्यांची भारुडे प्रसिद्ध आहेत.

एकनाथांची बरीचशी रचना साडेचार चरणी ओवी छंदात आहे. त्यांनी स्फुट अभंगरचनाही केली आहे. गुरुभक्ती, पारमार्थिक अनुभव व सामाजिक स्थिती हे त्यांच्या अभंगांचे मुख्य विषय आहेत. त्यांत नामदेव-तुकारामांसारखा साधकदशेतील भावोत्कट अंतःकलह आढळतात नाही. रचनादृष्टीनेही एकनाथी अभंग सैल आहेत.

एकनाथांचे वाङ्मयीन, सांप्रदायिक व सांस्कृतिक कर्तृत्व त्यांच्या समन्वयवादी व्यक्तिमत्त्वाचेच निदर्शक आहे. प्रपंच व परमार्थ तसेच संतत्व आणि समाजोद्धार यांची यशस्वी सांगड आपल्या जीवनात त्यांनी घातली. जन्मजात स्वभावाबरोबरच तत्कालीन परिस्थितीनेही एकनाथांचे व्यक्तिमत्त्व घडविले.

अडीच शतकांच्या ज्ञानेश्वरोत्तर कालखंडात संतसाहित्याची परंपरा खंडित व विस्कळित झाली होती. एकनाथांनी त्या पूर्वपरंपरेचे भान ठेवून वाङ्मयनिर्मिती केली म्हणूनच ती परंपरा अखंड, एकात्म व प्रगमनशील राखण्याचे कार्य ते यशस्वीपणे करू शकले. ज्ञानेश्वरीच्याच परंपरेतील पण अधिक सुबोध भाष्यग्रंथ म्हणजे त्यांच भागवत होय. भागवतामुळे वामनपंडित, शिवकल्याण, रमावल्लभदास यांसारख्या कवींना भाष्यरचनेती स्थिर बैठक लाभली. त्यांच्या भावार्थ रामायणामुळे मुक्तेश्वरासारख्या कवीला रामायण व महाभारत यांच्या रूपांतराची दिशा लाभली. रुक्मिणी स्वयंवराने तर आख्यानक काव्याचा नवा प्रवाहच मराठीत रूढ केला. बहुजनसमाजाला रूपके समजतात व आवडतात, म्हणून एकनाथांच्या रूपकप्रचुर शैलीचा अवतार झाला. मराठीचा पुरस्कार करतानाही, सर्वसंग्राहक भाषादृष्टीने त्यांनी संस्कृत भाषेचे प्रौढत्व तिला प्राप्त करून दिले आणि आपल्या भारूडरचनेत बोलीभाषेचाही स्वीकार केला. वीररसाचा आविष्कार, अभंगरचनेतील भेदक समाजचित्रण, कीर्तनोपयोगी नाट्यपूर्ण

कथाकाव्य यांही बाबतींत संतसाहित्यातील पहिले कर्तृत्व एकनाथांचेच आहे. संतत्वात अभिप्रेत असलेल्या लोकसंग्रहाचे, लोकसेवेचे व लोकाद्धाराचे साधन म्हणूनच एकनाथांनी कवित्वाची साधना केली म्हणूनच त्यांच्या काव्यरचनेत आशयाभिव्यक्तीचे वैचित्र्य व वैपुल्य निर्माण झाले.

तेराव्या शतकात ज्ञानेश्वर-नामदेवांनी बहुजनसुलभ भक्तिमार्गाती प्रतिष्ठापना केली. पुढील अडीच शतकांत यावनी सत्तेमुळे भक्तिमार्गाचा प्रभाव क्षीण झाला. एकनाथांनी त्या भागवत पंथाचे प्रभावी पुनरुज्जीवन केले. आपल्या भागवत टीकेने भक्तिपंथाची त्यांनी शास्त्रोक्त प्रतिष्ठापना केली आणि बहुजनवर्गाचा मेळावा त्या पंथाभोवती संघटित केला. बागवत पंथाला अशा प्रकारे शास्त्र आणि समाज यांचे दुहेरी अधिष्ठान त्यांनी प्राप्त करून दिले. जनताजनार्दन हे एक नवे तत्त्व प्रतिपादून भागवत पंथाला त्यांनी अधिक लोकाभिमुख बनविले. या पंथाला श्रीकृष्णाप्रमाणेच श्रीराम हे दैवत नव्याने परिचित करून दिले व रामचरित्राचा वीरवृत्तिपोषक व कालोचित भावार्थही कथन केला. एकनाथांचा भागवतधर्म व रामराज्याची कल्पना म्हणजे मध्ययुगीन महाराष्ट्रातील प्रेरक विचारधन होय. मराठी भाषा, वाङ्मय, विचार आणि वर्तन या सर्व क्षेत्रांत त्यांनी समाजप्रबोधन व समाजसंघटन केले. त्यातूनच सतराव्या शतकातील स्वराज्याच्या चळवळीला अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली, असे म्हणता येईल.

**तुकाराम : (१६०८—९ मार्च १६५०).**

वारकरी संप्रदायाच्या ज्ञानदेवादी चार श्रेष्ठ संतांपैकी अखेरचे संतकवी. पित्याचे नाव बोल्होबा किंवा बाळोबाबावा मातेचे कनकाई. कुलनाम मोरे उपनाव अंबिले. तुकाराम महाराजांचा जन्म देहू (पुणे जिल्हा) येथला. आपल्या जातीचा ते शूद्र वा कुणबी असा उल्लेख करतात कित्येकदा यातिहीन म्हणजे कोणतीही जात नसलेला किंवा हीन जातीचा, असाही स्वतःचा निर्देश ते करतात. मोरेकुळ हे मराठा क्षत्रिय. तुकाराम हे मराठे क्षत्रिय असूनही स्वतःला शूद्र म्हणवतात, ह्याचे कारण संस्कारलोपामुळे त्यांना वेदपठणाचा अधिकार उरला नव्हता, हे होय. तुकोबांचा वंशपरंपरागत व्यवसाय वैश्याचा म्हणजे वाण्याचा होता. शिवाय त्यांच्या घराण्यामध्ये पूर्वापार महाजनकीची वृत्ती होती. महाजन म्हणजे बाजारपेठेच्या व्यापारव्यवहारांतील वजने—मापे, मालाची देवघेव इत्यादींवर देखरेख ठेवणारा आणि व्यापारी कर वसूल करणारा अधिकारी. त्यांच्या मालकीची आणि इनामाची शेती तसेच सावकारीही होती. सुखवस्तू व प्रतिष्ठित असे हे घराणे होते. वाडवडिलांपासून त्यांच्या घराण्यात विठ्ठलभक्तीची मिरास, एकादशीचा उपवास आणि पंढरीची आषाढी—कार्तिकी वारी. तुकाराम महाराजांच्या पूर्वीच्या आठ पिढ्यांची माहिती मिळते. त्यांच्या पूर्वीच्या आठव्या पिढीचा प्रमुख विश्वंभर ह्यांना एका शेतात विठ्ठल—रखमाईंच्या मूर्ती सापडल्या. नदीकाठावरील एका घरात त्या मूर्तींची त्यांनी प्रतिष्ठापना केली. ह्या घरास 'देऊळवाडा' असे म्हणत.

तुकाराम महाराजांची वंशावळ अशी : विश्वंभर → हरी → विठोबा → पदाजी → शंकर → कान्होबा → बोल्होबा आणि तुकाराम महाराज चैतन्य. तुकाराम महाराजांच्या आईला सावजी, तुकाराम आणि कान्होबा असे तीन मुलगे झाले. तिला दोन मुलीही झाल्या, असे काही संशोधक सांगतात.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे हे तुकारामांचा जन्मशक १४९० म्हणजे इ.स. १५६८ व निर्याणशक १५७१ म्हणजे सन १६५० मानीत होते. म्हणून तुकारामांचा एकूण आयुर्दाय त्यांनी ८० वर्षांचा ठरविला होता. तथापि तुकारामांच्या निर्याणकाली त्यांची पत्नी जिजाई ही गरोदर होती, ही वस्तुस्थिती राजवाडे ह्यांच्या ह्या निष्कर्षांशी विसंगत ठरते कारण राजवाडे ह्यांच्या मतास अनुसरले, तर ह्या वेळी जिजाईची साठी उलटून गेली, असे मानावे लागते. भक्तलीलामृत लिहिणाऱ्या महिपतीने तुकाराम महाराजांच्या पहिल्या २१ वर्षांची क्रमवार हकीकत देऊन तेथे पूर्वार्ध संपले, असे म्हटले आहे. हेही राजवाड्यांच्या संशोधनाशी जुळत नाही. महिपतीच्या ग्रंथातील इतर अनेक प्रसंग व व्यक्तिविषयक उल्लेख कालविसंगत ठरले, तरी त्यांतील कालक्रमाचे महत्त्व नाकारून चालत नाही.

तुकाराम महाराजांचे शिक्षण तत्कालीन सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित घराण्यांतील व्यक्तींप्रमाणे झाले होते, असे दिसते. त्यांच्या साहित्यात संस्कृत—प्राकृत ग्रंथांच्या व्यापक अध्ययनाची आणि सखोल व्यासंगाची अनेक प्रमाणे

मिळतात. भक्तिमार्गात असताना पातंजल योगमार्गाचाही त्यांना शोध झाला होता, असे काही अभंगांवरून दिसते. मालकीचे पांडुरंगमंदिर असल्याने तेथे होणारी नित्यनैमित्तिक भजने, कीर्तने, पुराणे ऐकून लहान वयातच त्यांना बहुश्रुतपणा आलेला होता. घरचा व्यवसाय सांभाळण्याच्या दृष्टीने लेखन—वाचन—जमाखर्च ह्यांचे शिक्षणही त्यांना अपरिहार्य होते. आपण यातिहीन असल्यामुळे वेदाध्ययनाला आचवलो, ह्याची खंत त्यांना आरंभी वाटे. तथापि पुढे ज्ञान—भक्ती—वैराग्याने परिपक्व झाल्यानंतर वेदरहस्यच आपल्या वाणीवर कवित्वरूपे प्रकट झाल्याची प्रचीती त्यांना आली. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसी च ठावा' (अभंग २२६६) असे ते आत्मविश्वासाने म्हणू लागले.

लहानपणी चेंडूफळी, हुंबरी, हुतूतू, विटीदांडू इ. अनेक खेळ ते खेळले असावेत. टिपऱ्या, हमामा, फुगड्या इ. खेळही त्यांनी रस घेऊन पाहिले असावेत. क्रीडाविषयक अनेक सुंदर अभंग त्यांनी रचिले आहेत. तुकाराम महाराजांच्या गाथेइतके खेळांचे वैविध्य अन्य संतांच्या गाथांत आढळत नाही.

वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांचा पहिला विवाह झाला परंतु त्यांची पहिली पत्नी रखमाई ही अशक्त आणि आजारी असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील खेड येथे राहणाऱ्या आप्पाजी गुळवे ह्यांच्या अवलाई नावाच्या मुलीशी त्यांचा दुसरा विवाह झाला. हीच जिजाई. कित्येक चरित्रकारांच्या मते तुकाराम महाराजांचे दुसरे लग्न पहिली बायको निवर्तल्यानंतर झाले. दुष्काळात उपासमारीने ती मरण पावली, असे तुकाराम आत्मचरित्रपर अभंगात म्हणतात (अभंग १३३३). तुकारामांचे वडील बंधू सावजी हे स्वतःची पत्नी वारल्यानंतर विरक्त बनून तीर्थाटनास निघून गेले ते पुन्हा परतले नाहीत. त्यामुळे वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी व्यवसायासह सर्व प्रपंचाचा भार तुकारामांवर येऊन पडला. त्यानंतर १६३०—३१ मध्ये महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला त्यात त्यांच्या पहिल्या पत्नीबरोबरच त्यांचा मुलगाही मरण पावला दुकानाचे दिवाळे निघाले दारिद्र्य आले. ह्या स्थितीमुळे जनातील मान गेला. अपमान होऊ लागले. त्यामुळे अनन्यगती होऊन ते देवाला शरण गेले. नवा जीवनमार्ग त्यांना स्पष्ट दिसू लागला. लहानपणापासून झालेले अध्यात्मविद्येचे संस्कार जागृत होऊन त्यांना उपरती झाली. अभ्यासाची ओढ लागली. ते एकांतवासात रमू लागले. देहूच्या परिसरात सह्याद्रीचे अनेक उंच उंच रम्य पहाड आहेत. त्यांवर जाऊन वाचन—मनन—चिंतनात ते गढून जाऊ लागले. देहूच्या उत्तरेस असलेल्या भामनाथ किंवा भामचंद्र डोंगरावरील लेण्यात ते बसू लागले. ह्याच ठिकाणी त्यांना गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नामदेवदिकांच्या गाथा, योगवासिष्ठ, रामायण, दर्शने इत्यादिकांचा व्यासंग केला. प्रिया, पुत्र, बंधू ह्यांचा संबंध मनातून तुटला. दुकानात बसून केवळ कुटुंबाच्या आणि देहाच्या धारणेपुरते मिळवण्यावर ते संतोष मानू लागले (अभंग १४८६). मनाच्या आणि इंद्रियांच्या विकारांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करू लागले. संतांचा, हरिभक्तांचा सहवास त्यांना मिळत गेला.

ज्ञानेश्वर—एकनाथादी संतांनी परमार्थात गुरूचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे मानले परंतु गुरूसाठी हिंडण्याची तुकारामांची प्रवृत्ती नव्हती. पांडुरंगच गुरू, ही त्यांची भावना दिसते. तथापि परंपरेचाही त्यांच्या मनावर बळकट संस्कार होता. एका अभंगात (३६८) गंगास्नानास जातांना वाटेत सद्‌गुरूंनी गाठले मस्तकी हात ठेवला भोजनास पावशेर तूप मागितले पण हे, स्वप्नच होते त्यामुळे तूप देण्याचा विसर पडला, असे ते सांगतात. सद्‌गुरूंनी स्वतःचे नाव 'बाबाजी' असे सांगितले राघवचैतन्य, केशवचैतन्य ही गुरुपरंपरा सांगितली. 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला. माघ शुद्ध दशमी, गुरुवार हा तो दिवस होता, असेही त्यांनी म्हटले आहे. ल. रा. पांगारकर ह्यांच्या मते उपदेशाचे वर्ष १६३२ हे होय. बाबाजी चैतन्य हे उपदेशकाळी हयात नव्हते, म्हणून स्वप्नातच उपदेश झाला, असे म्हणता येते. तथापि वा. सी. बेंद्रे ह्यांच्या मते बाबाजी चैतन्य हयात होतेच आणि तुकारामांना सद्‌गुरू भेटण्याचा हा योग २३ जानेवारी १६४० रोजी आला. ही भेट देहूलाच झाली की ओतूरला, ह्याबद्दलही वाद असून तो अनिर्णित आहे. तुकारामांच्या अभंगात गंगास्नानाचा उल्लेख आहे. ओतूरला इंद्रायणी दक्षिणवाहिनी असल्यामुळे शास्त्राप्रमाणे तिला गंगा म्हणता येते अशी गंगा देहूला नाही म्हणून भेट ओतूरला झाली असावी, असे बेंद्र्यांचे मत आहे. तथापि 'गंगा' ही संज्ञा तीर्थविषयक धर्मशास्त्रात फार लवचिकपणेही वापरलेली आढळते. काशीच्या भागीरथी बरोबर इतर अनेक नद्यांना 'गंगा' ही अतिपवित्र संज्ञा दिलेली आहे.

बाबाजी चैतन्य हे बंगाली वैष्णव संत श्रीकृष्ण चैतन्य अर्थात गौरांग प्रभू ह्यांच्या संप्रदायाचे होते, असे अनुमान काहींनी काढलेले आहे. तथापी गौरांग प्रभू आणि तुकाराम महाराज ह्यांच्या तत्वज्ञानांत भिन्नता आढळते. श्रीकृष्ण चैतन्यांचे तत्वज्ञान शांकरमायावादास वगळणारा अचिंत्य भेदाभेदवाद होय, तर तुकाराम महाराजांचे तत्वज्ञान ज्ञानदेव—एकनाथांचा शांकरमायावाद व चिद्‌विलासवाद ह्या दोन वैचारिक श्रेणी वा टप्पे समाविष्ट करणारा अद्वैतवाद होय. श्रीकृष्ण चैतन्यांच्या संप्रदायात विशेषकरून आढळणाऱ्या मधुरा भक्तीची केवळ छटा तुकारामांच्या विराण्यांसारख्या गीतांमध्येही दिसते. शिवाय महाराष्ट्रात बंगाली चैतन्य संप्रदाय केव्हाही, कोठेही दिसत नाही.

बाबाजी चैतन्यांनी दिलेल्या गुरूपदेशाचे वर्णन तुकारामांनी केलेले असले, तरी गुरशिष्यनाते हे गुरूच्या ठिकाणी अहंता वाढविणारे, म्हणून त्यांना विशेषसे मान्य नाही. शिष्यसेवा घेऊ नये, असाही त्यांचा आग्रह आहे दक्षिणा घेणे तर पापच होय, असे ते मानतात. त्यांना उपदेश झाला तो स्वप्नात म्हणजे तुर्येत किंवा उन्मनीत. तुर्या किंवा उन्मनी म्हणजे आत्मा होय. मांडूक्योपनिषदात शांत, शिव, अद्वैत व स्वयंप्रकाश आत्मा हे तिचे स्वरूप सांगितले आहे. जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्या तिन्ही अवस्थांना ती व्यापते आणि पलीकडेही राहते. तुकाराम महाराजांनी 'स्वप्न' ह्या संज्ञेने तुर्या वा उन्मनी ह्यांचा निर्देश केला असणे अत्यंत शक्य आहे.

गुरूपदेश झाल्यावर कवित्वाची स्फूर्ती झाली. संत नामदेवांनी पांडुरंगासवे स्वप्नात येऊन जागे केले आणि कवित्व करावयास सांगितले. नामदेवांची शतकोटी अभंगांची संख्या अपुरी राहिली आहे, ती पूर्ण कर, असे पांडुरंगाने सांगितले (अभंग १३२० १३२१). तुकाराम अभंग लिहू लागले. संसार—परमार्थाच्या अनुभवांतून निष्पन्न झालेला विचार रम्य शब्दरूप घेऊ लागला. शब्दांची रत्ने आणि शस्त्रे त्यांना गवसली (अभंग ३३९६). त्यांच्या अभंगांत शब्दांची रत्ने जशी दिसतात, तसेच चमत्कार दाखविणारे बाबालोक भविष्यशकुन सांगणारे, त्यांचे अपधर्म पाखंड, धार्मिक, कर्मकांड वा थोतांड इत्यादिकांचे परखड खंडन करणारी शस्त्रास्त्रेही आढळतात. त्यांच्या शैलीचेच सूत्र उपर्युक्त अभंगातून त्यांनी बोलून दाखविले आहे. अभंगांतून स्वतःचा उल्लेख ते 'तुका' असा करतात.

आपल्या जीवनातून आणि अभंगांतून शुद्ध परमार्थधर्माच्या स्थापनेचे कार्य त्यांनी चालू ठेवले. त्यांच्या अलौकिक प्रतिभेतून निर्माण झालेल्या अमृतवाणीने सामान्य जनांचा आणि प्रतिष्ठित, सुसंस्कृत लोकांचा समाज आकर्षित होऊ लागला. ब्रह्मसाक्षात्कारी महान संतकवी म्हणून त्यांची कीर्ती त्यांच्या हयातीतच महाराष्ट्रात पसरली होती. लोकांच्या स्तुतीमुळे आपला झडलेला अहंकार पुन्हा जडेल की काय, अशीही त्यांना भीती वाटू लागली होती. तथापि मोहाचा तो टप्पाही त्यांनी ओलांडला. 'मी आहे मजूर विठोबाचा' असे ते लोकांना सांगू लागले. तथापि त्यांचा हेवा आणि द्वेष करणारे दुर्जनही वाढत होते. सालोमालो हे कीर्तनकार, मंबाजीबुवा, देहूगावाचा पाटील हे त्यांत प्रमुख होते. पुण्याजवळील वाघोलीचे रामेश्वरभट ह्यांचेही तुकारामांचे विरोधक म्हणून नाव घेतले जाते. पण रामेश्वरभट हे तुकारामांचे प्रथमपासूनच भक्त बनले होते त्यांनी तुकारामांचा द्वेष कधीच केला नाही. तुकारामांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडविण्यात रामेश्वरभटांचा हात नव्हता ती कल्पितकथा आहे. सालोमालो हे तुकारामांचे अभंग स्वतःच्या कीर्तनांत स्वतःच्या नावावर वापरीत. पाटलापेक्षा महाजनकीचा अधिकार त्या वेळी मोठा असल्यामुळे देहूगावचा पाटील मत्सरग्रस्त झाला असावा. तुकोबा शूद्र असून वेदान्तोपदेश करतात, हा मत्सरग्रस्त विरोधकांचा त्यांच्यावर मुख्य आरोप होता. ते स्त्रियांना नादी लावतात असाही आरोप असल्याचे तुकोबांच्या अभंगांतून सूचित होते. नाना प्रकारे ह्या लोकांनी तुकोबाचा छळ केला. त्यांच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्या. त्या कोरड्याच्या कोरड्या वर आल्याचा उल्लेख काही अभंगांत आलेले आहेत (२२४१, २२४३). तुकोबांवर बहिष्काराचाही प्रयोग करण्यात आला होता असे अभंगांतून समजते. मंबाजीने तर पुण्यातील विख्यात राजयोगी आपाजी गोसावी ह्यांस पत्र पाठवून ह्या शूद्राचा ब्राह्मणसुद्धा अनुग्रह घेत असल्याची तक्रार केली होती आणि आपाजी गोसावी ह्यांनी तुकारामांना शिक्षा देण्याचा निश्चय केला होता, ही हकीकत बहिणाबाईंच्या अभंगांत आलेली आहे. तुकोबांनी ह्या सर्व संकटांना तोंड दिले.

वयाची चाळीशी उलटल्यानंतर जग सोडावे, असे त्यांना वाटू लागले आणि वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी त्यांचे निर्याण झाले. शके १५७१, फाल्गुन वद्य द्वितीया (९ मार्च १६५०) हा त्यांचा निर्याणदिन म्हणून मानला जातो. तथापि वा. सी. बेंद्रे ह्यांच्या मते शके १५७१, विरोधी संवत्सर फाल्गुन वद्य पंचमी, सोमवार हा तो दिवस होय कारण तुकारामांचे पुत्रपौत्र ह्याच दिवशी पुण्यतिथी साजरी करीत. तुकाराम महाराज विमानात बसून सदेह वैकुंठास गेले असे चरित्रग्रंथांत आणि कथाकीर्तनांत सांगितले जाते परंतु हे वाच्यार्थ्याने घ्यावयाचे नाही. त्यांचा देहच ब्रह्मरूप बनला, त्यामुळे ते सदेह वैकुंठात गेले, असे ध्वन्यर्थाने म्हणता येते. निर्याणसमयी त्यांना महादेव, विठोबा, नारायण हे तीन मुलगे आणि काशी, भागीरथी व गंगा ह्या तीन मुली अशी सहा अपत्ये होती. ह्या मुली मोझे, गाडे व चांभुलीकर ह्या प्रतिष्ठित घराण्यांत दिलेल्या होत्या.

मठस्थापना करून शिष्यशाखा निर्माण करण्याचे त्यांनी सावधपणे टाळले होते. त्यांनी प्रत्यक्ष शिष्य केलाच नाही. समकालीन रामेश्वरभट वाघोलीकर, बहिणाबाई सिऊरकर आणि नंतर झालेले कचेश्वरभट ब्रह्मे चाकणकर, निळोबाराय पिंपळनेरकर किंवा महिपती ताहाराबादकर ह्यांनी त्यांना गुरू मानले आहे. तथापि रामेश्वरभटांना दीक्षा दिलीच नव्हती. बाकीच्यांना स्वप्नात येऊन त्यांनी दीक्षा दिली, असे उल्लेख आहेत. शिवाजी महाराज आणि तुकाराम ह्यांच्या भेटीबद्दलही ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. वा. सी. बेंद्रे ह्यांनी तुकारामाचरित्राचे बारकाईने संशोधन करून हे दाखवून दिले आहे.

धर्मरक्षण हे त्यांनी आपले जीवितकार्य मानले. त्यासाठी जातपात, उच्चनीच भेद नाकारले. विष्णुदास जन्म घेतात तेच पवित्र कुळ आणि तोच पवित्र देश अशी त्यांची भूमिका होती. सामान्य लोकांना उचित साधनमार्ग दिला पाहिजे. भुताखेतांची साधना, जटाभार वाढविणारे ढोंगी, शकुन सांगणारे भविष्यवादी, क्षुद्र देवतांच्या उपासना ह्यांपासून लोकांना दूर केले पाहिजे, असे त्यांना वाटे. सगुणनिर्गुण हे एकाच आध्यात्मिक साक्षात्काराचे पैलू आहेत वासना संपूर्ण विलीन होऊन पूर्ण व अविचल स्थिती अनुभवणे हे त्या साक्षात्काराचे फलित आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील भागवत धर्माचा पाया रचून देवालय श्रीज्ञानदेवांनी उभारले आणि तुकारामांनी त्याच्यावर कळस चढविला असे म्हटले जाते. ह्याचे कारण भागवत धर्माच्या दीर्घ परंपरेची पूर्ती तुकारामांच्या जीवनात आणि साहित्यात झालेली होती. अनन्यभक्ती आणि पारमार्थिक समता ह्यांच्या मुशीत भागवत धर्माने ओतलेली सुवर्णमूर्ती म्हणजे तुकाराम. 'अंत्यजादि योनी सरल्या हरिभजने तयांची पुराणे भाट झाली' असे सांगून तुकारामांनी सामाजिक संकुचित अहंकार आणि शुद्ध धर्म ह्यांच्यातील विरोध स्पष्टपणे दाखवून दिलेला आहे.

मराठी साहित्यात तुकारामांच्या अभंग—गाथेने अढळ स्थान मिळविले आहे. साधकदशेतील 'मनासी झालेले संवाद' व 'नाना बुद्धीचे तरंग' उत्कटपणे तुकोबांनी व्यक्त केले. संसारातील काही प्रसंग, जनात आलेले अनुभव यांबरोबरोच गोपालकृष्णाच्या बालक्रीडा, विराण्या, ब्रह्मतत्वाचा साक्षात्कार यांचीही अभंगरुप वर्णने त्यांच्या गाथेत आढळतात. संसारी लोकांना केलेला नीत्युपदेश व समाजातील सोंगाढोंगावर केलेला प्रहार हेही त्यांच्या अभंगवाणीचे मोठेच विषय आहेत. तिच्यात लौकिकाच्या नाना क्षेत्रांतील उपमारूपकादी अलंकारांचा मार्मिक वापर आढळतो. ही अभंगवाणी सुभाषितात्मक वचनांनी नटलेली आहे. ती मराठी भाषेचेच एक अंग बनली असून जनसामान्यांच्या तोंडी कायमची स्थानापन्न झाली आहे. आधुनिक मराठी कवींना ही उत्स्फूर्त, उत्कट, अल्पाक्षरसुंदर अभंगवाणी स्फूर्तिदायक ठरली व अनुकरणीय वाटली. मराठी काव्याचे ती एक शाश्वत भूषण होय.

## ज्ञानेश्वर : (१२७१ किंवा १२७५—१२९६).

महाराष्ट्रातील एक थोर योगी, तत्त्वज्ञानी आणि संतकवी. महाराष्ट्रातील भागवत तथा वारकरी संप्रदायाचा तत्त्वज्ञ प्रवर्तक. बापविठ्ठलसुत, ज्ञानाबाई, ज्ञानदेव या नावांनीही त्यांना ओळखले जाते. ज्ञानेश्वरीच्या अखेरीस ज्ञानेश्वरांनी स्वतःची नाथसंप्रदायाची गुरुपरंपरा सांगितली आहे, ती अशी : आदिनाथ > मत्स्येंद्रनाथ > गोरक्षनाथ > गहिनीनाथ > निवृत्तिनाथ > ज्ञानदेव. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व बहुतेक अभंग-गाथा ह्यांत ते

स्वतःच्या नावाचा निर्देश ज्ञानदेव असाच करतात; परंतु नामदेव, मुक्ताबाई, एकनाथ इ. संतांच्या वाङ्मयात ज्ञानेश्वर असाही उल्लेख अनेकदा येतो.

आपेगाव (तालुका पैठण) हे ज्ञानेश्वरांच्या पूर्वजांचे मूलस्थान. आडनाव कुळकर्णी. हे माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदी ब्राह्मण. गोत्र पंचप्रवरान्वित वत्स. आज ज्ञात असलेले त्यांचे पहिले पूर्वज त्यांच्या पणज्यांचे पणजे हरिपंत कुळकर्णी हे इ. स. ११३८ च्या सुमारास आपेगावचे कुळकर्णपण पाहत असत. या घराण्यातील ज्ञानेश्वरांचे आजोबा गोविंदपंत यांस त्यांची पत्नी निराई हिच्यापासून पंचावन्नाव्या वर्षी एक पुत्र झाला. त्याचे नाव विठ्ठल. हेच विठ्ठलपंत ज्ञानदेवांचे जनक होत. विठ्ठलपंतांनी वेद, काव्य, व्याकरण व विविध शास्त्रे ह्यांचे अध्ययन केले. ऐन तारुण्यातच वैराग्य, भक्ती व ज्ञान उत्पन्न होऊन पुष्करादी तीर्थांची यात्रा करावी, म्हणून मातापित्यांना वंदन करून त्यांनी तीर्थाटन केले आणि इंद्रायणीतीरी असलेल्या आळंदीस आले. तेथे थोर ब्राह्मण सिदोपंत ह्यांची भेट घेऊन त्यांचे चरण त्यांनी वंदिले. सिदोपंतांच्या आश्रमात त्यांनी वास्तव्य केले. नंतर त्यांच्याच रखुमाई या कन्येशी विठ्ठलपंतांचे शास्त्रोक्त रीतीने लग्न झाले.

विठ्ठल-रखुमाई हे दोघे पतिपत्नी पंढरपूरला सिदोपंतांबरोबर यात्रेस गेले. पुढे आपेगावी येऊन गृहस्थाश्रम स्थिरपणे करावा की तीर्थाटन करीत देह झिजवावा, असा प्रश्न विठ्ठलपंतांच्या मनात घोळत होता. विठ्ठलपंत आपेगावी न परतताच सिदोपंतांचा निरोप घेऊन नामसंकीर्तन करीत तीर्थाटनास गेले आणि बरीच तीर्थे पाहून परत आळंदीस येऊन ते सिदोपंतांस भेटले. सिदोपंतांची आज्ञा घेऊन अखेरीस त्यांच्याबरोबरच आपेगावी येऊन त्यांनी मातापित्यांचे दर्शन घेतले. मातापिता दोघेही फार वृद्ध होती. स्वानंदपूर्ण स्थितीत ती दोघे वैकुंठवासी झाली; परंतु विठ्ठलपंत विरक्त होते. सिदोपंत आपेगावी आले आणि विठ्ठल-रखुमाई या दोघांना बरोबर घेऊन आळंदीस आले. अनेक वर्षे झाली तरी विठ्ठलपंतांस अपत्य झाले नाही. त्यांनी पत्नीस सांगितले की, वाराणसीस जाऊन संन्यास घ्यावासा वाटतो. तेव्हा रखुमाईने संततीवाचून संन्यास घेऊ नये, ही गोष्ट पतीस पटवा, असे आपल्या पित्यास सांगितले; मात्र विठ्ठलपंतांचे मन वळले नाही. पत्नी निद्रेत असता त्यांनी गृहत्याग केला, असे ज्ञानेश्वरादींना पैठणस्थ ब्राह्मणांनी दिलेल्या बोपदेवलिखित शुद्धिपत्रात म्हटले आहे. विठ्ठलपंत वाराणसीस गेले. तेथील एका प्रसिद्ध संन्यासी महंतांपासून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली. ह्या संन्यासी महंतांचे नाव नामदेवांनी सांगितलेले नाही. श्रीपाद म्हणून त्यांचा निर्देश केला आहे. संन्यासी व्यक्तीचा श्रीपाद ह्या आदरार्थी अभिधानाने निर्देश करावा, असे यतिधर्मसंग्रह ह्या संन्यासाश्रमाच्या धर्मशास्त्राच्या संस्कृत ग्रंथात म्हटले आहे. ज्ञानेश्वरांनी संन्यासविषयक अभंगगाथेतही संन्यासी व्यक्तीचा श्रीपाद ह्या आदरार्थी सामान्य संज्ञेने निर्देश केला आहे. काही चरित्रकार (उद्धवचिद्धनकृत श्रीज्ञानेश्वरचरित्र) ह्या विठ्ठलपंतांच्या संन्यासी गुरूचा नृसिंहाश्रम असा, तर काही (बोपदेवलिखित शुद्धिपत्र) रामानंद असा, निर्देश करतात. अर्थात हे रामानंद कबीरकालीन प्रसिद्ध रामानंद नव्हते. विठ्ठलपंतांच्या संन्यासग्रहणानंतर त्यांना चैतन्याश्रम हे अभिधान गुरूंनी दिले.

इकडे आळंदीस रखुमाईने जीवित सार्थक व्हावे म्हणून अश्वत्थाची सेवा आरंभिली. तेथे कालांतराने वाराणसी येथील एक संन्यासी आले. योगायोगाने तेच विठ्ठलपंतांचे गुरू होते. रखुमाईने नमस्कार केला. महंतांनी 'पुत्रवती हो' असा आशीर्वाद दिला. तिला हसू आले, विनोद वाटला. महंतांनी विचारले, 'मिस्किलपणे का हसतेस ?' ती म्हणाली, 'पतीने संन्यास घेतला आहे; मग आपले बोल खरे कसे होणार?' महंतांनी सगळी हकीकत विचारून घेतली. रखुमाईने मातापित्यांची महंतांशी भेट करविली. महंतांची अर्घ्यपाद्यपूजा व भोजन झाले. महंत रामेश्वरच्या यात्रेला निघाले होते. सिदोपंतांनी प्रार्थना केली की, दयावंत होऊन वाराणसीस लगेच परतून जावयांचे मन वळवा. महंतांना वाटले : आपण विठ्ठलपंतांस अवेळी म्हणजे पत्नी तरुण व संतती नाही अशा स्थितीत संन्यास दिला, ह्याचा दोष आपणासही लागतो, आपले पुण्य लयाला जाते. विठ्ठलपंतांनी, आपल्यामागे तसा पाश नाही इ. खोटेच सांगून गुरूपासून संन्यास घेतला, असे काही चरित्रकारांनी ह्या संदर्भात सांगितले आहे; परंतु नामदेव तसा उल्लेख श्रीज्ञानेश्वरांची आदिमध्ये करीत नाहीत. हा अनुल्लेख गुरूच्या ह्या उक्तीशी सुसंगत ठरतो. खोटे सांगून संन्यास घेतला असता तर गुरूकडे दोष गेला नसता म्हणून

महंतांनी लगेच वाराणसीस प्रयाण केले व चैतन्याश्रमाला बोलावून घेतले. चैतन्याश्रमाने मान्य केले की, 'कांतेचा त्याग करून मी आलो आहे.' महंतांनी आज्ञा केली की, 'पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकार.'

तेव्हा चैतन्याश्रम स्वदेशी परतले. संन्यासाश्रम टाकून त्यांनी पुनश्च गृहस्थाश्रम पत्करला. त्यामुळे ब्राह्मणांनी त्यांना वाळीत टाकले. अशी बारा वर्षे निघून गेली. चार अपत्ये झाली ती म्हणजे निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई. मुलगे व्रतबंधाला योग्य झाले. द्विजवृंदाच्या अनुज्ञेनुसार विठ्ठलपंत भार्या, पुत्र व गृह यांचा त्याग करून व द्विजवृंदाला नमस्कार करून देहान्त प्रायश्चित्त घेण्यासाठी निघून गेले.

बहिष्कारामुळे आपली वंशावळी जातिकुळावेगळी झाली असल्यामुळे प्रायश्चित्त घेणे अवश्य आहे, असा विचार विठ्ठलपंतांनी केला. त्यांनी ब्रह्मसभा भरविली व त्या सभेत 'ह्या दीनाला अपराधाची क्षमा करा' अशी प्रार्थना केली. तेव्हा निवृत्ती ब्रह्मसभेला उद्देशून म्हणाले, 'आम्हांला मार्ग सांगा'. द्विजांनी सांगितले की, 'पैठणला जा, तिकडून शुद्धिपत्र आणा, ते मान्य होईल'. निवृत्ती म्हणाले, 'आमची परंपरा सगुण व निर्गुण ह्यांच्या पलीकडील आहे. जाती, कुळ, वर्ण किंवा विश्वातील पंचमहाभूते, विराट, महत् ह्यांपैकी आम्ही काही नाही, निजबोधस्वरूप आहोत.' ह्यावर ज्ञानेश्वर म्हणाले, 'आपली पावन अवस्था असली, तरी धर्मशास्त्राच्या पद्धतीने आपण चालले पाहिजे.' ह्यावर सोपान म्हणाले, 'पांडव, व्यास वाल्मीकी, वसिष्ठ ह्यांचे तरी कुळ किंवा जाती शुद्ध कुठे आहे? तसेच आमची भक्ती हाच आत्मस्थितीचा उपाय होय, जाती किंवा कुळ नव्हे.'

अखेर द्विजांचे पत्र घेऊन, पैठण येथे ही मंडळी गेली. ब्रह्मसभा भरली. पत्र सादर केले. संन्याशाचे पुत्र आहेत असे कळल्यावर सभेने निर्णय दिला की, उभयता कुळभ्रष्ट आहेत, म्हणून प्रायश्चित्त नाही आणि उपनयनाधिकारही नाही. एकच उपाय उरला आहे : अनुतापूर्वक ईश्वरभजन करावे; गाय, गर्दभ, श्वान, अंत्यज ह्यांच्याही ठिकाणी ब्रह्मभावना करून वंदन करावे. चारी भावंडे हे ऐकून संतुष्ट झाली. त्यांची लोकविलक्षणनावे ऐकून काही ब्राह्मण हसले. एकजण म्हणाला, 'तो जो पलीकडे पखाल वाहत आहे, त्या रेड्यासही ज्ञाना म्हणतात.' ज्ञानदेवांनी म्हटले, 'तोही माझा आत्माच आहे.' त्या रेड्यावर आसूड मारले गेले. त्यांचे वळ ज्ञानदेवांच्या पाठीवर उठले. ब्राह्मण म्हणाले, 'ह्या रेड्याकडून वेद वदवा.' रेडा विधिपूर्वक ऋग्वेद म्हणू लागला. ब्रह्मवृंद चकित होऊन म्हणू लागला, 'हे तिघे साक्षात देवावतार असून मुक्ताई आदिमाया आहे; आम्ही फार चूक केली; देहबुद्धी व अहंकार यांनी भरलेले आम्ही नुसते कर्मठ आहोत. ह्यांचा वंश व कुळ खरोखर धन्य आहेत.' सकल द्विजांनी नमस्कार करून त्यांचा जयजयकार केला. उलट ज्ञानदेव व निवृत्ती ह्यांनी त्या ब्रह्मवृंदाला संत समजून त्यांचे स्तवन केले 'आपल्या दर्शनाने धन्य झालो.' असे त्यांस म्हटले. ह्या पैठण येथील घटनेचे वर्णन नामदेवांनी केले आहे. ह्यातील चमत्काराचा भाग वगळला तर असे सूचित होते की, ज्ञानदेवादिकांचे वर्तन, वृत्ती व कीर्तन-प्रवचन पाहून, त्यांचा परमार्थातील अधिकार तेथील ब्राह्मणपंडितांना व त्यामुळेच एकंदरीत सर्व समाजालाही पटला उपनयनाचा अधिकारही मान्य झाला; परंतु अगोदरच नाथपंथांची दीक्षा मिळाली होती उपनयनाची आवश्यकताच नव्हती. तीन पिढ्यांची नाथपंथाची परंपरा होती. वंशपरंपरागत विद्वत्तेचा वारसा पित्याकडून त्यांना प्राप्त झाला होता. जन्मत:च विलक्षण बुद्धिमत्ता व प्रतिभा असल्यामुळे कौमारावस्थेतच त्यांची प्रज्ञा परिणत झाली होती. अखेरीस पैठणचा ब्रह्मवृंद व सर्व समाज ह्या बालसंतांना शरण आला ह्याचे प्रत्यंतर त्या प्रसंगानंतर लगेच ज्ञानेश्वरीचे लेखन झाले त्यावरून मिळते. ज्ञानेश्वरीत श्रोतृवृंदाच्या महत्तेची, प्रगल्भतेची व जाणकारपणाची जी वारंवार प्रशंसा आढळते, त्यावरून ज्ञानेश्वरीचे लेखन व प्रवचन चालू असतानाच विलक्षण लोकप्रियता ज्ञानेश्वरांना लाभली होती, ह्याबद्दल शंका राहत नाही. पुराण, हरिकीर्तन, वेदान्तव्याख्यान हे सर्व पैठण येथील दीर्घकालीन मुक्कामात चालूच होते. नामदेव म्हणतात की, तेथील ब्रह्मवृंदावर त्यामुळे त्यांची विलक्षण छाप पडली. सामान्य जन वेधून घेतले गेले आणि ह्या बालसंतांना घरी बोलावून त्यांनी पितृश्राद्ध केले. त्यावेळी ह्यांनी मंत्र म्हटले व साक्षात पितर अवतरले, असे संत नामदेव म्हणतात. अखेरीस शुद्धिपत्र मिळाले. ब्राह्मणांना प्रदक्षिणा व साष्टांग नमस्कार करून चारी भावंडे नेवाश्यास आली. त्यांच्यामागून रेडाही आला. नेवाश्यात शिरले, तो एक सती मृतपतीजवळ बसून आक्रोश करताना दिसली. पतीचे नाव सच्चिदानंद होते तो नेवाश्याचा कुळकर्णी

होता. ‘सच्चिदानंदाला मृत्यू नसतो’, असे ज्ञानदेव उद्‌गारले, तोच तो मृत पुरुष एकदम उठून उभा राहिला व ज्ञानदेवांना शरण आला. तोच ज्ञानेश्वरी लिहून घेणारा. त्याने पुढे ज्ञानेश्वरविजय नामक ओवीबद्ध रचनाही केली.

ज्ञानेश्वरांनी नेवाश्यास प्राकृत गीतादेवी म्हणजे ज्ञानेश्वरी रचली. त्यानंतर निवृत्तिदेवांच्या आदेशावरून स्वतंत्र अनुभवामृत ग्रंथही रचला. नंतर चौघे नेवाश्याहून आळंदीकडे निघाली. सकळ-कवित्व-कला असलेली ही भावंडे हरिनामकीर्तन करीत आळ्याच्या वनात उतरली. तेथे रेडा मेला. त्याची समाधी बांधून शेंदूर लावून पूजा केली व नंतर सर्व भावंडे आळंदीला गेली. सर्वांनी तेथेच कायम वसती केली. ज्ञानेश्वरीमुळे देशी भाषा गौरवसंपन्न झाली, अध्यात्मविद्येचे रूप मराठीत प्रकट झाले. दीर्घजीवी वृद्धयोगी चांगदेवांच्या कानी त्यांची कीर्ती गेली.

महिपतीबाबांनी ज्ञानदेव व चांगदेव यांच्या भेटीचा वृत्तांत दिलेला आहे. चांगदेवपासष्टी हे पासष्ट ओव्यांचे प्रकरण चांगदेवांकरिता ज्ञानदेवांनी लिहिले. यात त्यांनी शांकर-मायावादाचा सिद्धांत सांगून नंतर चिद्विलासाचा अद्वैतवाद प्रतिपादिला आहे. ह्यात चांगदेवांचा चांगया व चक्रपाणी ह्या दोन नावांनी निर्देश केला आहे. चांगदेवांचे कोरे पत्र व त्याला दिलेले ज्ञानदेवांचे उत्तर म्हणजे चांगदेवपासष्टी होय.

चांगदेव व्याघ्रारूढ होऊन आपल्या सिद्धीचे सामर्थ्य दाखवीत आळंदीस पोहचले, तेव्हा ही चारी भावंडे एका भिंतीवर बसली होती. अतिथीच्या स्वागतार्थ सामोरे जाण्याकरिता भिंतच चालू लागली. त्याबरोबर व्याघ्रावरून खाली उतरून चांगदेव ह्या चतुर्मूर्तींना शरण आले. नंतर ज्ञानदेवांच्या आदेशावरून चांगदेवांनी मुक्ताबाईंचा अनुग्रह घेतला. चांगदेवांना उपदेश करणारे मुक्ताबाईंचे अनेक अभंग व एक पदही प्रसिद्ध आहे आणि मुक्ताबाईंचा गुरू म्हणून निर्देश करणारे चांगदेवांचेही अभंग आहेत.

विसोबा चाटी नावाचा एक कर्मठ ब्राह्मण आळंदीत राहत होता. तो ह्या भावंडांचा द्वेष करू लागला. त्यांच्यावर बहिष्कार पडावा, अशी त्याची मनीषा होती. गावच्या कुंभारांनाही त्याने बजावले की, रांधण्याची मातीची भांडी ह्यांना देऊ नका. एकदा निवृत्तिनाथांना मांडे खाण्याची इच्छा झाली; परंतु कुंभाराने मांडे भाजण्याचे खापर दिले नाही. योगधारणा करून ज्ञानदेवांनी आपली पाठ मांडे भाजण्यास योग्य इतकी तापविली व मुक्ताबाईंनी तिच्यावर मांडे भाजले. हे ऐकून विसोबा चाटीस पश्चात्ताप झाला, तो शरण आला. ज्ञानदेवांच्या ताटातील उच्छिष्ट, प्रसाद म्हणून त्याने उचलले. ज्ञानदेवांनी त्याला ‘खेचरा, पलीकडे सर’ असे म्हणून धुडकावले, परंतु त्याने ऐकले नाही. खेचर ह्या संबोधनात गूढार्थ होता. शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेच्या ईशोपनिषदातील अखेरचा मंत्र ‘खं ब्रह्म’ असा आहे. ‘ख म्हणजे ब्रह्म’ असा त्याचा अर्थ खेचर म्हणजे ब्रह्मात संचार करणारा. ह्या आदेशातच विसोबांना ज्ञानदेवांचा उपदेश व अनुग्रह झाला. विसोबांनी म्हटले आहे, ‘महाविष्णूचा अवतार । श्री गुरू माझा ज्ञानेश्वर ।’ विसोबा खेचरच नंतर नामदेवांचे गुरू म्हणून प्रसिद्धीस आले.

ज्ञानदेवांना तीर्थाटनाची इच्छा झाली. चारी भावंडे नामदेवांच्या भेटीकरिता पंढरीस जाण्यास निघाली. त्यांनी प्रथम चाकणास मुक्काम केला. चाकण येथील महिपतराव नावाच्या एका भाविक श्रीमान गृहस्थाचा पाहुणचार घेतला व नंतर पंढरीस नामदेवांच्या भेटीकरिता आली. तीर्थयात्रा नामदेवांबरोबरच करावी, म्हणजे नामदेवांसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या भक्ताचा सहवास काही काळ सतत लाभेल हाच त्यातील हेतू होता. नामदेवांना अलिंगन देऊन तीर्थयात्रेचा मानस ज्ञानदेवांनी प्रकट केला. नामदेवांनी म्हटले की, ‘भगवंतांनी आज्ञा दिली तरच मी येतो.’ दोघेही विठोबापुढे उभे राहिले. पंढरीनाथांनी सांगितले की, ‘ज्ञानेश्वर प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ती आहे. तुझ्या संगतीचा त्यांना आदर आहे. तू फार भाग्यवान आहेस. जा, स्वस्ति क्षेम असो.’ देवांनी तीर्थयात्रेस संमती दिली व बोळवण करून देव परतले. मंगळवेढ्याचे चोखामेळा, आरणभिंडीचे सांवता माळी, नरहरी सोनार, परिसा भागवत, विसोबा खेचर इत्यादी अनेक संतांची प्रभावळ ह्या तीर्थयात्रेत सामील झाली. चालत चालत सर्व मंडळी कराडजवळ येऊन पोचली. कराड हे कृष्णातीरचे आदिक्षेत्र म्हणून मानले जात होते. कराडचा राजा रामराय हा चाकणच्या महिपतरावाचा जावई होता. सीताबाई ही महिपतरावाची

कन्या त्याला दिली होती. रामराय संतमंडळींच्या विरुद्ध होता. सीताबाईला साधुसंतांचे प्रेम होते. त्याच वेळी रामरायाचा मुलगा फार आजारी होऊन मृत्यू पावला. ज्ञानदेवांनी त्या पुत्राला जीवदान दिले. त्यामुळे रामरायाही संतांचा भक्त झाला.

मार्गक्रमण करीत असता नामदेवांना पंढरीची आठवण व्हायची पंढरीचा वियोग सहन होईना विठ्ठलमूर्तीच्या भेटीकरिता हृदय तळमळत होते. ही गोष्ट ज्ञानदेवांच्या लक्षात आली. ते म्हणाले, 'नामया, प्रेममूर्ती अद्वैत असा आत्मा सर्वांभूती आहे. तुला भक्तीचे भाग्य लाभले आहे तो भक्तिमार्ग आम्हास तूच सांगावा.' नामदेवाने ज्ञानदेवांच्या चरणांवर मिठी मारून सांगितले की, 'मी पंढरीरायाच्या कृपेने पोसलो आहे. ज्ञान देण्याचे भाग्य मला नाही. मी वैष्णवांचा नम्र दास आहे तुम्ही ज्ञानाचे कल्पतरू किंवा कामधेनू आहात माझ्यासारख्या कृपणाचे द्वारी तुम्ही याचक म्हणून का यावे ?' ज्ञानदेव म्हणाले, 'असे बोलू नकोस. तू अनुभवी आहेस. तुझे बोलणे म्हणजे केवळ कवित्व नव्हे. व्युत्पन्न, बुद्धिवंत, चतुर वक्ते, आत्मज्ञानी, योगी, जीवन्मुक्त ह्यांचीही तुझ्याशी तुलना होऊ शकत नाही. तुझ्या कीर्तनाचा रस हा अद्‌भुत आणि निरुपम आहे.'

पश्चिमेकडची प्रभास, द्वारका इ. तीर्थे ह्या मंडळींनी उरकली. गिरनारची यात्रा संपवून मारवाडात शिरले. तेथे पाण्याचा खडखडाट ! सर्व तृषाक्रांत झाले. वाटेत एक कूप खूप खोल होता. ज्ञानदेवांनी अणिमालघिमांसारख्या सिद्धींचा अवलंब करून खोल विहिरीतील पाणी पिण्याचा चमत्कार दाखविला. परंतु नामदेवांनी हृदयी केशिराजास आठवून नेत्र मिटले व प्रार्थना केली, 'तवं गडगडीत कूप उदके ओसंडला । कल्पांती खवळला सिंधुजैसा ॥ पाणी खळखळाट करीत वर आले. सर्वजण तृप्त झाले. अयोध्या, प्रयाग, काशी, गया इ. तीर्थक्षेत्रांची यात्रा संपवून पुन्हा पंढरीस परतले.

ज्ञानदेवांनी तीर्थयात्रेची समाप्ती संतमंडळींसह पंढरीस केली. ज्ञानदेवांनी पंढरीनाथाला आळंदीस जाऊन अखेरची समाधी घेण्याचा आपला संकेत कळविला. अनुज्ञा मिळाली. देव आणि संत आळंदीस आले. विठोबांनी ज्ञानेश्वरांस समाधीस बसण्याची अनुज्ञा दिली. गुरू निवृत्तिदेवांच्या चरणावर ज्ञानदेवांनी लोटांगण घातले; त्यावेळी निवृत्तिदेव उन्मनी अवस्थेत होते. सोपानदेव व मुक्ताबाई ह्यांनी ज्ञानदेवांचे चरण धरले. लगेच निवृत्तिनाथांची समाधी क्षणभर बाजूला झाली. ते म्हणाले, बाळपणी आईबाप सोडून गेले, तेव्हा झाले नव्हते इतके दुःख ह्यावेळी होत आहे. इंद्रायणीच्या तीरावर सिद्धेश्वराचे पुरातन स्थान आहे. तेथे सिद्धेश्वराच्या डाव्या बाजूस अजानवृक्षाच्या छायेखाली समाधिस्थान तयार करविले होते. शके १२१८, कार्तिक वद्य एकादशीला सर्वांनी हरिजागर केला. नामदेवांचे हरिकीर्तन झाले. द्वादशीला पारणे सोडले. तिसरे प्रहर भक्त कान्हु पाठक हे केंदूरहून ज्ञानदेवांच्या दर्शनास आले. सर्व संतांच्या आग्रहावरून त्यांनी द्वादशीचे कीर्तन केले. त्रयोदशीला प्रातःकाळी तुळशी, बेल अंथरून आसन तयार झाले. समाधिस्थानाची शिळा तयार होती. ज्ञानदेव समाधीकडे जाण्यास उठले. अवघ्यांनी वंदन केले. भगवंतांनी ज्ञानदेवांच्या कपाळी केशरी गंध लावून गळ्यात पुष्पहार घातला. भगवंतांनी प्रेमाने निरोप दिला. आर्तस्वरांनी संतमंडळी भजन करीत होती. त्यांच्या नामघोषाने दशदिशा भरून टाकल्या. एक हात भगवंतांनी व दुसरा निवृत्तिनाथांनी धरून आसनावर बसविले. ज्ञानदेवांनी डोळे मिटले. संतांनी समाधीला शिळा लावली. नऊ दिवस कीर्तन-महोत्सव झाला.

ज्ञानदेवांच्या समाधीनंतर सोपानदेव, मुक्ताबाई व निवृत्तिनाथ ह्यांनी एका वर्षाच्या आतच देह ठेवले. ज्ञानदेवरचित ज्ञानेश्वरीची सांस्कृतिक व राजकीय पार्श्वभूमी फार संपन्न होती. ज्ञानदेवांच्या कालखंडात महाराष्ट्रातील भौतिक व आध्यात्मिक संस्कृतीचा उत्कर्ष होत होता. ज्ञानेश्वरी हे त्या उत्कर्षाचेच उत्कृष्ट फलित होय. सातशे वर्षे झाली तरी धर्म, तत्त्वज्ञान व काव्य ह्यांची अनुपम परिणती म्हणजे ज्ञानेश्वरी असे अजून म्हणता येते. तत्पूर्वी सु. शंभर-दीडशे वर्षे मराठी भाषेतील साहित्य विकास पावत होते. हा काळ महाराष्ट्राच्या इतिहासात फार महत्त्वाचा आहे. स्वतः ज्ञानदेवांनीच श्रीरामचंद्र ह्या यादव राजाचे यदुवंश-विलास, सकळकळानिवास व न्यायाचा पोषक क्षितीश म्हणून वर्णन केले आहे. दोनशे-अडीचशे वर्षांच्या ह्या कालखंडात देवगिरीच्या यादवांचे राज्य विस्तारत व विकास पावत होते. भास्कराचार्य, हेमाद्री, बोपदेव ह्यांच्यासारखे विद्वान ह्या कालखंडात झाले. भास्कराचार्य हे भारताच्या गणित व ज्योतिष विद्येचे शिरोमणीच होते. भास्कराचार्यांच्या वंशातील सात पिढ्या लगोलग चतुरस्र विद्वानांच्या झाल्या. ज्योतिष, वैद्यक,

धर्मशास्त्र, न्याय, मीमांसा, वेदान्त व व्याकरण ह्यांचे अध्ययन विदर्भासह महाराष्ट्रातील निरनिराळ्या पाठशाळांमध्ये चालू होते. बोपदेवांनी व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, साहित्यशास्त्रावर तीन, भागवतावर चार व ज्योतिषावर एक असे २७ प्रबंध लिहिले होते. बोपदेवांचे भागवतावरील हरिलीला, मुक्ताफळ, परमहंसप्रिया व मुकुट हे चार ग्रंथ विद्वन्मान्य झाले होते. ह्याचा अर्थ असा की, महाराष्ट्रात श्रीमद्‌भागवताचा महिमा फार होता; नाथसंप्रदायाचाही प्रभाव होता, हे ज्ञानदेवांच्या तीन पिढ्यांवर नाथसिद्धांचा अनुग्रह होता ह्यावरून लक्षात येते. शांकर अद्वैताला महाराष्ट्रात फारच मोठी प्रतिष्ठा लाभली होती, हे ज्ञानेश्वरीवरून लक्षात येते. अजंठा, वेरूळ इत्यादी लेण्यांवरून महाराष्ट्रात ज्ञानदेवांच्या अगोदर सुमारे हजार-बाराशे वर्षे मूर्ती, चित्र व स्थापत्य ह्या कला अनेक अंगांनी विकसित होत होत्या, ह्याचे प्रत्यंतर मिळते. महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे ही हेमाडपंती शैलीची आहेत, असे म्हणतात म्हणजे असे की, स्थापत्यकलाही फार लोकप्रिय झाली होती. ज्ञानेश्वरी हे त्या भव्य संस्कृतीचे सुंदर व पवित्र प्रतीक व प्रतिबिंबच आहे, असे म्हणावे लागते. इतक्या श्रेष्ठ साहित्यकृतीला श्रेष्ठ सांस्कृतिक पार्श्वभूमीच प्राप्त व्हावी लागते. त्याशिवाय ती निराधार ठरते, तिची सामाजिक उपपत्ती लागू शकत नाही.

बहिणाबाईने एका अभंगात भागवत धर्माचा म्हणजे वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानदेवांनी रचला, असे म्हटले आहे कारण तोपर्यंत धर्माची मुख्य भाषा किंवा माध्यम संस्कृत भाषाच होती. भगवद्‌गीतेचा व भागवताचा प्रचार सर्वत्र होता परंतु हे ग्रंथ संस्कृतमध्ये अडकले होते. लोकभाषेला परमार्थ विचाराचे समर्थ माध्यम प्रथम ज्ञानदेवांनी केले. संस्कृत ही देववाणी होती व धर्मामृत ह्या देववाणीत बंद होते. ह्या अमृताला पैजेने जिंकणारी देशी भाषा ज्ञानदेवांनी निर्मिली; धर्म, तत्त्वज्ञान व साहित्यकला ह्यांचे सामान्यजनांपर्यंत पोहचवणारे माध्यम निर्माण केले. शांतरस प्रतिपादिला. तो रस श्रेष्ठ ठरविल्यामुळे विवेकबुद्धीला उजाळा मिळाला आणि भक्तिमार्गाला ज्ञानेश्वरांनी शुद्ध केले. शिवाय भगवान बुद्धांपासून शंकराचार्यांपर्यंत संन्यासाश्रमच श्रेष्ठ असे परमार्थाचे साधन मानले गेले व ज्ञानदेवांपर्यंत संन्यासच श्रेष्ठ मानला जात होता; परंतु अनासक्तीचा गृहस्थाश्रमच परमार्थाचा श्रेष्ठ मार्ग म्हणून प्रथम ज्ञानदेवांनी दाखवून दिला. संन्यासमार्गाऐवजी गृहस्थाचा भक्तिमार्ग उजळविला. विश्व हे परमेश्वराचे सत्य स्वरूपच होय, त्याचाच उल्हास होय, असे सांगून, सगुण व निर्गुण ह्या दोन्ही एकाच परमसत्याच्या बाजू होत, असे वारंवार प्रतिपादले. ज्ञानदेवांची निश्चित ग्रंथरचना म्हणजे भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी), अनुभवामृत, चांगदेवपासष्टी व अभंगगाथा ही होय. अभंगगाथेत काही थोडे अभंग प्रक्षिप्त असावेत, अशी शंका राहते.

ज्ञानेश्वरांच्या चरित्रात रेड्याच्या तोंडून वेद वदविले, श्राद्धात प्रत्यक्ष पितर मंत्राद्वारे उपस्थित केले, मृत माणूस जिवंत केला इ. कथा दिल्या आहेत; कारण अशा प्रकारच्या अद्‌भुत कथा संतचरित्रात असतात. संतचरित्राचा किंवा धार्मिक कथांचा अद्‌भुत पुराणकथा हा आवश्यक असा भाग असतो. त्या कथांच्या संदर्भाने त्यानंतरचे साहित्य निर्माण झालेले असते.

**रामानंद : (१२९९ – १४१०).**

उत्तर भारतातील रामावत वा रामानंदी संप्रदायाचे प्रवर्तक व आद्य रामभक्त आचार्य. त्यांची संपूर्ण व अधिकृत अशी चरित्रपर माहिती उपलब्ध होत नाही. त्यांच्या चरित्रातील काही घटनांचेच उल्लेख इतर ग्रंथांतून आढळतात. अगस्त्यसंहिता, भक्तमाल, प्रसंगपारिजात, भविष्यपुराण, वैश्वानरसंहिता, रसिकप्रकाश, वैष्णवधर्म, रत्नाकर इ. ग्रंथांतून त्यांची थोडीफार चरित्रपर माहिती आढळते तथापि तिची प्रामाणिकता व विश्वासार्हता संदिग्ध आहे. त्यांचे जन्मस्थळ तसेच जन्म व मृत्यूच्या तारखा यांबाबत अभ्यासकांत मतभेद आहेत. त्यांचा जन्म प्रयाग येथे एका कान्यकुब्ज ब्राह्मण कुटुंबात माघ कृष्ण सप्तमी संवत् १३५६ रोजी झाल्याचे परंपरा व अगस्त्यसंहिता यांच्या आधारे बहुतांश अभ्यासक मानतात. रामानंदी संप्रदायाच्या अयोध्या, मिथिला, चित्रकूटादी मठांतूनही याच तिथीस त्यांची जयंती साजरी केली जाते. काहींच्या मते त्यांचे जन्मवर्ष इ. स. १४१० आहे. फार्कर त्यांचा जीवनकाल १४०० ते १४७० तर रामचंद्र शुक्ल तो पंधराव्या शतकाचा पूर्वार्ध व सोळाव्या शतकाचा आरंभ असा मानतात. त्यांचे जन्मस्थळ दक्षिण

भारतातील मेलकोटे (कर्नाटक) असल्याचेही काही अभ्यासक मानतात. त्यांचे मातापिता सुशीला व पुण्यसदन. लहानपणी त्यांना अध्ययनासाठी काशीस पाठवले होते आणि तेथे त्यांच्यावर आरंभी शांकर अद्वैत मताचा प्रभाव पडला असावा तथापि नंतर त्यांनी स्वामी राघवानंदांचे शिष्यत्व पतकरले. स्वामी राघवानंद हे विशिष्टाद्वैती सतपुरुष त्यांचे गुरू होत.

अध्ययनानंतर भारताची तीर्थयात्रा करून काशीस राघवानंदांच्या मठात परत आल्यावर तेथील शिष्यांनी यात्रा करताना रामानंदांनी खानपानाचे व स्पृश्यास्पृश्यतेचे निर्बंध पाळले नसावेत म्हणून त्यांच्या समवेत भोजनास नकार दिला. याचा परिणाम म्हणून गुरूच्या आज्ञेवरून त्यांनी आपला नवा उदार दृष्टिकोण असलेला व कर्मकांडास फारसे महत्त्व न देणारा रामावत वा रामानंदी संप्रदाय स्थापिला. काशी येथेच पंचगंगा घाटाच्या परिसरात त्यांनी एका गुहेत मठ स्थापून तेथेच कबीरादी बारा शिष्यांना उपदेश केल्याचे परंपरा मानते. काशी येथे वैशाख शुद्ध तृतीया, संवत् १४६७ (इ. स. १४१०) रोजी त्यांनी देह ठेवला असावा, असे बहुतेक अभ्यासक व परंपरा मानते. काही अभ्यासकांच्या मते इ. स. १५१० हे त्यांच्या निधनाचे वर्ष.

रामानंदांच्या शिष्यपरिवारातील बारा शिष्यांची नावे व त्यांचा नेमका काल यांबाबत तसेच त्यांचे नेमके ग्रंथकर्तृत्व कोणते, याहीबाबत मतभेद आहेत. परंपरेनुसार दिली जाणारी त्यांच्या प्रमुख बारा शिष्यांची नावे अशी : अनंतानंद, कबीर, सुखानंद, सुरसुरानंद, पद्मावती (स्त्री), नरहर्यानंद, पीपा, भावानंद, रैदास (चांभार), धना (न्रा), सेन (सेना न्हावी) व सुरसुरी. भक्तमालमध्येही ही बारा नावे आढळतात. ह्या बारा शिष्यांची समकालीनता समाधानकारक रीत्या प्रस्थापित होऊ शकत नाही, असे परशुराम चतुर्वेदी यांनी म्हटले आहे.

श्रीवैष्णवमताब्जभास्कर व श्रीरामार्चनपद्धति ह्या दोनच रचना निःसंदिग्धपणे रामानंदांच्या रचना होत. इतर अनेक प्रकाशित व अप्रकाशित रचना रामानंदांच्या म्हणून सांगितल्या जातात तथापि त्यांचे कर्तृत्व रामानंदांकडे देणे कठीण आहे. रामानंदकृत म्हणून सांगितल्या जाणाऱ्या रचनांत सिद्धान्तपटल, रामरक्षास्तोत्र, आनंदभाष्य, योगचिंतामणि, अध्यात्मरामायण, शिवरामाष्टक, हनुमानस्तुति इत्यादींचा अंतर्भाव होतो. आदिग्रंथ, सर्वांगी इ. ग्रंथांतून आलेली काही पदे रामानंदांची म्हणून सांगितली जातात तथापि त्यांचे कर्तृत्वही शंकास्पदच आहे.

रामानंदांचा पूर्वसंबंध रामानुजांच्या श्रीसंप्रदायाशी बहुतेक अभ्यासक भक्तमालचा पुरावा देऊन जोडतात. रामानंदांनीही स्वतः आपल्या रामार्चनपद्धतीमध्ये आपली जी गुरुपरंपरा दिली आहे ती प्रमाण समजली जाते. ती अशी:राम-सीता-पृतनापती-शठकोपनाथ-पुंडरीकाक्ष-श्रीराममिश्र-यामुन-पूर्णारामानुज-कुरेश-कोपदेव-माधवाचार्य-देवाधिप-पुरुषोत्तम-गंगाधर-सद्रामेश्वर-द्वारानंद-देवानंद-श्रियानंद-हर्यानंद-राघवानंद-रामानंद. सर्वसाधारणपणे ही सर्वमान्य अशी गुरुपरंपरा असून ती इतर प्राचीन परंपरांशीही संवादी आहे.

उत्तर भारताच्या संत परंपरेत रामानंदांचे स्थान निरतिशय महत्त्वाचे आहे. ते स्वतंत्र प्रज्ञेचे संत होते. त्यांच्या विचारांत सहृदयता, निर्भयता व उदार दृष्टिकोण दिसून येतो. त्यांचा गहिरा प्रभाव तत्कालीन व नंतरच्या उत्तर भारतातील आध्यात्मिक वातावरणावर पडून सर्वत्र मोठे परिवर्तन घडून आले. तत्कालीन प्रभावशाली धार्मिक नेता, मार्गदर्शक, जातिवर्णभेदाची जाचक बंधने शिथिल करणारा सुधारक, धर्मप्रचारासाठी संस्कृत ऐवजी हिंदीचा पुरस्कार करणारा भाषाभिमानी, भक्तिमार्गी असामान्य संघटक व प्रचारक म्हणून रामानंदांचे स्थान भारतीय परंपरेत वैशिष्ट्यपूर्ण मानावे लागते. काशीच्या विद्वान मुसलमानांच्या विचारांचाही त्यांच्यावर प्रभाव पडून त्यांचा दृष्टिकोण व्यापक बनला. तीर्थयात्रेत तत्कालीन भारताचे अवलोकन करून त्यांनी आपल्या विचारांस युगधर्मानुरूप उदार वळण दिले व नव्या संप्रदायाद्वारे त्या विचारांचा प्रचार केला. दक्षिणेतील व उत्तरेतील भक्तिआंदोलनास जोडणारा एक अपूर्व दुवा म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांचे उपास्य दैवत राम असून त्यांचा मार्ग भक्तिमार्गच आहे. रामाच्या ठायी अनन्यभावे शरणागती ही त्यांची साधना होती. बडथ्वाल यांच्या मते त्यांचा साधनामार्ग योग व प्रेम यांचे समन्वित रूप होय. वैष्णव व नाथ संप्रदायांचाही प्रभाव त्यांच्यावर होता. दक्षिण भारतातील वैष्णवांची जातिवर्णातील आळवार परंपरा

रामानुजांनी मानली होती व रामानुजांच्या विशिष्टाद्वैती मताचा रामानंदांनी पुरस्कार केला. रामानुजांनी अस्पृश्य अशा कांचीपूर्णास आपले गुरू मानले होते. तोच उदार व स्त्री पुरुष जातिवर्णभेदातीत धागा रामानंदांनी उत्तर भारताच्या रामभक्तिआंदोलनात विशेषत्वे उचलून धरला. रामभक्तीला सांप्रदायिक रूप देणारे रामानंद हे आद्य आचार्य होत. त्यांच्या प्रेरणेनेच मध्ययुगात व नंतरच्या कालात रामभक्तिपर हिंदी साहित्य प्राचुर्याने निर्माण झाले. कबीर, तुलसीदास व मैथिलीशरण गुप्त या श्रेष्ठ हिंदी कवींवर रामानंदांचा विलक्षण प्रभाव पडला. रामानंदांनी भक्तिमार्गाचे द्वार सर्वच जातिवर्णांच्या स्त्री पुरुषांना उघडून दिले. परिणामी उत्तर भारताच्या मध्ययुगात महान व उदार विचारधारा निर्माण होऊन ती समृद्ध झाली. त्यांच्या उदार भावनेने हिंदू व मुसलमानांना जवळ आणण्याची पार्श्वभूमी तयार करून दिली. हिंदीतील अनेक कवी आपले प्रेरणास्थान रामानंदच मानतात आणि ह्या कवींत काही मुसलमान कवीही आहेत.

**रामावत वा रामानंदी संप्रदाय :**

रामानंदांचा संबंध दक्षिण भारतातील रामानुजांच्या श्रीसंप्रदायाशी असल्याचे विल्सन, पीतांबरदत्त बडथ्वाल, मेकॉलिक, परशुराम चतुर्वेदी, रामरहलदास प्रभृती अभ्यासक भक्तमाल, रसिकप्रकाश, संप्रदाय दिग्दर्शन, हर्याचार्यकृत रामस्तवराजभाष्य इ. ग्रंथांच्या आधारे तसेच आपल्या रामार्चनपद्धतीमध्ये स्वतः रामानंदही मान्य करतात. फार्कर यांच्या मते रामानंद हे परंपरेने चालत आलेल्या रामावत संप्रदायाचेच अनुयायी होते आणि ह्या संप्रदायात अध्यात्मरामायण व वाल्मीकिरामायण ह्या ग्रंथांना आदराचे स्थान होते. संप्रदायाचे आधुनिक अभ्यासक स्वामी व रघुवराचार्य तसेच भगवदाचार्य यांच्या मते आदिकालापासून एकच श्रीसंप्रदाय होता तथापि कालांतराने मंत्र, उपासना, उपास्य इत्यादींबाबतच्या आचारभिन्नतेमुळे त्यांच्या दोन शाखा झाल्या. एका शाखेत रामस तर दुसरीत नारायणास (विष्णूस) उपास्य म्हणून महत्त्वाचे स्थान मिळाले. कालांतराने रामशाखा क्षीण होत गेली परंतु तिचा उद्धार व प्रचार रामानंदांनी केला. तथापि हे मत ग्राह्य मानण्यास ठोस पुरावा नाही. कदाचित मूळ श्रीसंप्रदाय उत्तर भारतातील समस्या सोडविण्यास असमर्थ ठरला असावा व त्यातूनच रामानंदांना अधिक उदार दृष्टिकोणाच्या तसेच कर्मकांड व रूढी यांच्या जाचक बंधनापासून मुक्त असलेला संप्रदाय प्रवर्तित करण्याची आवश्यकता भासली असावी.

संप्रदायाच्या अधिकृत ग्रंथांत रामानंदांच्या दोन ग्रंथांशिवाय आनंदभाष्य हा ग्रंथ विशेष महत्त्वाचा मानतात. तसेच भगवदाचार्यकृत त्रिरत्नी हा ग्रंथही प्रमाणभूत मानला जातो. सांप्रदायिक भाष्यांत जानकीभाष्ये आणि भगवदाचार्यकृत वेदान्तभाष्य महत्त्वपूर्ण होत. ह्या ग्रंथांतून संप्रदायाचे दार्शनिक विचार, धार्मिक सिद्धांत, आचारविचार इत्यादींचे दर्शन घडते.

रामानंदांचा प्रमुख मठ काशी येथील पंचगंगा घाटावर होता आणि त्यांचे प्रमुख बारा शिष्य होते याचा निर्देश वर आलाच आहे. रामानंदानंतर पंचगंगा मठाच्या गादीवर अनंतानंद आले. संप्रदायाच्या विकासात अनंतानंद आणि त्यांच्या शिष्य-प्रशिष्यांचा वाटा मोठा होता. मध्ययुगात अनंतानंदांचे शिष्य कृष्णदास पत्रोहारीने योग-चमत्कार दाखवून योग्यांचा पराभव केला व राजस्थानातील गलता येथे आपल्या संप्रदायाची गादी स्थापन केली. पत्रोहारीच्या कील्ह, अग्र व टीला ह्या तीन प्रमुख शिष्यांनी संप्रदायाचा विकास व विस्तार करून त्याला भक्कम स्वरूप दिले. मध्ययुगात तसेच त्यानंतरच्या काळात संप्रदायाच्या अनेक गाद्या निर्माण झाल्या. त्यातील ३५ गाद्या 'द्वारागाद्या' म्हणून विशेष प्रसिद्ध आहेत. ह्या द्वारागाद्या अनंतानंद, सुरसुरानंद, नरहर्यानंद, सुखानंद, रामकबीर, भावानंद, पीपा, योगानंद, अनभयानंद, कील्ह, अग्र, टीला, भगवन्नारायण, केवलबुवा इत्यादींच्या नावे स्थापिल्या गेल्या. संप्रदायाची प्रमुख स्थाने गलता, रेवासा, डाकोर, चित्रकूट, अयोध्या, मिथिला इ. होत. रामानंदी संप्रदायातील योगाचे प्रवर्तक कील्ह हे होते. द्वारकादासांनी त्याचा चांगला विकास केला. म्हणूनच काही रामानंदी साधू 'अवधूत' म्हणूनही ओळखले जातात. अग्रदास हे संप्रदायातील माधुर्यभावाचे प्रचारक असून आधुनिक काळात अयोध्या येथील जानकी घाटाचे महंत रामचरणदास यांनी माधुर्यभावाचा विशेष प्रचार केला.

दिगंबर, निर्मोही, निर्वाणी, खाकी, निरावलंबी, संतोषी व महानिर्वाणी हे संप्रदायाचे सात आखाडे असून त्यांत साधूंचे सहा वर्ग आहेत. हे वर्ग असे : यात्री, धोरा, बंदगीर, मुरीठिया, नागा व अतीत. कुंभपर्वात आणि त्या त्या ठिकाणीच फक्त नागा साधूंना दीक्षा दिली जाते. डाकोर, डाँडिया, नंदराम, त्यागी व महात्यागी हे संप्रदायाचे पाच 'खालसे' होत. मठांची व्यवस्था महंत, गोलकी व साधारण सभेद्वारा पाहिली जाते. वैष्णवांच्या दीक्षाविधीचे पंचसंस्कार-ताप, पुंड्र, नाम, मंत्र आणि याग-संप्रदायात प्रचलित आहेत. उपास्य दैवत द्विभुज राम असून संप्रदायाचा मंत्र रामषडाक्षर (→ रामाय नमः) हा आहे. रामानंदी संप्रदायाशी दुरून संबंधित असलेले पंथ-कबीर पंथ, सेना पंथ, रैदासी पंथ इ. होत.

**धर्मसिद्धांत :** रामानुजांचे विशिष्टाद्वैती दर्शनच हा संप्रदायही मानतो. ब्रह्म म्हणजेच राम. हे रामरूपी ब्रह्म निकृष्ट प्राकृतिक गुणांनी रहित असल्याने ते निर्गुण आहे आणि द्रव्य गुणांनी युक्त असल्याने सगुणही आहे. त्याच्यापासूनच सृष्टीची उत्पत्ती, स्थिती व लय होतात. तो करुणामय, कल्याणगुणाकर व त्रिलोकांत परमप्राप्त होय. भक्ताने त्याचे दास्य पतकरून ईर्षारहित व समाधानी रहावे. सीमा ही त्याची अनादी सहचरी वा प्रिया आणि पुरुषाकारभूता होय. ती शुभगुणयुक्त, वात्सल्याची परमसीमा व क्षमाशील आहे. राम हाच परमेश्वर होय. म्हणून त्याचीच उपासना इष्ट होय. वैष्णवांचे तत्त्वत्रय रामानंदांना मान्य आहे. तत्त्व हे चिदचिद्विशिष्टरूपाने एकच आहे. नाम व पदार्थभेदाने त्याचे (१) चित्, (२) अचित् व (३) ईश्वर असे तीन भेद होतात. ही तिन्ही तत्वे नित्य होत. चित् व अचित् या दोहोंनी विशिष्ट असल्याने परमेश्वर राम हा चिदचिद्विशिष्ट होतो.

जीव हा नित्य परमेश्वराच्या अपेक्षेने अज्ञ, चेतन, अज, सूक्ष्म, अनेक आणि जिज्ञासूंना वेय व स्वकर्मानुसार फल भोगणारा आहे. जीवाचे बद्ध, मुक्त इ. भेद आहेत. ' प्रकृती ' शब्दाचा वापर संप्रदायात सांख्याच्या अर्थानेच केला आहे. जगत्कारण प्रधानादी नसून ब्रह्मच होय. आपल्या संकल्पमात्रेकरून ब्रह्म सृष्ट्युत्पत्ती करते. प्रापंचिक बंधनातून मुक्त होऊन 'साकेतलोका'त प्रमाण करून सायुज्य मुक्ती प्राप्त करणे यासच मोक्ष म्हटले आहे. आनंदभाष्यानुसार मोक्ष हा परमपुरुषानुभवरूप मानला आहे. जीव सुषुम्ना नाडीतून निघून ब्रह्मात विलीन होतो. मुक्ती त्वरित न मिळता क्रमाने मिळते. जीव ब्रह्मसुखाचा अनुभव घेऊ शकतो.

ईश्वर व जीव यांत पिता-पुत्र, रक्ष्य-रक्षक, सेव्य-सेवकादी संबंध होत. ईश्वर शेषी व जीव त्याचा शेष होय. ईश्वराचे दास्य हेच जीवाचे एकमेव प्रयोजन होय. ईशकृपेवाचून जीवास मोक्ष प्राप्त होत नाही. म्हणूनच प्रपत्तीची आवश्यकता असते. प्रपत्ती व न्यास ही भक्तीची दोन प्रमुख अंगे होत. परमेश्वराच्या निर्हेतुक कृपेला प्रपत्ती व स्वतःच्या निवृत्तीला न्यास म्हटले आहे.

सृष्टीच्या पूर्वी सूक्ष्म चिदचिद्विशिष्ट ब्रह्म कारणावस्थेत, सृष्टीकाली तेच स्थूल चिदचिद्विशिष्ट होऊन उपादान कारण रूपात आणि विलयावस्थेत ते पुन्हा सूक्ष्म व चिदचिद्विशिष्ट स्वरूपात राहते.

भक्तीला मोक्षसाधन मानले असून तिची प्रपत्ती व न्यास ही दोन अंगे होत. सर्व भक्तीचे अधिकारी होत. द्विभुज राम हेच ध्येय असून भगवत्कृपाप्राप्तीसाठी नवविधा भक्ती प्रचलित आहे तथापि मुख्य भर दास्यभाव भक्तीवर आहे. माधुर्य, सख्य, वात्सल्य, शांतादी भक्तीही संप्रदायात आधुनिक काळात प्रचलित आहे. कर्मकांडास संप्रदायात फारशी मान्यता व महत्त्व नाही तथापि आन्हिक कर्म नित्यनेमाने करणे विहीत आहे. वैष्णवांचे पंचसंस्कारही प्रचलित आहेत. अष्टायात्रीय पूजापद्धतीही सांप्रत प्रचलित आहे.

श्रीसंप्रदायात व या संप्रदायात काही फरक असले, तरी त्यांचे दार्शनिक मत विशिष्टाद्वैतीच आहे. दोन्ही संप्रदायांत ब्रह्म हे चिदचिद्विशिष्टच मानले आहे आणि मोक्षाचे साधन परमोपास्याची प्रपत्ती हेच मानले आहे. श्रीसंप्रदायातील ब्रह्माच्या ठिकाणी राम, लक्ष्मीच्या ठिकाणी सीता कल्पून द्विभुज रामास परमोपास्य मानले आहे.

संप्रदायात जाचक कर्मकांड शिथिल करून सर्व जातिवर्णांच्या स्त्री पुरुषांना रामानंदांनी प्रवेश दिला व रामभक्तीचे नवे उदार पर्व सुरू केले. त्याचा मध्ययुगात व नंतरच्या काळात खूपच विकासही झाला.

कबीर : (सु. १३९८ — सु. १५१८). उत्तर भारतातील प्रख्यात संतकवी. त्याच्या जीवनाबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नाही. कबीराबद्दल अनेक आख्यायिका मात्र प्रसिद्ध आहेत. त्याचा जन्म-मृत्यू, जात, धर्म, गुरुपरंपरा इत्यादींबाबत विद्वानांत मतभेद आहेत.

सामान्यतः विक्रम संवत १४५५ (इ. स. १३९८) ज्येष्ठ शुक्ल पौर्णिमेस, सोमवारी त्याचा जन्म झाला असे सर्वमान्य मत आहे. मात्र मृत्यूसंबंधी पुढील तीन तिथ्या सांगितल्या जातात आणि त्या विवाद्य आहेत : (१) माघ शुद्ध ११, सं. १५७५ (इ. स. १५१८), (२) सं. १५५२ (इ. स. १४९५) आणि (३) मार्गशीर्ष शुद्ध ११, सं. १५०५ (इ. स. १४४८). सामान्यपणे मृत्यूची तिथी संवत १५७५ मानली जाते. म्हणजे तो १२० वर्षे जगला. कबीर ब्राह्मण विधवेच्या पोटी जन्मास आला. लोकलाजेस्तव तिने काशीजवळील लहरतारा तलावापाशी त्याला सोडून दिले. पुढे नीरू नावाच्या मुसलमान कोष्ट्याने त्याचा प्रतिपाळ केला, अशी दंतकथा प्रसिद्ध आहे. तो हिंदू होता की मुसलमान, हाही विवाद्य प्रश्न आहे. तो नाथपंथी 'जुगी ' किंवा 'जोगी ' जातीचा असावा,असेही एक मत आहे. तो अविवाहित होता, असे काहीजण मानतात, तर काहीजण तो विवाहित होता (पत्नी लोई) आणि त्याला दोन मुले होती, असेही मानतात. कमाल हा त्याचा पुत्र व शिष्य असल्याचेही सांगतात. त्याचा गुरू कोण हाही विवाद्य प्रश्न असून काहींच्या मते तो रामानंदांचा शिष्य होता, तर काहींच्या मते तो शेख तकींचा शिष्य होता. त्याचे वास्तव्य काशी येथे होते आणि व्यवसाय कोष्ट्याचा होता तसेच त्याचा मृत्यू गोरखपूरजवळील मगहर गावी झाला, यांविषयी मात्र सर्वांचेच एकमत आहे.

**संत कबीर**

कबीराच्या साहित्यावर व विचारांवर हिंदू, मुसलमान, सूफी, योगमार्गी, नाथपंथी या सर्वांचा प्रभाव आढळतो. त्यामुळेच अनेक वाद निर्माण झाले असावेत. कबीर निरक्षर असला, तरी ज्ञानी व बहुश्रुत होता. त्याची सर्व रचना मौखिक होती व ती त्याच्या अनुयायांनी लेखनबद्ध केली. कबीर ग्रंथावली व कबीर-बीजक वा बीजक हे त्याच्या रचनेचे अधिकृत संग्रह मानले जातात. तथापि त्यांतही अनेक पाठभेद आढळतात. शिखांच्या ग्रंथसाहिबातही कबीराची काही पदे समाविष्ट आहेत.

कबीराने कोणताही एक विशिष्ट पंथ अगर धर्म न अनुसरता साक्षात्कारी (स्वानुभवाच्या) ज्ञानालाच अधिक महत्त्व दिले. परमतत्त्व एकच असून ते सगुण-निर्गुणभेदातीत आहे. अद्वैत मताचा त्याच्या परमतत्त्वविषयक मतावर प्रभाव पडलेला आढळतो. दृश्यमान जगत माया असून, कनक आणि कांता यांच्या रूपाने ही माया साधकाला छळते, असे तो म्हणतो. ईश्वरोपासनेसाठी त्याने योगमार्ग व भक्तिमार्ग या दोहोंचाही पुरस्कार केला असला, तरी भक्तिमार्गावर अधिक भर दिलेला आहे. त्याची भक्ती प्रेमावर आधारलेली असून, ईश्वराशी त्याने गुरू, राजा, माता-पिता, स्वामी, मित्र, सखा, पती अशा अनेक नात्यांनी आपला संबंध प्रस्थापित केला आहे. मात्र या सर्वांत ईश्वर हा प्रियकर वा पती आणि भक्त,प्रेयसी व पत्नी या नात्यालाच त्याने अधिक महत्त्व दिले आहे. सूफी पंथाचा प्रभाव त्यावरून स्पष्ट होतो. या संबंधातूनच स्फुरलेली कबीराची गूढगुंजनपर कविता उत्कट आहे. शुद्ध चारित्र्य, निर्वैरता, निष्कामता, अनासक्ती व सात्विक राहणी या गुणांना तो अधिक महत्त्व देई.

जातपात, कुलाभिमान, धर्मभेद, रूढी, व्रतवैकल्ये, कर्मकांड इत्यादींवर त्याचा काडीमात्र विश्वास नव्हता. हिंदू अगर इस्लामी धर्ममार्तंडांच्या दोषांवर,विसंगतींवर व चारित्र्यहीनतेवर त्याने कडाडून हल्ले केले आहेत. त्याच्या काव्यातील दृष्टांतांतून, प्रतीकांतून, युक्तिवादांतून व प्रामाणिक अनुभूतींतून त्याच्या असामान्य प्रतिभेची साक्ष पटते. तत्कालीन समाजाबाबतचे त्याचे निरीक्षण सूक्ष्म असून, त्याच्या निर्भय, साहसी आणि कलंदर व्यक्तिमत्त्वाचे

विलोभनीय दर्शन त्याच्या काव्यरचनेतून घडते. कबीराने तत्कालीन धार्मिक मतभेदांची तीव्रता कमी करून वैष्णव आचार्यांचा भक्तिमार्ग सामान्य जनतेपर्यंत आणून पोहोचविला. बाह्य कर्मकांडात रुतून बसलेली धर्माची मूळ मानवतावादी तत्त्वे शोधण्याचा व त्यांचा पुरस्कार करण्याचा त्याने यशस्वी प्रयत्न केला. अद्वैती, सूफी, योगमार्गी,भक्तिमार्गी या सर्वांनाच आपलासा वाटावा, असा भक्तिमार्ग रूढ करण्याचा त्याने प्रयत्न केला. अनेक हिंदू-मुस्लीम कबीर पंथाचे अनुयायी झाले.

कबीराची भाषा पूरबी हिंदी असल्याचे त्यानेच नमूद करून ठेवले आहे. तथापि तीत व्रज, अवधी, खडी बोली, भोजपुरी, फार्सी, अरबी इ. बोलींतील व भाषांतील अनेक शब्दही आढळतात. त्याच्या भाषेला 'सधुक्कडी' असे म्हटले जाते आणि ती संमिश्र स्वरूपाची आहे. खडी बोलीचा तिच्यावर विशेष प्रभाव दिसतो. त्याच्या काव्यात रूपक, उत्प्रेक्षा, दृष्टांत इत्यादींचा वापर सर्रास दिसतो. त्याने 'उल्टवाँसी ' (विरोधी भासणारी शब्दरचना) प्रकारातही बरीच रचना केलेली आढळते. कवी म्हणून हिंदी साहित्यात कबीराचे स्थान श्रेष्ठ आहे.

**मीराबाई : (सु. १४९८—सु. १५४७).**

मध्ययुगीन भारतातील एक श्रेष्ठ कृष्णभक्त संत कवयित्री. 'मीरा' किंवा 'मीराँ' हा शब्द फार्सी भाषेतून राजस्थानीत आला असावा. त्याचा अर्थ 'श्रेष्ठ', 'श्रीमंत' असा आहे. 'अमीर' या शब्दाचे ते संक्षिप्तरूप आहे. संस्कृतमध्येही 'मीर' शब्द आहे पण त्याचा अर्थ 'समुद्र' असा आहे. मीरेची अधिकृत चरित्रपर माहिती फारशी उपलब्धही नाही आणि जी आहे, ती विवाद्य आहे. तिच्या वडीलांचे नाव रतनसिंह. ते मेडतिया (राजस्थान) येथील राठोड होते. मीरेचा जन्म तिच्या वडिलांच्या जहागिरीतील चोकडी (कुकडी) गावी झाला. बालपणी एका लग्नाची वरात पाहून 'माझा विवाह कोणाशी होणार ?' असे मीरेने आईस विचारले असता, आईने कृष्णाच्या मूर्तीकडे बोट दाखवून 'हा तुझा पती' असे सांगितले. तेव्हापासून कृष्णाची प्रेमभक्ती तिच्या मनात उत्पन्न झाली, अशी आख्यायिका आहे. बालपणीच मातृवियोग झाल्याने आजोबा राव दूदाजी यांच्या छत्राखाली मीरेचे बालपण व्यतीत झाले. दूदाजी मोठे वैष्णवभक्त होते. त्यांच्या भक्तीचा आणि धार्मिक वृत्तीचा खोल संस्कार मीरेवर झाला. नृत्य, संगीत, साहित्यादी कला तिला चांगल्या अवगत असाव्यात. अनेक अभ्यासकांच्या मते संत रैदास हे तिचे गुरू होत. उदयपूरचे महाराणा संग यांचे पुत्र भोजराज यांच्याशी तिचा विवाह झाला पण अल्पकाळात तिला वैधव्य प्राप्त झाले. त्यानंतर वडील, सासरे, दीर रतनसिंह इत्यादींच्या एकामागून एक झालेल्या निधनांमुळे तिची वैराग्यवृत्ती वाढत गेली व मन भक्तीतच अधिक रंगू लागले. राजघराण्यातील स्त्रीने सर्वांसमक्ष मदिंरात नाचावे, गावे हे न आवडल्याने राणा विक्रमादित्याने (भोजराजाचा सावत्र भाऊ) मीरेचा अनेक प्रकारे छळ केल्याचा निर्देश तिच्या पदांतून आढळतो. मीरेचा जन्म, विवाह, वैधव्य व मृत्यू यांच्या सनांबाबत अभ्यासकांमध्ये खूपच मतभेद आहेत तथापि जन्म १४९८, विवाह १५१६, वैधव्य १५२६ व मृत्यू द्वारका येथे १५४६ ह्या सनास सर्वसाधारणपणे अभ्यासकांची मान्यता आहे. १५३३ च्या सुमारास मीरा मेवाडवरून मेडत्यास आली असावी. १५३८ मध्ये जोधपूरच्या मालदेवाने वीरमदेवाकडून (मीरेचे काका) मेडता जिंकून घेतल्यानंतर ती सर्वस्वाचा त्याग करून वृंदावनास गेली असावी आणि १५४३ च्या सुमारास ती द्वारकेस गेली असावी. तेथेच ती शेवटपर्यंत होती.

रैदास, वल्लभसंप्रदायी विठ्ठलनाथ, तुलसीदास, जीवगोस्वामी इ. नावे मीरेचे दीक्षागुरू म्हणून घेतली जातात. तिच्या पदांत गुरू म्हणून रैदासाचे निर्देश अधिक आहेत निर्णायकपणे तिचा एकच विशिष्ट गुरू ठरविणे अशक्य आहे. विविध भक्तीसंप्रदायांचा व साधनापद्धतींचा तिच्या संवेदनशील मनावर प्रभाव पडला असणे व त्यांतून तिने त्या त्या व्यक्तींचा आदराने निर्देश केला असणे शक्य आहे.

तिच्या रचनांबाबतही निश्चित माहिती उपलब्ध नाही. नरसीजी रो माहेरो, गीत गोविंदकी टीका, राग गोविंद, सोरठके पद, मीराँबाईका मलार, गर्वागीत, राग विहाग आणि फुटकर पद ह्या तिच्या रचना म्हणून सांगितल्या जातात तथापि पदावलीचा अपवाद सोडल्यास वरील सर्वच रचनांचे तिचे कर्तृत्व शंकास्पद मानले जाते. पदावली ही तिची एकमेव, महत्त्वपूर्ण व प्रमाणभूत कृती म्हणता येईल तथापि पदावलीतील पदांची नेमकी संख्या अनिश्चित आहे. विविध

संस्करणांतील तिच्या पदांची संख्या किमान २० व जास्तीत जास्त १३१२ अशी आढळते. तिच्या पदावलीची आजवर अनेक संस्करणे निघाली. त्यांतील मीराँबाईके भजन (लखनौ १८९८), मीराँबाईकी शब्दावली (अलाहाबाद १९१०), मीराँबाईकी पदावली (प्रयाग १९३२), मीरा की प्रेमसाधना (पाटणा १९४७), मीराँ स्मृतिग्रंथ (कलकत्ता १९५०), मीराँ बृहत् पदसंग्रह (काशी १९५२), मीरा माधुरी (काशी १९५६), मीराँ सुधासिंधु (भीलवाडा १९५७) इ. संस्करणे उल्लेखनीय होत.

मीरेच्या भाषेचे मूळ रूप राजस्थानी असले, तरी तीत ब्रज व गुजरातीचेही बरेच मिश्रण आढळते. ही भाषा जुनी गुजराती व जुनी पश्चिमी राजस्थानी वा मारू गुर्जर म्हणता येईल. तिच्या रचनेत यांव्यतिरिक्त पंजाबी, खडी बोली, पूरबी इ. ज्या भाषांचे मिश्रण आढळते, त्याचे कारण तिच्या पदांचा झालेला प्रसार व त्यांची दीर्घकालीन मौखिक परंपरा हे होय. मीरेची पदे अत्यंत भावोत्कट व गेय असून ती विविध रागांत बद्ध आहेत. परशुराम चतुर्वेदी यांनी त्यांतील दोहा, विष्णुपद, सार, सरानी, उपमान, सवैया, चांद्रायण, कुंडल, तांटक, शोभन इ. छंद शोधून काढले आहेत. त्यांत विविध अलंकारांचाही वापर केला आहे तथापि ह्या गोष्टींपेक्षा त्यांतील स्त्रीसुलभ आर्तता, आत्मार्पण भावना, भावोत्कटता व सखोल अनुभूतीच काव्यदृष्ट्या अधिक श्रेष्ठ ठरते. ‘मीरा के प्रभु गिरिधर नागर’ ही तिच्या अनेक पदांत येणारी नाममुद्रा होय.

ह्या पदांतील प्रमुख विषय भक्ती असला, तरी त्यांत वैयक्तिक अनुभव, कुलमर्यादा, गुरुगौरव, आप्तांशी झालेले मतभेद व त्यांनी केलेला छळ तसेच आराध्यदेवतास्तुती, प्रार्थना, प्रणयानुभूती, विरह, लीलामाहात्म्य, आत्मसमर्पण इ. विषयही आले आहेत. भक्त, संगीतप्रेमी व काव्यरसिक ह्या सर्वांनाच ही पदे कमालीची मोहिनी घालतात. कृष्णविरहाची पदे त्यांत संख्येने अधिक असून ती उत्कट व हृदयस्पर्शी आहेत.

नाभादास, प्रियादास, ध्रुवदास, मलूकदास, हरिराम व्यास इ. संतचरित्रकारांनी व संतांनी मीरेबद्दल अत्यंत आदराने गौरवोद्‌गार काढले आहेत. मध्ययुगीन राजस्थानी, गुजराती व हिंदी साहित्यात संत कवियित्री म्हणून मीरेचे स्थान अनन्यसाधारण आहे. भाषिक प्रदेशांच्या मर्यादा उल्लंघून भारताच्या कानाकोपऱ्यांत मीरेची भक्तिभावाने ओथंबलेली उत्कट पदे पोहोचलेली आहेत. अनुप जलोटा, लता मंगेशकर, एम्. एस् सुब्बुलक्ष्मी ह्या प्रख्यात गायकांनी मीरेची पदे गायली असून त्यांच्या ध्वनिमुद्रिका अत्यंत लोकप्रिय आहेत. मंगेश पाडगावकरांनी मीरेच्या निवडक साठ पदांचे मराठीत रूपांतर केले आहे. (मीरा १९६५).

**नानकदेव : (१५ एप्रिल ? १४६९ — २२ सप्टेंबर १५३९).**

शीख धर्माचे प्रवर्तक व आद्य गुरू. त्यांचा जन्म लाहोर जिल्ह्यातील तळवंडी (पाकिस्तान)गावी वेदी शाखेच्या एका क्षत्रिय (खत्री) हिंदू कुटुंबात झाला. तळवंडी हे स्थान नानकदेवांमुळेच आता ‘नानकाना साहिब’ ह्या नावाने ओळखले जाते. त्यांच्या आईचे नाव त्रिपताका व वडिलांचे काळूचंद होते. नानकदेव हे एकुलते एक पुत्र असल्यामुळे लाडात वाढले. वडील काळूचंद वेदी हे सरकारी पटवारी होते. नानकदेवांचे शिक्षण घरीच झाले. लहानपणीच गणित तसेच हिंदी, अरबी, फार्सी ह्या भाषा ते शिकले. वेद व कुराणाचेही त्यांनी अध्ययन केले. बुद्धीने ते कुशाग्र होते. त्यांची वृत्ती लहानपणापासूनच सात्त्विक व धार्मिक होती. त्यांचा बहुतेक वेळ साधुसंतांच्या व फकिरांच्या सहवासात व एकान्तात बसून चिंतन करण्यात जाई. वडिलांना अर्थातच त्यांची ही वैराग्यशील वृत्ती आवडत नव्हती. नानकदेवांना गुरे चारणे, शेते राखणे इ. कामे त्यांनी दिली, तरी त्यांची वृत्ती पालटली नाही. त्यांचे मन लौकिक व्यवहारात रमावे म्हणून त्यांनी नानकदेव अठरा वर्षांचे झाल्यावर (१४८७)त्यांचा विवाह करून दिला. बटाला येथील मूलचंद खत्री यांची मुलगी सुलखनी ही नानकदेवांची पत्नी. नानकदेवांना काळूचंदांनी आपली मुलगी आणि जावई अनुक्रमे नानकी व जयराम यांच्या ओळखीने सुलतानपूर येथील सरकारी मोदीखान्यावर (धान्यकोठी) नोकरीस लावून दिले. नानकदेवांना पुढे श्रीचंद व लक्ष्मीदास असे दोन पुत्र झाले. सुलतानपूर येथील मोदीखान्यावरील नोकरी त्यांनी व्यवस्थितपणे केली व लौकीक अर्थाने संसारही नेटका केला तथापि खऱ्या अर्थाने त्यांचे मन परमार्थाकडेच धाव घेत राहिले. ते

परमेश्वरचिंतनात तल्लीन असत. दररोज सकाळी उठून ते जवळच्या ओढ्यावर स्नानास जात व नंतर काठावर येऊन प्रार्थना करत. एके दिवशी स्नानानंतर ते जवळच्या एका गुहेत जाऊन ध्यान करू लागले व त्यातच त्यांची समाधी लागली.ह्या अवस्थेत ते ओढ्यात वाहून गेले असावेत असा लोकांचा समज झाला. समाधी-अवस्थेत त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला आणि दिव्य मार्ग दिसला.ह्यासाक्षात्कारी दिव्य मार्गानुसार उपदेश करण्यासाठी, समाजातील लोकांचे दुःख दूर करण्यासाठी ते बाहेर पडले. गुहेतून बाहेर येताच ते 'कोणी हिंदूही नाही व कोणी मुसलमानही नाही' असे ओरडून सांगू लागले. त्यांच्या ह्या म्हणण्याचा इत्यर्थ हा, की हिंदु-मुस्लिम हे भेद खरे नसून सर्वजण प्रथम मानव आहेत व ते सर्व त्या एकमेव परमेश्वराची लेकरे आहेत. त्यांनी पुढील पाच तत्त्वांच्या आचरणावर आपल्या धर्मात भर दिला: (१) नाम व गान : ईश्वर नामाचा उच्चार करून त्याचे गुणगान करणे. (२) दान:सर्वांना दानधर्म करणे. (३) अश्नान (स्नान) : दररोज सकाळी स्नान करून शुचिर्भूत होणे. (४) सेवा : परमेश्वराची व मानवाची सेवा करणे आणि (५) सिमरन (स्मरण): आत्मसाक्षात्कार होण्यासाठी व ईश्वराची कृपा होण्यासाठी ईश्वराचे नामस्मरण करणे व त्याची प्रार्थना करणे. नानकदेवांना साक्षात्कार होताच त्यांनी आपली मोदीखान्यावरील नोकरी सोडून दिली व ते सद्‌धर्मप्रचारार्थ घराबाहेर पडले.

नानकदेवांच्या जीवनाशी अनेक आख्यायिका निगडित असून त्यांनी अनेक चमत्कार केल्याचेही सांगतात. साक्षात्कारानंतर १४९७ पासून सु. चोवीस वर्षे त्यांनी दूरवरच्या चार यात्रा करण्यात व्यतीत केली. ह्या यात्रांमध्ये त्यांनी विविधधर्मांच्या अधिकारी व्यक्तींशी, साधुसंतांशी, फकिरांशी, योग्यांशी, सूफींशी चर्चा, विचारविनिमय, संवाद केला. विविध चालीरीती, रूढी, श्रद्धांचा परिचय करून घेतला व दुष्ट रूढींविरुद्ध प्रचार करून त्यांच्या निर्मूलनाचेही प्रयत्न केले. त्यांनी केलेल्या चार प्रदीर्घ यात्रा अशा : (१) पूर्वेकडील यात्रा (१४९७ ते १५०९) : बांगलादेश व ब्रह्मदेशापर्यंत.(२) दक्षिणेकडील यात्रा (१५१० ते १५) : श्रीलंकेपर्यंत.(३) उत्तरेकडील यात्रा (१५१५ ते १७) : हिमालय व तिबेटपर्यंत (काहींच्या मते चीनपर्यंतही). (४) पश्चिमेकडील यात्रा (१५१७ ते २१) : मध्यपूर्वेतील इराक, इराण, मक्का-मदीना, बगदाद, अफगाणिस्तान इत्यादींपर्यंत.

तळवंडी येथील मर्दाना नावाचा एक मुसलमान हा नानकदेवांचा पहिला अनुयायी होय. तो नानकदेवांच्या भजनात रबाब नावाचे वाद्य वाजवून त्यांना साथ करीत असे. नानकदेवांचा आवाज मधुर होता व त्यांना संगीताचेही चांगले ज्ञान होते. स्वराचित उत्स्फूर्त भजने ते रागदारीत आपल्या मधुर आवाजात आळवीत. त्यांची ईश्वरभक्तीने ओथंबलेली भजने ऐकण्यासाठी अनेक लोक जमत.

चौथ्या यात्रेहून (पश्चिमेकडील) परतल्यावर त्यांनी रावी नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर कर्तारपूर नावाचा नवीन गाव वसविला. तेथे ते स्वतः नांगर चालवून शेती करू लागले. सकाळ-संध्याकाळचा त्यांचा वेळ कीर्तन, भजन, निरूपण व धर्मोपदेश यांत व्यतीत होई. त्यांना तेथे अनेक अनुयायी लाभले. त्यांचे उर्वरित सर्व आयुष्य तेथेच आपल्या कुटुंबियांसमवेत व अनुयायांसमवेत व्यतीत झाले.

मृत्युसमय जवळ येताच त्यांनी त्यांचा पट्टशिष्य भाई लेहणा याचे अंगद असे नामकरण करून त्याला आपला वारस नेमले. 'अंगद' याचा अर्थ स्वतःच्या शरीराचा भाग.१५३९ मध्ये आपली ज्योती अंगददेव यांच्या देहात ठेऊन त्यांनी देहत्याग केला. हिंदू आणि मुसलमान अनुयायांनी त्यांच्या मृत देहावरील चादर अर्धी अर्धी वाटून घेतली व आपापल्या धर्मांनुसार तिचा अंत्यसंस्कार केला. मधे एक आडवी भिंत उभारून दोन्ही समाजांनी त्यांचे कर्तारपूर येथे स्मारक उभारले.

ग्रंथसाहिब ह्या शीखधर्मग्रंथात नानकदेवांची एकूण ९४७ पदे अंतर्भूत आहेत. ग्रंथसाहिबाच्या सुरुवातीसच 'जपजी' म्हणजे 'ईश्वर चिंतन' या नावाने आलेला ३८ कडव्यांचा जो भाग आहे, तो नानकदेवांनी पंजाबीत रचला आहे. उदात्त सौंदर्य व आध्यात्मिक समृद्ध आशय यांचा उत्स्फूर्त काव्याविष्कार त्यात दिसून येतो. जपजीची संहिता ही प्रत्येक शीखव्यक्तीच्या घरी नित्यनेमाने म्हटली जाणारी प्रातःप्रार्थना झाली आहे.जपजीच्या सुरुवातीस'मूलमंत्र'नावाचे लहानसे

स्तोत्र असून त्यात ईश्वराच्या स्वरूपाचे संक्षिप्त वर्णन आलेले आहे.उर्वरित जपजीत याच मूलमंत्रातील प्रमुख विषयाचा विस्तार आहे. याशिवायसिधगोष्ट (सिद्धांशी वा योग्यांशी संवाद), अशदीवार (हा भागही दररोज सकाळी गुरुद्वारांतून म्हटला जातो), बारमाह (बारा महिन्यांचे गीत) इ. रचना नानकदेवांनी केल्या आहेत. ह्या आपल्या काव्यरचना त्यांनी संगीतातील विविध रागांत निबद्ध केलेल्या आहेत.

इस्लाममधील एकेश्वरवाद, ख्रिस्तीधर्मातील कृपेची (ग्रेस) कल्पना आणि हिंदूधर्मातील आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना (ईश्वर मानवरूपात अवतार धारण करतो, ही हिंदूंची अवतार कल्पना मात्र त्यांना मान्य नाही), यांचा आपल्या शीखधर्मात समन्वय व स्वीकार केला. एक शांतीचा दूत, प्रेम व विश्वबंधुत्वाचा पुरस्कर्ता, मानवतेचा पूजक म्हणून नानकदेवांनी केलेले कार्य व प्रस्थापित केलेला धर्म महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी केवळ सदाचार संपन्न असा नवा धर्मच स्थापन केला नाही, तर उत्तर भारतात जातिव्यवस्था, अस्पृश्यता, सतीची चाल, मूर्तिपूजा, पुरोहितवर्गाने लादलेले जाचक कर्मकांड, वाईट रूढी इ. विरुद्ध सतत लढा देऊन सामाजिक क्रांतीही घडवून आणली.'संगत'(धर्मसंघ) व 'लंगर'(अन्नच्छत्र) ह्यांचा त्यांनी पाया घालून त्यांद्वारे जातिधर्मातील प्रत्यक्ष आचरणात्मक सामाजिक परंपरेची सुरुवात केली. आजही समता व लोकशाहीपद्धतीचा उत्तम आदर्श म्हणून ह्या दोन संस्थांचा निर्देश करता येईल.

**रामदास : (१६०८— २ फेब्रुवारी १६८२).**

ज्ञानी, भक्तिमान आणि कर्मयोगी संतकवी. मूळचे नाव नारायण उपनाव ठोसर. 'रामदास' हे त्यांनी पुढे स्वतःसाठी घेतलेले नाव. एक थोर सिद्धपुरुष म्हणून लोक त्यांना आदरपूर्वक 'समर्थ' किंवा 'समर्थ रामदास' असे आजही म्हणतात.

रामदासांचा जन्म मराठवाड्यातील जांब ह्या लहानशा गावचा. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत, आईचे राणूबाई. राम आणि सूर्य ह्यांची उपासना त्यांच्या घरात होती. सूर्याजीपंत अनेक मुमुक्षूंना 'अनुग्रह' देत. रामदासांचे वडील बंधू गंगाधर 'श्रेष्ठ' आणि 'रामी रामदास' ह्या नावांनीही ओळखले जातात. रामदास आठ वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले आणि गंगाधर हे वडिलांचा संप्रदाय चालवू लागले.

वडिलांकडून आणि पुढे वडील बंधूंकडून आपल्याला मंत्रोपदेश मिळावा, म्हणून रामदासांनी प्रयत्न केला होता परंतु दोन्ही वेळी तो निष्फळ ठरला. रामदासांच्या एका अभंगावरून असे दिसते, की प्रत्यक्ष रामचंद्रांनीच स्वप्नात येऊन 'श्रीराम जयराम जयजयराम' हा त्रयोदशाक्षरी मंत्र त्यांना दिला.

आई आणि वडील बंधू ह्यांनी रामदासांचे लग्न, त्यांची इच्छा नसतानाही ठरविले पण मंगलाष्टकांमधले 'सावधान' हे शब्द ऐकताच भर लग्नमंडपातून ते पळून गेले, असे म्हटले जाते. त्यानंतर तपश्चर्येसाठी ते नासिकला गेले आणि नासिकजवळील टाकळी ह्या गावी असलेली एक गुहा त्यांनी त्यासाठी निवडली. राममंत्राचा तेरा कोटी जप, वेदशास्त्रे, वेदान्त, काव्ये, पुराणे ह्यांचा अभ्यास गायत्री-पुरश्चरणे संगीतसाधना त्यांनी येथेच केली. त्यानंतर ते भारतभ्रमणास निघाले (१६३२). काशी, प्रयाग, गया, अयोध्या, श्रीनगर हिमालयातील बद्रिनारायण आणि केदारनाथ अशी अनेक ठिकाणे त्यांनी पाहिली. अयोध्येत त्यांचे वास्तव्य सर्वाधिक म्हणजे अकरा महिने होते. पंजाबात जाऊन तेथील शीख धर्मगुरूंना ते भेटले. मानसरोवराची प्रदक्षिणा केली. पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घेतले. दक्षिणेतीलही अनेक तीर्थांना त्यांनी भेटी दिल्या. महाराष्ट्रातही ते हिंडले. ह्या प्रवासात समर्थांनी अनेक साधुमहात्म्यांच्या भेटी घेतल्या. राम, हनुमान ह्यांची मंदिरे उभी केली. मठ स्थापन केले. समर्थांच्या आयुष्यातील ह्या यात्रापर्वात त्यांना भारताच्या लोकस्थितीचे दर्शन घडले. ते झाल्यानंतर समाजातील देवधर्माचे अराजक मोडावे, खऱ्या परमार्थाची स्थापना करावी आणि ऐहिक पुरूषार्थ साधणारी समाजव्यवस्था घडवावी, ही त्यांची साध्ये ठरली. ती सिद्ध करण्यासाठी ते कृष्णातीरी आले (१६४४). हे त्यांच्या आयुष्यातले अखेरचे पर्व. ह्या पर्वात ते राजकारण म्हणजेच धर्मसंस्थापनेचे कार्य अखेरपर्यंत करीत राहिले. समर्थांना अभिप्रेत असलेला राजा हा परमार्थसंस्थापक आणि सज्जनांचा रक्षक असा होता. अशा राजाचे राज्य हे त्यांच्या

दृष्टीने रामराज्य होते. अशा रामराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी निर्माण करणे, म्हणजेच समर्थ करू पाहत असलेली धर्म-संस्थापना होती. समर्थांनी वापरलेल्या 'राजकारण' ह्या शब्दाचा अर्थ ह्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

राजकारण धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होत. शिवाजी महाराजांच्या राजकीय उलाढालींत रामदासांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता, हे जरी खरे मानले, तरी शिवाजी महाराजांनी हाती घेतलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला अनुकूल अशी मनोवृत्ती रामदासांनी लोकांत निर्माण केली, हे दिसून येते.

इस्लामी राजवटीत, भयापोटी लोकांनी डोहांत वा नद्यांत बुडविलेल्या अनेक देवतामूर्ती बाहेर काढून रामदासांनी त्याची पुन्हा प्रतिष्ठापना केली. धर्मप्रचारासाठी देवळे बांधली. देवांचे सार्वजनिक उत्सव सुरू केले. सामाजिक जीवनाची नैतिक परिशुद्धी करणे हे रामदासांच्या राजकारणाचे मर्म होय.

परमार्थाचा अधिकार पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही आहे, असे रामदास मानीत. अक्काबाई आणि वेणूबाई ह्या त्यांच्या अनुयायी स्त्रिया प्रसिद्ध आहेत त्यांच्याखेरीज अन्य अनेक स्त्रियांनी रामदासांचे अनुयायीत्व स्वीकारले होते. त्यांत काही मुसलमान फकीरही होते. उच्च पातळीवरील धर्मविचारंत हिंदू, मुसलमान असा भेद त्यांनी केला नाही.

समर्थांच्या पट्टशिष्याचे नाव कल्याण (मूळ नाव अंबाजी). तो त्यांचा मुख्य लेखनिक होता. दिनकर स्वामी, गिरिधर इ. त्यांचे अन्य शिष्यही प्रसिद्ध आहेत. समर्थांनी चाफळ येथे श्रीरामाची स्थापना केली. ह्या देवस्थानास हिंदू सरदारांची, तसेच विजापूरच्या इस्लामी राज्याचीही इनामे मिळाली. शिवाजी महाराजांनीही वर्षाला दोनशे होन इनाम दिले. अनेक गावेही इनाम म्हणून दिली.

शिवाजी महाराजांनी समर्थांचा उपदेश घेतला होता. तथापि महाराजांच्या स्वराज्यसंस्थापनेच्या कामात समर्थांचा प्रत्यक्ष संबंध होता, असे दाखविणारा आधार मिळत नाही. शिवराय-समर्थ भेट ही प्रथम स्वराज्यस्थापनेच्या अवघी दोनच वर्षे आधी (१६७२) झाली, असे काहींचे म्हणणे आहे. पण ज्या पत्रावरून ही पहिली भेट असे म्हणतात, ती पहिली भेट म्हणजे (राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोकास खटपटेस आणावे……… इ. मजकूर ह्या पत्रात आहे) त्या गावाची पहिली भेट असाही अर्थ निघू शकतो. शिवाजी महाराजांनी चाफळला दिलेल्या इनामाचे साल लक्षात घेतले, तर हे दोन्ही थोर पुरूष स्वाराज्यस्थापनेपूर्वी अनेक वर्षे परस्परांना ओळखत होते, हे निश्चित आहे. शिवाय विचारवंत गुरू आणि पराक्रमी राज्यकर्ता ह्यांचा संबंध दृढ होतो. तो वैचारिक देवघेवीने. शिवाजी महाराजांनी अनेक साधुसंतांचे उपदेश घेतले, असे म्हटले जात असले, तरी रामदास आणि शिवाजी महाराज ह्यांचे गुरूशिष्यनाते वेगळे म्हणायला हवे. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर (१६८०) दोन वर्षांनी समर्थांचे सज्जनगडावर निधन झाले.

समर्थांच्या ग्रंथकर्तृत्वात दासबोध आणि रामायण (दोन कांडे) ह्यांचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. दासबोध हा सर्मथांचा आणि रामदासी संप्रदायाचाही प्रमुख ग्रंथ. ७,७५१ ओव्यांच्या आणि दोनशे समासांच्या आजच्या दासबोधापूर्वी समर्थांनी एकवीस समासांचा एक दासबोधही रचलेला होता. मानवी सद्‌गुणांची वाढ व्हावी, लोक कर्तृत्वसंपन्न आणि परमार्थप्रवण व्हावेत, ही तळमळ दासबोधात दिसते.

रामदासी रामायणाची 'सुंदर' आणि 'युद्ध' अशी दोनच कांडे आहेत. समग्र रामायण रामदासांनी लिहिले नाही. सुंदरकांडाची श्लोकसंख्या १०१ असून युद्धकांडातील एकूण श्लोक १,३६२ इतके आहेत. 'निमित्य मात्र ते सीता विबुधपक्षपुरता' असे रामायणाचे सार रामदासांनी सांगितले आहे.

स्फुट कविता, प्रासंगिक कविता, आत्मारामसारखी वेदान्त प्रकरणे, अभंग, श्लोक, भूपाळ्या इ. अन्य बरीच रचना समर्थांची आहे. करुणाष्टक, मनाचे श्लोक, 'सुखकर्ता दुःखकर्ता वार्ता विघ्नाची….' ही महाराष्ट्र घरोघरी म्हटली जाणारी श्रीगणेशाची आरती ह्या रचना तर विख्यात आहेत. रामदासांनी 'समर्थ' होण्यापूर्वी तपश्चर्या केली, बहुश्रुतपणा मिळविला, कवित्व प्राप्त करून घेतले. ह्या साधनेत निराशेचे क्षणही अनेकदा आले. अशा प्रासंगिक निराशेचे व उद्वेगाचे प्रतिबिंब त्यांच्या करुणाष्टकात पडलेले आढळते. मनाच्या श्लोकांचा उर्दू अनुवाद शहा तुराव चिश्ती ह्या इस्लाम

धर्मीयाने सु. अडीचशे वर्षांपूर्वी केला आहे. रामदासांनी संगीताभ्यास केला होता. केदार, बागेश्री, आसावरी, काफी अशा विविध रागांमध्ये त्यांनी बांधलेली पदे, त्यांच्या काही पदांतून आढळणारे तबल्याचे किंवा नृत्याचे बोल ह्यांतून हे लक्षात येते.

इंग्रजी अंमलापूर्वीच्या काळात रामदासांची बरीच चरित्रे लिहिली गेली, पण ती पौराणिक पद्धतीची आहेत. समर्थशिष्य गिरिधरस्वामी, हनुमंतस्वामी, महिपतिबुवा, दिनकरस्वामी, मेरुस्वामी, उद्धवसुत आदींनी लिहिलेल्या चरित्रांचा उल्लेख करता येईल.

**तुलसीदास : (१५३२—१६२३).**

युगप्रवर्तक हिंदी महाकवी. त्यांची जन्मतिथी, जन्मस्थान, जात, गुरू, मातापिता या सर्वांबद्दल मतभिन्नता आढळते. हाजीपूर, तारी, राजापूर (जि. बांदा), सोरो सूकरक्षेत्र (जि. एटा), अयोध्या इ. गावांची नावे गोस्वामी तुलसीदासांचे जन्मस्थान ठरविताना पुढे आली आहेत. पंडित रामदत्त भारद्वाज यांनी या सर्व संशोधनांचा अभ्यास करून तुलसीदासांचा जन्म सारो या स्थानाजवळच रामपूर येथे झाला, असे निश्चित केले आहे. ते सवरिया, सारस्वत, सरयूपारीण, सनाढ्य आणि कान्यकुब्ज या ब्राह्मण जातींपैकी निश्चित कोणत्या जातीचे होते याबद्दल मतभेद आहेत. ते ब्राह्मण नसावेच, असेही एक मत पुढे आले आहे. जगन्नाथदास, रामदासजी, नर्ह्यानंद, नरहरिदास, नृसिंह अशी त्यांच्या गुरूची नावे दिली जातात. बहुसंख्य विद्वान त्यांचा विवाह झाला होता, असे मानतात.

त्यांच्या जन्मतिथीसंबंधी सहा संवत तिथी सामान्यतः पुढे आल्या आहेत. त्या अशा : संवत १५५४, १५६०, १५६८, १५८३, १५८९, आणि १६००. बहुसंख्य विद्वान भाद्रपद शुद्ध एकादशी मंगळवार, संवत १५८९ म्हणजे इ. स. १५३२ ही तिथी मान्य करतात. मृत्यू मात्र संवत १६८० श्रवण वद्य तृतीया, शनिवार या तिथीला म्हणजे १६२३ मध्ये झाला, याविषयी सामान्यतः एकमत आहे.

तुलसीदासांच्या मातापित्यांच्या नावांविषयीही मतभेद आहेत पण त्यांच्या पित्याचे नाव आत्माराम दुबे असावे याविषयी विद्वानांचे बहुमत आहे. त्यांच्या आईचे नाव हुलसी होते. रामचरितमानसाच्या बालकांडात त्यांनी तसा उल्लेख केला आहे. तुलसीदासांचे बालपण फारच कष्टात गेले. त्यांचा जन्म मूळनक्षत्रावर झाला असल्यामुळे त्यांच्या आईवडिलांनी त्यांचा जन्मताच त्याग केला व त्यांना नरहरिदास यांनी वाढवले, अशा कथा प्रचलित आहे. तुलसीदासांच्या जन्मानंतर सु. दहा महिन्यांतच त्यांच्या आईवडिलांचा मृत्यू झाला व तुलसीदास अनाथ झाले, अशीही कथा प्रचलित आहे. त्यांना आईवडिलांचे सुख फारसे मिळाले नाही, एवढे निश्चित. लहानपणी त्यांना एका हनुमानमंदिरात आश्रय मिळाला. त्या दैवताची पूजा ते करू लागले. उदरनिर्वाहासाठी त्यांना भिक्षांदेही करावी लागली. यासंबंधी त्यांच्या काव्यांत विपुल उल्लेख आढळतात.

त्यांचा विवाह झालाच नव्हता किंवा एकदा झाला होता किंवा तीन वेळा झाला होता, अशी मते मांडली जातात. पण सामान्यतः रत्नावली नावाच्या मुलीशी त्यांचा विवाह झाला होता हि जनश्रुती खरी आहे, असे पुष्कळ संशोधकांचे मत आहे त्याला काव्यांतर्गत पुरावाही सापडतो. ते तरुणपणी पत्नीवर खूप आसक्त होते व या आसक्तीपायी लोकाचाराची पर्वा न बाळगता ते पत्नीला तिच्या माहेरी भेटावयास गेले. वादळ—पावसांतूनही भेटायला आलेल्या या आसक्त पतीला त्या धर्मनिष्ठ पत्नीने चांगलेच खडसावले. असे म्हणतात, की तिच्या मर्मवेधी बोलण्याने तुलसीदासांचे मन संसारातून उडाले व रामभजनी स्थिर झाले. साध्वी रत्नावलीने त्यांच्या पादुकांची पूजा करीत उर्वरीत आयुष्य व्यतीत केले. रत्नावली १५९४ पर्यंत हयात होती.

तुलसीदासांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने खूप प्रवास केला पण बहुतांशी त्यांचे वास्तव्य काशी येथेच होते. त्यांचे अनेक ग्रंथ काशीमध्येच लिहिले गेले. त्यांना बाहुपीडा होती. त्यांच्या मृत्युसमयी त्यांच्या काखेत गाठी आल्या होत्या.

बाहुपीडा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी हनुमान बाहुक काव्याची रचना केली. काशीतील अस्सीघाटावर त्यांचे निवासस्थान आजही दाखविले जाते.

तुलसीदासांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते. ते गौर वर्णाचे, दयाळू व परोपकारी होते. काशीमध्ये त्यांना खूप त्रास झाला पण त्यांची सहिष्णू वृत्ती व सोशिकपणा कधी कमी झाला नाही. ते मनाने कोमल व स्वभावाने उदार होते. रामावर व हनुमानावर त्यांची अपार श्रद्धा होती. त्यांना हनुमानाचे, शिवाचे व रामाचे साक्षात दर्शन झाले होते, अशीही भाविकांची श्रद्धा आहे. त्यांच्या विनम्र वृत्तीचे प्रतिबिंब त्यांच्या सर्वच लेखनात उमटलेले दिसते. ते रसिक, भावनाशील व विनोदप्रियही होते. त्यांच्या सखोल आत्मपरिक्षणाचा प्रत्यय त्यांच्या दोहावली, विनयपत्रिका इ. ग्रंथांत येतो. तुलसीदास गुणग्राहक होते व म्हणून तत्कालीन विभिन्न संप्रदायांतील चांगल्या गोष्टींचा समन्वय ते करू शकले. त्यांनी आपल्या काव्यांत निसर्गाची सुंदर शब्दचित्रे रेखाटली आहेत. माणसाच्या स्वभावाचे त्यांना चांगले ज्ञान होते. ते स्पष्टवक्ते व निर्भय वृत्तीचे होते. सुखदुःखांचा अनुभव, प्रवास, सत्संग व विशाल अध्ययन यांच्या प्रभावातून त्यांची जीवनदृष्टी तयार झाली. तिचा काव्यात्मक आविष्कार त्यांच्या साहित्यात सर्वत्र दिसतो. त्यांच्यावर प्रतिभेचा वरदहस्त होता.

तुलसीदासांच्या नावावर सु. ३९ ते ५४ पर्यंत ग्रंथ दाखविले जातात परंतु त्यांतील फक्त बाराच ग्रंथ त्यांचे आहेत, हे निश्चित झाले आहे. इतर ग्रंथ फारसे महत्त्वाचेही नाहीत. ते बारा ग्रंथ असे : (१) रामलला नहछू, (२) रामाज्ञाप्रश्न, (३) वैराग्य संदीपिनी, (४) रामचरितमानस, (५) पार्वतीमंगल, (६) जानकीमंगल, (७) बरवै रामायण, (८) गीतावली, (९) कृष्णगीतावली, (१०) विनयपत्रिका, (११) दोहावली, (१२) कवितावली. यांतील तुलसीदासांच्या महान कविव्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय रामचरितमानस आणि विनयपत्रिका या दोन कृतींतून प्रकर्षाने येतो.

(१) रामलला नहछू : सोहर छंदात लिहिलेला हा छोटा ग्रंथ २० पद्यांत पूर्ण झाला आहे. नहछू म्हणजे नखे कापणे. यज्ञोपवीत संस्कारातील नखे कापण्याच्या विधीचे वर्णन यात आहे. काही विद्वान रामचंद्रांच्या विवाहप्रसंगीच्या संस्काराचे वर्णन आहे असे म्हणतात पण ते खरे नाही. हे अवधी भाषेत आहे. काव्याच्या दृष्टीने ही रचना सामान्य आहे.

(२) रामाज्ञाप्रश्न : सात सर्गांत व एकूण ३४३ दोह्यांत ही रचना आहे. यात रामकथा अशा तऱ्हेने वर्णिली आहे, की प्रत्येक दोह्यात शुभ व अशुभ असा संकेत व्यक्त व्हावा. प्रश्नकर्ता याच्या साह्याने आपल्या प्रश्नाचे अनुकूल वा प्रतिकूल उत्तर शोधतो. अवधी व व्रज अशा मिश्र भाषेतील ही रचना काव्यदृष्ट्या महत्त्वाची नाही.

(३) बैराग्य संदीपिनी : या ग्रंथात ४६ दोहे, २ सोरठे छंद व १४ चौपाया आहेत. त्यात रामनामाचे माहात्म्य व रामध्यानाचे महत्त्व सांगितले आहे. संतस्वभाव, संतमहिमा हे विषयही त्यात आहेत. ज्ञान, भक्ती व वैराग्य यांचे निरूपण त्यात केले असून शांत रसाचा परिपोष आढळतो.

(४) रामचरितमानस : तुलसीदासांच्या काव्यगुणांचा प्रकर्ष या महाकाव्यात आढळतो. रामकथा चार वक्ते व चार श्रोते यांच्यातील संवादरूपाने सांगितली आहे. मुख्यतः चौपाई व दोहा या छंदांत रचलेले हे काव्य अवधी बोलीत लिहिले असून संस्कृत शब्दांचा त्यात प्राचुर्याने उपयोग केला आहे. सात कांडांत पूर्ण केलेल्या या काव्यात भक्तीचा संदेश दिलेला आहे. हे चरित्र्यकाव्य ओघवत्या, रसाळ शैलीत लिहिले आहे. रामचंद्रांच्या रूपाने तुलसीदासांनी मानवी जीवनाचा भव्य आदर्श समाजापुढे ठेवला. त्यांचे लोकजीवनाचे मार्मिक ज्ञान त्यात दिसून येते. म्हणूनच हिंदी भाषेतील रामकथेवरील दुसरे कोणतेही काव्य रामचरितमानसाइतके लोकप्रिय झालेले नाही. ज्ञान व भक्ती, निर्गुण व सगुण, शिव व सौंदर्य, शक्ती व सत्य, वैयक्तिक कल्याण व लोककल्याण यांचा सुंदर समन्वय या काव्यात आढळतो. धार्मिक, सांप्रदायिक मतभेद मिटवून आदर्श जीवनाचे ध्येय त्यात जनतेसमोर ठेवले आहे. भाषासौंदर्य, रसनिर्मिती, प्रभावी प्रसंगचित्रण, सूचक घटनांचे संयोजन, उत्तम स्वभावचित्रण व मनाला उन्नत करणारे संस्कार या सर्वच दृष्टींनीं हे काव्य अभिजात मानले जाते. रामचरितमानस संवत १६३१ (इ. स. १५७४) मध्ये रचले गेले.

(५) पार्वतीमंगल : अवधी भाषेतील या रचनेत १४८ अरूण छंद व १६ हरिगीतिका छंद आहेत. त्यात शिव—पार्वती विवाहाचे वर्णन असून त्यावर कुमारसंभवाची छाप जाणवते.

(६) जानकीमंगल : २१६ छंदांत (१९२ अरूण छंद व २४ हरिगीतिका) लिहिलेल्या या काव्याचा विषय सीता—रामविवाह हा आहे. हा प्रसंग रामचरितमानसातील प्रसंगापेक्षा वेगळ्या तऱ्हेने आला आहे. भाषा अवधी आहे. यावर वाल्मिकि रामायणाची छाप आहे.

(७) बरवै रामायण : वेळोवेळी लिहिलेल्या बरवै छंदांचे हे संकलन आहे. यात रामकथेतील काही प्रसंगांचे चित्रण आहे. स्फुट रूपाने लिहिलेल्या या ग्रंथात ६९ छंद आहेत. प्रारंभीचे काही छंद अलंकारनिरूपणासाठी लिहिलेले आहेत. काही छंद उत्कृष्ट आहेत.

(८) गीतावली : या ग्रंथात ३२८ पदे आहेत. ही पदे रामजीवनासंबंधी असून ती वेगवेगळ्या वेळी लिहिलेली आहेत. ही पदे व्रज भाषेत व अनेक रागांत निबद्ध आहेत. तुलसीदासांचे संगीताचे ज्ञान यात दिसते. शृंगार, करूण, वीर व शांत रसांची अभिव्यक्ती यात चांगली झाली आहे. अलंकारयोजनेच्या दृष्टीनेही ही पदे महत्त्वाची मानली जातात.

(९) कृष्णगीतावली : व्रज भाषेतील हा स्फुट पदांचा संग्रह असून त्यात कृष्णाची कथा गायिली आहे. बाललीला, गोपीची गाऱ्हाणी, उखळाला बांधले जाणे, इंद्रकोप, गोवर्धन—धारण, नवनीत—लीला, सौंदर्यवर्णन, गोपिका—प्रेम, मथुरा—गमन, गोपी—विरह, भ्रमरगीत, द्रौपदी—वस्त्रहरण इ. विषय त्यात वर्णिले आहेत. ही तुलसीदासांची सरळ पण उत्कृष्ट काव्यरचना मानली जाते.

(१०) विनयपत्रिका : रामचरितमानसानंतरची ही महत्त्वाची कृती अतिशय प्रौढ व प्रगल्भ असून आपल्या भौतिक व आध्यात्मिक कष्टांच्या निवारणार्थ रामचंद्राने कृपा करावी, या हेतूने कवीने ती लिहिलेली आहे. १७६—२८० पर्यंत पदे वेगवेगळ्या प्रतींत आढळतात. ही पदे वेगवेगळी असली, तरी या सर्व रचनेत एक सूत्र दिसते. रामचंद्राच्या दरबारी आपल्यावर कृपा व्हावी म्हणून दुःखांची कैफियत असलेली चिठ्ठी तुलसीदास पाठवीत आहेत. राजाच्या दरबारात प्रवेश मिळविण्यासाठी आधी पहारेकऱ्यांना व इतर अधिकाऱ्यांना खूष करावे लागते. म्हणून गणेश, सूर्य, शिव, पार्वती इ. देवतांची त्यात स्तुती केली आहे. नंतर हनुमानाची प्रार्थना आहे. योग्य वेळी रामचंद्राजवळ आपली हकीकत सांगावी अशी सीतेला प्रार्थना केली आहे. ही रचना गीतात्मक असून अनेक रागांचाही तीत प्रयोग केला आहे. तुलसीदासांनी केलेले आत्मनिरीक्षण व आपल्या अपराधांची दिलेली प्रांजळ कबुली परिणामकारक आहे. माणसाच्या मनाचे सूक्ष्म ज्ञान तीत प्रकट झाले आहे. आपल्या मनोवृत्तीचे निरूपण करताना कवीचे ज्ञान, वैराग्य, भक्ती, तत्त्वज्ञान यांसंबंधी विचार प्रकट झाले आहेत. भक्तीचे उत्कट आविष्कार तीत आढळतात. संगीतात्मकता, भाषासौंदर्याचे विविध विलास तसेच तत्त्वज्ञान व काव्य यांचा सुंदर मेळ, या दृष्टीने ही रचना यशस्वी झालेली आहे. तुलसीदासांच्या आत्मसाधनेचा उत्कृष्ट काव्यात्मक परिपाक, असे रचनेविषयी म्हणता येईल.

(११) दोहावली : अवधी भाषेत लिहिलेल्या दोह्यांचा हा संग्रह असून काही दोहे रामचरितमानस, रामाज्ञाप्रश्न, बैराग्य, संदीपिनीमधील आहेत. काही स्वतंत्र आहेत. नीती, भक्ती, राममहिमा, नाममाहात्म्य, तत्कालीन परिस्थिती इ. विषयांवर लिहिलेले हे सु. ५७३ दोहे आहेत.

(१२) कवितावली : वेळोवेळी लिहिलेल्या सु. ३२५ पद्यांचा हा संग्रह. यात रामकथेचे वर्णन आहे. सवैया, छप्पय, झूलना या छंदांतील काही रचनाही यात समाविष्ट आहेत. रामाच्या ऐश्वर्याचे वर्णन यात आले आहे. रामाची दास्यभावाचे उपासना करावी, म्हणून हा ग्रंथ लिहिलेला आहे. यातील उत्तराकांड मोठे आहे. यात ज्ञान, वैराग्य व भक्तीचा महिमा वर्णन केलेला आहे. आत्मग्लानीने विद्ध होऊन रचलेल्या काही छंदांत कवीच्या पूर्वजीवनाचे धागेदोरे सापडतात. कवितावलीमध्ये वीर व रौद्र रसांचा विशेष आविष्कार आढळतो. उत्तरकांडात शांत रस आहे. शैलीची विविधता या रचनेत आढळते.

हिंदी साहित्यातील भक्तियुग पंधराव्या शतकाच्या आरंभी सुरू होते. या काळातील मोगलांच्या राजवटीत राजकीय आणि धार्मिक आक्रमणाचे संकट उभे राहिले होते. रामचरितमानस या ग्रंथात या परिस्थितीचे प्रतिबिंब पडलेले आहे. धर्माचे मूळ स्वरूप बाजूला पडले. कबीरांसारखे निर्गुणवादी, तुलसीदासांसारखे रामभक्त व सूरदासांसारखे कृष्णभक्त यांनी सत्य, प्रेम, सहानुभूती, करुणा, दया, शांती या मूल्यांवर आधारलेल्या भक्तिमार्गाचा जनतेने अवलंब करावा, असा प्रयत्न केला. तुलसीदासांनी तत्कालीन संप्रदायांत समन्वय करण्याचा प्रयत्न केला आणि शुद्ध धर्माचे स्वरूप भक्तीच्या मार्गाने लोकमानसात रुजावे असा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी आपल्या महाकाव्याचा नायक म्हणून जो राम निवडला आहे, त्याच्या व्यक्तिमत्वात शक्ती, शील, सौंदर्य यांच्या समन्वयाचा परमोत्कर्ष साधला.

तुलसीदासांचे तत्त्वज्ञान एका अर्थाने समन्वयवादी होते. शंकराचार्यांचा अद्वैतवाद व रामानुजाचार्यांचा विशिष्टाद्वैतवाद या दोहोंचा स्वीकार करणारी भूमिका त्यांनी घेतली आहे. सामान्यतः रामानुजाचार्यांच्या तत्त्वज्ञानाकडे त्यांचा कल अधिक होता असे म्हणता येईल. विनयपत्रिकेत मात्र ते द्वैतवादाकडे अधिक झुकलेले दिसतात. जगताचे स्वरूप सांगताना शंकराचार्यांच्या मायावादाचे अनुसरण करूनही शेवटी भक्तिमार्गाचे विवेचन करताना मात्र ते रामानुजाचार्यांचे अनुसरण करतात. तुलसीदासांनी मायेची दोन रूपे सांगितली आहेत. अविद्या—माया व विद्या—माया. अविद्या—माया माणसाला जंजाळात गुरफटवते, तर विद्या—माया ही ब्रह्माची शक्ती आहे. विद्या—माया विश्वाचे सृजन, पोषण व संहारही करते. या विद्या—मायेच्या मदतीनेच जीव जीवनमुक्त होतो. अविद्या—मायेने पतन होते. हरिभक्त अविद्येच्या प्रभावापासून दूर राहू शकतात. कधी तत्त्वतः जीव व ब्रह्म यांना एक मानूनही तुलसीदास मुक्तीच्या अवस्थेत जीव व ब्रह्म यांचे द्वैत स्वीकरतात. म्हणूनच ते शंकराचार्यांप्रमाणे अद्वैती आहेत, की रामानुजाचार्यांप्रमाणे विशिष्टाद्वैती आहेत, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. ते भक्तिमार्गी असल्याबद्दल मात्र वाद नाही.

तुलसीदासांचा भक्तिमार्ग रामाच्या अनन्यभक्तीवर अधिष्ठित आहे. त्यांच्या भक्तिमध्ये राम व भक्त यांचे नाते सेव्य—सेवक भावाचे आहे. तुलसीदासांनी रामाची भक्ती करताना नवविधा भक्तिचा पुरस्कार केला. रामनामाचे माहात्म्यही त्यांनी अपरंपार मानले आहे. या भक्तिमार्गात रामाची उपासना रामाच्या सगुण रूपावर केंद्रित आहे. राम सर्वथा स्वतंत्र आहे पण तो लीला करण्यासाठी अनेक रूपे घेतो, असेही तुलसीदास सांगतात. तुलसीदासांच्या भक्तीमध्ये विनयाला पराकोटीचे स्थान आहे. अहंकाराचे निराकरण होऊन दासाने विनम्र झाल्याशिवाय भगवद्भक्तिचे द्वार खुले होत नाही, अशी त्यांची श्रद्धा आहे. या अहंकाराच्या निराकरणासाठीच आत्मपरिक्षण व आत्मदोषांची तीव्र जाणीव त्यांनी आवश्यक मानली आहे. भक्तीसाठी सत्संग, ज्ञान, वैराग्य, तप. संयम, श्रद्धा, प्रेम, भगवत्कृपा, शरणागती या गोष्टीही महत्त्वाच्या मानल्या आहेत. एका तऱ्हेने तुलसीदासांच्या भक्ताचे व्यक्तिमत्त्व एका आदर्श मानवाचे व्यक्तिमत्त्व होऊन जाते.

तुलसीदासांनी मानवतावादी धर्म शिकवला. त्याचे सूत्र 'परहित सरिस धरम नहिं भाई' असे सांगता येईल. माणसाला संकुचिततेकडून विराटतेकडे वळविण्याचा त्यांनी आपल्या काव्यातून प्रयत्न केला.

तुलसीदासांना प्रचंड लोकप्रियता मिळाली याचे कारण त्यांनी जो नवा मार्ग सांगितला त्याला परंपरेची भक्कम बैठक दिली, हे होय. वेद, उपनिषदे, गीता, भारतीय दर्शने, वाल्मीकि रामायण यांच्या आधाराने त्यांनी आपले विचार लोकांच्या पुढे ठेवले. तुलसीदास समन्वयवादी होते पण त्यांच्या समन्वयवादाला विचारांची, दूरदृष्टीची बैठक होती. हजारीप्रसाद द्विवेदी म्हणतात, 'तुलसीच्या काव्यांत लोक व शास्त्र यांचाच समन्वय आहे असे नाही, तर वैराग्य आणि गृहस्थधर्म, भक्ती आणि सगुण, पुराण आणि काव्य, भावावेग आणि अनासक्त चिंतन, ब्राह्मण आणि चांडाळ, पंडित आणि अपंडित यांतील समन्वय आहे'. तुलसीदासांचे काव्य सर्व मतांच्या लोकांना आपलेसे वाटते. तुलसीदासांनी आदर्श गृहस्थधर्माचे, आदर्श कुटुंबव्यवस्थेचे चित्र रेखाटले. माणसाची कुटुंबातील व समाजातील कर्तव्ये आणि मर्यादा यांचा आदर्श त्यांनी सांगितला. हे सर्व रामकथेच्या माध्यमातून सांगितल्यामुळे, हा ग्रंथ उत्तर भारताच्या सामाजिक जीवनात पुष्कळ वर्षांपर्यंत उच्च नीतिमूल्यांचे संस्कार घडविणारा एक संस्कृतिग्रंथ म्हणून आदरणीय ठरला.

तुलसीदासांनी व्रज व अवधी दोन्ही भाषांचा उपयोग केला. वीरगाथेतील छप्पयपद्धती, विद्यापती व सूरदास यांची गीतपद्धती, गंग इ. भाटांची कवित्त—सवैयपद्धती, कबीराची दोहापद्धती, ईश्वरदासाची दोहा चौपाईपद्धती या पूर्वसूरींच्या पाचही पद्धतींचा त्यांनी आपल्या साहित्यात उपयोग करून काव्यरचना केली. त्यांच्या काव्यात संस्कृत शब्दांचा विपुल उपयोग आहेच आणि त्यामुळे त्यांच्या भाषेत अभिजातपणा जाणवतो पण अवधी व व्रज भाषांची लोकप्रचलित रूपे व त्यांचा थाटही त्यांच्या काव्यांत आलेला आहे.

तुलसीदासांना कवी म्हणून हिंदी साहित्यात श्रेष्ठ स्थान आहे. उत्कृष्ट प्रबंधकाव्य रचण्याची योजकता त्यांच्यामध्ये होती, तसेच उत्कट भावना पदांच्या व गीतांच्या रूपाने व्यक्त करण्याची आत्मनिष्ठाही त्यांच्या ठायी होती. कथेतील चरित्रे, प्रसंग, घटना, वस्तुवर्णने, संवाद इ. विविध अंगांची कुशल रचना, कथेतील मार्मिक व रसात्मक सौंदर्यस्थळे वर्णन करण्याची हातोटी, प्रसंगानुकूल भाषेचे रूप राखण्याचे सामर्थ्य, छंद व अलंकारांचा औचित्यपूर्ण उपयोग, संवादांतील नाट्यात्मकता या सर्वच बाबतींत तुलसीदासांची प्रतिभा महाकवीची होती, असे मानावे लागेल. तुलसीदासांच्या शेकडो अनुभवगर्भ व विदग्ध उक्ती नंतर लोकजीवनात व साहित्यात भाषेतील म्हणींप्रमाणे प्रचलित झाल्या. मात्र त्यांच्या प्रतिभेला एक मर्यादाही होती. परिचित प्रसंगांना काव्यात्मक साज चढवणारी प्रतिभा त्यांना लाभलेली होती पण कल्पित प्रसंगांची निर्मिती करण्याकडे त्यांचा कल नव्हता. वस्तुस्थिती जशी आहे तशी स्वीकारून त्यांतील मार्मिक रूपांची मांडणी ते करू शकत असत पण संपूर्ण नवी सृष्टी कल्पनेने निर्माण करणे, हा त्यांच्या प्रतिभेचा धर्म नव्हता.

तुलसीदासांनी रामकथेला ज्या उंचीवर नेले, त्यापेक्षा अधिक उंचीवर कोणत्याही हिंदी कवीला जाता आले नाही. भक्तमालमध्ये नाभादासाने त्यांना ‘कलिकाल का वाल्मीकि’ म्हटले आहे. व्हिन्सेन्ट स्मिथ याने ‘मोगल काळची सर्वांत महान व्यक्ती’ असे त्यांचे वर्णन केले आहे. ग्रीअर्सनने ‘बुद्धदेवानंतरचा सर्वांत मोठा लोकनायक’ या शब्दात त्यांना गौरविले आहे. हजारीप्रसाद द्विवेदी म्हणतात ‘क्वचित प्रसंगी असा शुभयोग जुळून येतो, की जेव्हा माणसाचे ‘सर्वोत्तम’ प्रकट होण्यास अशा तऱ्हेने भाव आणि भाषा उपलब्ध होते … तुलसीदास असेच असाधारण शक्तिशाली कवी, लोकनायक आणि महात्मा होते’. तुलसीदासांचा प्रभाव लोकजीवनावर अतिशय पडला. भक्तिमार्गाच्या रूपाने त्यांनी निराश जीवनात आशा आणि उदात्त, पवित्र, मानवतावादी मूल्यांची चाड निर्माण केली. प्रेम, परस्पर सौहार्द्र, सहिष्णुता, क्षमाशीलता, दया, करुणा, सहानुभूती यांवर आधारित कौटुंबिक व सामाजिक संबंध वाढीस लागले.

हिंदी साहित्यात तुलसीदासांचे स्थान अनन्यसाधारण असल्यामुळे तुलसीदासांच्या जीवनकार्यावर व साहित्यावर प्रचंड लेखन हिंदीमध्ये झाले आहे व होत आहे. अत्यंत आधुनिक दृष्टीतून तुलसीदासांच्या साहित्याचा अभ्यास करण्याचाही मोठा प्रयत्न विद्वान करीत आहेत.

भक्ती चळवळीमुळे भेदभाव न करता समतेची वागणूक लोकाना दिली. तसेच साधु संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. धर्माबद्दल आदर वाढला, लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. संताच्या कामगिरीचा शिवरायांनी स्वराज्य स्थापनेसाठी उपयोग करून घेतला.

## सुफी चळवळ

### प्रस्तावना

अबू नरव-अलू-सिराज याच्यामते जे लोक ऊन किंवा लेकरीचे कपडे वापरतात ते सुफी होय. डॉ. अवध पांडेयच्या मते गरम कपडे वापरणारे सुफी होय. सुफी पंथाची तीन वैशिष्ट्ये म्हणजे १) भौतिक सुखाचा पूर्णपणे परित्याग करणे. २) दयाघन परमेश्वराला पूर्ण शरण जाणे. ३) परमेश्वराच्या या जगातील व्यापकतेवर अढळ विश्वास ठेवणे.

९.२ सुफी पंथाचा उदय व तात्त्विक विचार प्रवाह

कुराणापासून सुफी पंथाचा उगम झालेला दिसतो. तरीपण ख्रिश्चन व हिंदू धर्मातील तत्त्वे त्यामध्ये आढळतात. पुढे ख्रिश्वन धर्माचा प्रभाव कमी होऊन हिंदू धर्माचा प्रभाव वाढला. हिंदूधर्मातील भक्तियोग, राजयोग या कल्पना स्विकारल्या. सुफी पंथा व्यावहारिक दृष्टिकोन व तात्विक दृष्टिकोन आढळतो. व्यावहारिक दृष्टीने राजयोग व भक्तीयोग यांच्याशी साम्य आहे. तात्विक स्वरूप मात्र वेदान्तामधील तत्वांशी मिळते जुळते आहे. सुफी पंथाने हिंदू धर्माकडून स्वच्छता, विशुद्धता, सत्य, अंकिचमता तर बौद्ध धर्माकडून निर्माण, आर्य आष्ट्रांगमार्ग या कल्पनेचा स्विकार केला, ग्रीक वावयाचे अरबी भाषेत रूपांतर झाल्यावर प्लेटोवादाच्या तत्वांचा सुफी पंथावर प्रभाव पडला. त्यामुळे नवव्या शतकापासून पंथाचा प्रसार झाला. त्यावेळी सुफी पंथाने तात्विक भूमिका स्विकारली, त्यामुळे पाच तात्विक विचार प्रवाह निर्माण झाले. ते पुढील प्रमाणे-

५) संत हुसेन-बिन-मन्सूर-अनल हक, अनल हक (मीतो आहे, मी तो आहे)

२) इब्नसीना परमेश्वराच्या अलौकिक व विश्वव्यापक स्वरूपावर विश्वास व्यक्त.

३) सुत्रावर्दी ईवरामध्ये विलीन होण्याचे अंतिम ध्येय साध्य होईपर्यंत आत्मा पुनर्जन्म होत राहतो. शेवटी आपले ध्येय साध्य करतो.

४) इब्न-अल-अरबी परमेश्वराचे प्रतिबिंब निसर्ग व मानव या दोन्हीतही आहे.

५) अब्दुल करीम अल् जीली सर्व विष हे परमात्म्याचे स्वरूप आहे.

**सुफी संप्रदायाचे स्वरूप आणि प्रसार**

सुफी पंथामधील संप्रदायाला सिलसिला म्हणून ओळखले जाते. गुरू किंवा नेतृत्व करणारा धर्मोपदेशक वाला पीर, शेख किंवा मुर्शिद असे म्हणतात. खानका, जमातखाना, झाविया हे तीन प्रकारचे मठ आहेत. १) खान का मठ विस्तिर्ण असून त्यामध्ये प्रत्येकाला प्रवेश असे. २) जमातखान मठ काही शिस्यांचीच राहण्यासाठी जागा असे ३) झाविया मठ - जगापासून दूर एकांतात राहून साधना करणारया गुढवाद्यांचीच फक्त सोय केलेली असे. जेव्हा सुफी पंथामध्ये प्रवेश करावयाचा असेल तेव्हा त्याला ठिगले लावलेला एक अंगरखा घालावयास देत व डोक्यावरील केस काढून टाकीन असत. शेख आपल्या वारासाला पदाची सर्व सन्मान चिन्हे म्हणे अंगरखा, प्रार्थनेची वरखे, खडावा, जपमाळा, काठी इ-देत असे. अध्यात्म साधना करताना भक्ताचा जोष वेगवेगळ्या टप्प्यातून जात असतो. त्यास मकामात असे म्हणतात. या वेळी मनाच्या अनेक अवस्था दिसून येतात त्याला हाल म्हणतात. सुफी पंथात भक्तीने करावयाच्या साधनेला जिक्र म्हणतात.

७व्या शतकामध्ये सिंध, पंजाब प्रांतात मुस्लिम सत्तेचा प्रवेश झाला. मुलतान हे प्रमुख केंद्र होते. ९व्या शतकानंतर सुफी पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. या काळात सुफी पंथामध्ये दोन प्रकारच्या संताचा उदय झाला. एका प्रकाराला संशयी किवा झहिंद आणि दुसरया प्रकाराला सेवक किंवा उब्बाद असे म्हटले आहे. सुफी पथाने दक्षिण भारतात प्रथम पेन्नूकोंड येथे प्रवेश केला. त्यानंतर सर्वत्र प्रसार झाला. नुरूद्दीन हा सुफी संत इजिप्तमधून इ.स.च्या नवव्या शतकात दक्षिण भारतात आला. त्याने राक्षसभुवन व गोणगाव येथे धर्मप्रसार केला. जल्लाउद्दीन गंजखा आणि मोमिन आरिफ हे साधू १३व्या शतकात दक्षिणेत आले. मध्ययुगीन दक्षिण भारतात अंदाजे ३५० सुफी किंवा मुस्लिम संत होते असे अब्दुल जब्बार मल्कापुरी यांच्या ग्रंथावरून समजते. बुरहाणपुर, औरंगाबाद, हैदराबाद, गुलबर्गा, बिदर-विजापूर ही मुस्लिम धार्मिक केंद्र होती. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात मुंतजबुद्दीन जर्जरीबक्ष हा दक्षिणेत खुलदाबाद येथे आला. पैठण ते महाराष्ट्रातील सुफी केंद्र होते. खानदेशाचा सुलतान नसिरुद्दीन फारूकी याने बुरहाणउद्दीन्च्या नावाने बरहाणपूर हे गाव बसविले. बुरहाणउद्दीनचे शिष्य इमाद काशानी, शेख हुसेनी, रूकनुद्दीन काशांने, हुसलुल वसूल, हिदायतुल

कुतूब, नफायसुल अन्फास हे तीन ग्रंथ लिहिले. सुफी संतानी पुढीलप्रमाणे शहरात धर्मप्रचाराचे कार्य केले. पैठण निजामुद्दीन, खुलदाबाद- बुरहाणउद्दीन गरीबशहा, गुलबर्गा-सिराजजुद्दीन, जुनेदी, विजापूर-ऐनउद्दीन, खानदेश- बहुदुल्ला, पुणे-हिसानुद्दीन कत्ताल.

**सुफी पंथाचे सिद्धांत व तत्वज्ञान**

प्रत्येक भक्तीपंचात गुढ़वादी ज्ञानाला महत्त्व आहे. त्याप्रमाणे सुफी पंथामध्येही गुढ़वादी ज्ञानाला महत्त्व आहे. अध्यात्म्याचे ज्ञान मिळवणे म्हणजे परमात्म्याशी एकरूप होणे होय. परमेश्वराचा आविष्कार ज्या पद्धतीने होतो त्याला सुफी पंथात तनजुल्लात म्हणतात. तनजुल्लात म्हणजे अवतरणे होय. परमेश्वराच्या निर्भेळ स्वरूपाला अल्ल वाजवूल मुतलक म्हणतात. त्याचा अर्थ एकाच एक अस्तित्व होय. जात (सत्ता) सिफ्त (गुण) आणि कर्म याबाबत परमात्मा अद्वितीय आहे. अज्ञान हे सर्व दुःखांचे मूळ आहे. मोक्ष म्हणजे अज्ञानाचा नाथ, अहंकार, आसकती यांचा निरास आहे. परमेश्वराचे स्वरूप यासंदर्भात सुफी पंथामध्ये तीन विचारप्रवाह आहेत.

१) इजादिया (वैतवाद): सृष्टी व परमेवर भिन्न आहे. सृष्टीची परमेश्वराने निर्मिती केली.

२) शहुविया :- परमेश्वर सर्वव्यापी, सर्वश्रेष्ठ आहे.

३) वजुदिया (अद्वैतवाव) परमेबर हे एक सत्य असून सर्व काही तोच आहे.

**अध्यात्म साधनेच्या मार्गातील सात टप्पे:** अध्यात्म जीवनातील प्रगतीच्या पंथाला मार्ग म्हणतात. त्या मार्गावर प्रवास करणारया सालीक म्हणतात. सालीकला परमेश्वराचे ज्ञान म्हणजे मारिकन संपादनासाठी शिक्षण देणे. या शिक्षणाचे किंवा अध्यात्म साधनेच्या मार्गातील सात टप्पे१) उबुदियात (सेवा):- मुमुक्षूला तोबा (पबाताप) होतो. २) इष्क परमेश्वराविषयीची ओढ /प्रेन निर्माण होते. ३) जाहेद (त्याग) परमेश्वराला सोडून बाकी सर्व गोष्टींचा त्याग करणे. ४) नारिफत (ज्ञान प्राप्ती) सर्व गोष्टी सोडून दिल्यास परमेश्वराच स्वरूपात ज्ञान भक्ताला प्राप्त होते. ५) वजद (उन्मादावस्था) परमेबराच्या ध्यानाने उन्मादावस्था प्राप्त होते. ६) हकिकत- परमेश्वराच्या ज्ञानप्राप्तीनंतर भक्तांच्या मनात तव क्कुल (परमेश्वराला शरण नाण्याची भावना) निर्माण होते. परमेवर एकमेव सत्य आहे. हे समजणे त्यालाच तौहिद म्हणतात. आत्मा अनंतात विलिन होतो. याला ईबर दत्त हकीकत असे म्हणतात. ७) वसल (मलिन): - परमात्म्याच्या साक्षात्काराने भक्ताचे हदय समाधानी होते. धोडक्यात साधनमार्गातील सात टप्पे म्हणजे १) पश्चाताप २) संशय ३) संन्यास ४) दारिद्र्य ५) शांतपणा ६) विश्वास ७) समाधान ही तत्त्वे आहे.

**आत्मस्थितीच्या अवस्था:** मानवाच्या आत्मस्थितीचे सात टप्पे आहेत. त्याला मुकामत म्हणतात. ते म्हणजे १) तोबा (पश्चाताप) २) इनावत (मतांतर) ३) जुहूद (त्याग) ४) तवक्कूल (परमेश्वराला शरणागती) ५) सब्र (संतोष) ६) शुक्र (ईश्वराविषयीची कृतज्ञता) ७) मुकाम / रजा (ईबरी इच्छा हीच आपली इच्छा) या अवस्थेच्या सात टप्प्यामध्ये खौफ (भय) वादा (विरक्ती) फक्र (गरिबी) यांचा तीनचा समावेश केल्यास ईबर प्राप्ती होती. ईश्वरप्राप्तीत ही १० तत्त्वे सांगितलेली आहेत. सुफीचा त्रिप्रवास म्हणजे मानवाच्या आत्मोद्धाराचे तीन मार्ग होय. १) सररिलला परमेश्रारापर्यंत प्रवास करणे २) सैरफिल्ला परमात्म्य स्वरूपात प्रवास करणे. ३) सैरअनिल्ला परमेश्वरापासून प्रवास करणे. सुफी पंथाची आत्म्याच्या स्वरूपाविषयीची धारणा म्हणजे रूढ (आत्म्याचे स्वरूप पवित्र्य असून श्रेष्ठ आहे), नफस (आत्म्याचे कामक्रोधधारी मुक्त स्वरूप होय) या दोन प्रकारच्या आहेत.

**सुफीचे आचारशास्त्र:** आत्म्याच्या उद्धारासाठी चार आचार मार्ग सुफीने सांगितले आहेत. १) शरियत धर्माचे पालन कसे करावे हे सांगणारे नियम होय. २) मलकुत-देवी संपत्ती व दैवी आशीर्वाद होय. ३) जबरूत - सिद्धी प्राप्ती होय. ४) लाहून परमेश्वरात विलिनीकरण होय. शरियतच्या आचार धर्मात पुढील सांगितलेल्या आहेत. १) तिलावत (कुराणाचे पठण करणे) २) रोज पाच वेळा नमाज पढणे. ३) जिक्र (परमेश्वराचे स्मरण करणे.) मोठ्यांदा उच्चार करणारे याला

जिक्र-इ-जली म्हणतात. तर मनातल्या मनात उच्चार करणे याला जिक्र-इ- खफी म्हणतात. ४) फिक्र (ईश्वराच्या गुणांचे चिंतन करणे) ५) समा (ईश्वरी नावाचे संकीर्तन करणे) ६) मुजाहद (सर्व इंद्रिये व चित्तवृत्तीचा निषेध)

परमात्मा स्वरूपाचा प्रकाश पडल्यानंतर त्या व्यक्तीला अलफरदर कामील म्हणजे पुरुषोत्तम सिद्धपुरूष म्हणतात. या सिद्ध पुरुषाला गौसुल जाम । जगदाधारी म्हणतात. परमेश्वर ज्यांना योग्य मार्गदर्शन करतो. अशा संतांना अल्महदी म्हणतात. फना म्हणजे नष्ट होते. बका म्हणजे परमेश्वर स्वरूपाच्या चिंतनात मग्न राहणे. फनाचे तीन प्रकार सागितलेले आहेत. १) कुर्वे फरायज (परमेश्वराच्या हातातील बाहुले बनणे.) २) कुर्वे-न-वासिल (सुफी एजंट) ३) जमाबयनुल कुरबैन (भक्त व परमेश्वराचे मिलन) सुफी पंथात गुरुभक्ती महत्त्वाची आहे. गुरूला शेख/पीरा/मुर्शीद म्हणतात. शिष्याला मुरीद म्हणतात. गुरूकडून उपदेश घेणारया विद्यार्थ्याला बैल म्हणतात. गुरू ध्यानाच्या प्रकाराला तवज्जू म्हणतात. दर्त्यांची यात्रा भरते, त्यास उरूस म्हणतात.

**सुफी पंथाची चार तत्त्वे:** १) फना (निर्माण) २) सलुक (अष्टांगमार्ग) ३) मराकबा (राजयोग) ४) करामन') करामत (अलौकिक भक्तीचा वापर)

## सुफी पंथाचे तत्त्वज्ञान :

१) ईबर एक असून तो सर्वव्यापी आहे. तो मंदिर, मस्जिदमध्ये नसून व्यक्तीच्या हृदयात आहे.

२) धार्मिक क्रिया, रोजे रखना मानत नाही. कारण परमेश्वराचे निवास स्थान शुद्ध मनामध्ये असते.

३) अहंकाराची भावना मिटवून ईबराचे दर्शन करत येते.

४) व्यक्तीने ईश्वराच्या प्रेमात, भक्तीमध्ये इतके तल्लीन झाले पाहिजे की, तो शुद्ध, बुद्ध विसरला पाहिजे.

५) सर्व एकाच परमेश्वराची लेकरे मानून परस्परांशी प्रेमाने वागावे.

६) दुसऱ्याचा तिरस्कार करणारयाला परमेश्वर प्राप्त होत नाही. ६

७) गुरूशिवाय ज्ञान आणि गती प्राप्त होत नाही.

८) संगीताने व्यक्तीचे मन केंद्रित होते.

## भारतातील प्रमुख सुफी संप्रदाय

सुफी संप्रदायाचे भारतात एकूण ११ पंथ होते. त्यामध्ये प्रमुख सहा संप्रदाय होते.

## चिस्तिया संप्रदाय:

या संप्रदायाची स्थापना खाजा अबू इशाक याने १२व्या शतकात केली. याचा प्रमुख चिस्ती गावचे असल्याने या संप्रदायास चिस्ती है नाव पडले. हे गाव हिरात जवळ होते. ११९२च्या सुमारास मुईनुद्दीन सिज्जी याने भारतात संप्रदाय आणला, अजमेर हे प्रमुख केंद्र होते. दिल्ली येथे बख्तीयारकाकीने, नगोर येथे हमिदउद्दीनने, अजोधन येथे खरीदउद्दीनने, बंगालमध्ये सिराजउद्दीनने, दक्षिणेमध्ये बुरहाबुद्दीनने या पंथाचा प्रसार केला. सत्ता शास्त्रीय एकत्ववाद हे प्रमुख तत्वज्ञान होते. एकांतामधील पुजा, केंद्रीत बैठक, बास निरोधन यांना साधनेमध्ये महत्त्व होते. महंमद-बिन-तघलकच्या काळात जबरदस्तीने स्थलात्तर करण्यात आले. त्यामुळे हा पंथ अडचणीत आला.

**सुहरावर्दी संप्रदायः**

इराकमध्ये नजीब उद्दीनने १२व्या शतकात या संप्रदायाची स्थापना केली. १३ व्या शतकात बहाउद्दीन झकारिया याने भारतात संप्रदाय आणला. त्याने आपले पहिले केंद्र मुलतान येथे स्थापन केले. त्यानंतर बंगालमध्ये जलालुद्दीन तब्रीझीने, गुजराथमध्ये जलालुद्दीन बुखारीने शाखा स्थापन केली. या संप्रदायाचे सुलतानाशी प्रेमाचे संबंध होते. तैमूरलंगच्या स्वारीनंतर त्याचा विकास झाला नाहीं.

**नक्शबंदीचा संप्रदायः**

भारतातील सुफी संप्रदायापैकी संप्रदाय अतिशय महत्त्वाचा व बिलिष्ठ होता. मध्य आशियामध्ये १२ व्या शतकात अहमद- अवयस्वी याने स्थापना केली, महमद-बाकी-बीला याने अकबराच्या काळात भारतात आणला. तुर्की व मोगल लोकांच्या खोट्या धार्मिक समजुतीच्या विरूद्ध प्रतिक्रिया केली. या संप्रदायाच्या नेतृत्ववादी असणाय्रा व्यक्तीमध्ये सखोलज्ञान आणि गुढवाद यावर प्रभुत्व होते. १७व्या शतकात शेख महंमद सरहिंदी याने पंथाला नवे स्वरूप दिले. हा पंथ हिंदूच्या बाबतीत अधिक सहिष्णू होता. 'साक्षीतादात्म्य हे मुख्य सुत्र होते. अलहल्लाज याने सर्वांत प्रथम या तत्त्वाचा पुरस्कार केला. मध्य आशियामध्ये अलाउद्दीला सिमनानी याने विकास केला. भारतातील प्रसारामध्ये गुढवादी शेख अहमद सरहिंदी याचा उल्लेख केला जातो. १९व्या शतकात महत्त्व कमी झाले.

**कादिरीया संप्रदायः**

इराकमध्ये अब्दुल कादीर अल जिलानी याने स्थापना केली. भारतामध्ये महंमद घौय याने आणला. १४८२ मध्ये त्याने मठ स्थापन केला. या संप्रदायाला मोगल काळात महत्त्व प्राप्त झाले. मुहंमद मिर हा शेख (गुरु) होता. त्याच्या शिष्यामध्ये दारा व जहान आय हे प्रमुख होते. एकत्ववाद हे तत्वज्ञान संप्रदायाने मानले होते. इब्न-अल-अरबी हा या तत्वाचा प्रवर्तक होता. औरंगजेबच्या काळात उतरती कळा लागली.

**शतारी संप्रदायः**

हा संप्रदाय अबू-यझीद-अल-बीस्वामी याने स्थापन केला. १५व्या शतकात शेख अब्द-अल्ला याने भारतात आणला. तत्वज्ञान, आध्यात्मिक साधना, समाज, प्रार्थना इत्यादी बदल या संप्रदायावर हिंदूचा प्रभाव होता. मुहमद धौय याचा बाबर, हुमायून, अकबराशी संबंध होते.

**फिदीसिया संप्रदायः**

या संप्रदायाची स्थापना मध्य आशियामध्ये सैफुद्दीन बाखझी याने केली. हा पंथ भारतामध्ये बदुद्दीन याने आणला. याचा प्रभाव बिहार भागात होता. या संप्रदायाच्या गुढवादी लोकांमध्ये अहमद इब्न याह या मानेरी याचा समावेश आहे. याचा काळ तघलक सुलतानाचा काळ होता.

**मध्ययुगीन शेती पध्दती**

**प्रस्तावना**

मध्ययुगीन कालखंडात भारतावर सुलतान, यादव, मोगल या सत्ताधीशानी आपली सत्ता राबवत असताना आपली स्वतंत्र अशी महसूल व्यवस्था निर्माण केली, प्रत्येक राजकर्त्याने आपापल्या कारकिर्दीत जी महसूल प्रशासन व्यवस्था निर्माण केली त्याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. सुलतान कालखंडात, गुलाम, खिलजी, तुघलक, लादी घराण्याच्या राजकर्त्याने राज्य केले तर यादव कालखंडातील राजकर्त्याने आपली स्वतंत्र अशी महसूल प्रणाली राबविली. तर मोगल कालखंडात बाबर, हुमायुम, शेरशहा, अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब या

राजकर्त्यांने आपली महसूल प्रणाली निर्माण केली. या सर्व राजवटीतील समग्र महसूल प्रणालीचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

**सुलतान कालखंडातील महसूल प्रशासन**

तसे पाहता दिल्लीच्या सुलतानशाहीतील महसूल प्रशासन सुसंघटित नव्हते असे म्हणावे लागेल. राज्याचा आर्थिक खोत देखील त्यामानाने कभी होता कारण दिल्लीच्या सुलतानांचे राज्य उत्तर व पूर्व भारतातील मर्यादित भागावरच होते.

शेतसारा म्हणजेच शेतीवरील कर हा राज्याच्या महसूलाचा मुख्य स्त्रोत होता कारण राज्यातील बहुतांश लोक शेतीवर काम करत असत. परंतु शेतकऱ्याने आपल्या उत्पादनातील किती हिस्सा राज्याला महसूल म्हणून द्यावा हे निश्चित नव्हते. प्रत्येक सुलतान आपल्या मर्जीप्रमाणे शेतसाऱ्याचे प्रमाण ठरवित असे व हा हिस्सा साधारणतः १/१० ते १/२ या प्रमाणात असे.

अल्लाउद्दीन खिलजी या सुलतानाला महसूल प्रशासन फक्त कार्यक्षमच करावयाचे नव्हते तर महसूलाचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यात आमूलाग्र बदल देखील करायचे होते. त्यामुळेच त्याने दिल्लीच्या सुलतानशाहीच्या एकंदरीतच महसूल प्रशासनात नवीन नियमावली तयार होईल असे बदल घडवून आणले. त्याने सरदारांना इनाम म्हणून दिलेल्या जमीनी तसेच धार्मिक कारणांसाठी (वक्फ) जमीनी सुलतानाच्या मालकिच्या आहेत म्हणून ताब्यात घेतल्या.

सर्व शेतजमीनींचे मोजमाप करून व शेतीतील उत्पादनाची खातरजमा करून राज्याचा भाग ५३ टक्के असेल असे ठरविण्यात आले. अशाप्रकारे राज्याचा महसूलाचा हिस्सा जास्त होता असे म्हणावे लागेल. शेतकऱ्याऱ्यांना शेतसाऱ्याव्यतिरिक्त इतरही कर द्यावे लागत त्यामुळे त्यांची स्थिती त्या मानाने कठिण असे. बरानी या इतिहासकाराच्या मताप्रमाणे हिंदू शेतकऱ्यांची संख्या जास्त असे व त्यांना देखील जास्त प्रमाणात असणाऱ्या कराची झळ सोसावी लागे. त्याच्याकडे सोने-चांदी देखील विरळने आढळे व मुकदमांच्या खियांना मुसलमान कुटुंबांच्या घरी काम करावे लागे. सुलतानाने हिंदू मुकादम, खूट व चौधरी यांना पिढ्यान् पिढ्या मिळणारे फायदे व विशेषाधिकार काढून घेतले होते. तसेच त्यांना शेतसारा,घरावरील कर व गुरे-ढोरे चारण्यासाठीचा कर देखील द्यावा लागत असे.

राज्याचा महसूल शेतकऱ्याच्या माध्यमातून वाढविण्यासोबतच अल्लाउद्दीन खिलजीने महसूल खात्यातील भ्रष्टाचार संपविण्यासाठी अनेक पावले उचलली. त्याने पटवाऱ्याऱ्यांच्या वेतनात वाढ केली मात्र त्यानी भ्रष्टाचार केल्यावर त्यांना कठोर शासन वा शिक्षा देखील दिली.

दिल्लीच्या सुलतानशाहीच्या भौगोलिकदृष्ट्या मध्य भागात येणाऱ्या प्रदेशांमध्ये महसूलचे प्रमाण शेतजमीनीच्या मोजणीवर ठरविण्यात येत असे व ते प्रमाण साधारणपणे एकूण उत्पादनाच्या पन्नास टक्के एवढे असे. पूर्वी शेतसारा चलनात वा जे उत्पादन (पिक) घेतले आहे त्याचा काही भाग शेतसारा म्हणून गोळा केला जाई. परंतू अल्लाउद्दीन खिलजीने बाजार व्यवस्थेबाबतची नियमावलीची अमलबजावणी सुरू केल्यानंतर शेतकऱ्याने जे पिक घेतले आहे त्याचाच काहि भाग शेतसारा म्हणून गोळा करण्यास पसंती दिली. तसेच शेतकऱ्यांना घरावरील कर व गुरे-ढोरे चारण्यासाठीचा कर द्यावा लागत असे. हिंदूना जिझिया नामक करदेखील द्यावा लागत असे. बरानीने दिलेल्या माहितीनुसार गावच्या कुरणात चरण्यासाठी जाणाऱ्या प्रत्येक गुराची मोजणी होत असे व प्रत्येक गुरावर कर आकारला जाई. मात्र, फरिश्ता या इतिहासकाराप्रमाणे ज्या व्यक्तीकडे बैलाच्या दोन जोड्या, दोन म्हैसी, दोन गाई व दहा शेळ्या असतील त्यांना गुरे चरण्याच्या करातून मूभा वा सूट दिली जात असे. ज्या व्यक्तींकडे यावरून जास्त गुरे-ढोरे असतील त्यांना चरण्यासाठीचा कर द्यावा लागत असे.

अल्लाउद्दीन खिलजीने अमलात आणलेली महसूल व्यवस्था त्यांच्या नंतरच्या सुलतानाच्या काळात देखील सुरू असली तरी अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात महसूल धोरण व प्रशासनात असलेला कडकपणा धियासुद्दीन तुघलकच्या काळात कमी झालेला आढळतो. त्यामुळे महसूल प्रशासनातील कार्यक्षमता कमी झाल्याचे लक्षात येते.

धियासूद्दीन तुघलकला राज्याचा महसूलातील असलेला पन्नास टक्के हिस्सा जास्त वाटला त्यामुळे त्याने तो शेतीतील एकूण उत्पादनाच्या वा उत्पन्नाच्या एक दशांश एवढा ठरवला. त्याच्या काळात नापीक आणि पडिक जमीन लागवडीखाली आणण्यात आली व शेतकऱ्यांच्या कल्याणाकडे लक्ष देण्यात आले.

घियासुद्दीन तुघलकनंतर गादीवर आलेला सुलतान मुहम्मद बिन तुघलक याने देखील महसूल प्रशासनात महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. त्याची महसूल प्रशासनात सुधारणा आणण्याची तीव्र इच्छा होती. त्याने गादीवर आल्यावर लगेचच राज्यातील प्रांतांच्या उत्पन्नाचे व खर्चाचे संकलन केले. प्रांताधिकाऱ्याऱ्यांना त्यांच्या प्रातांच्या महसूलाबाबतची संकलित केलेली माहिती केंद्रिय प्रशासनाला पाठवून देण्याचे आदेश देण्यात आले. महसूल प्रशासनात एकसूत्रता आणण्यासाठी व राज्यातील कुठल्याही गावाकडून महसूल गोळा करण्याचा बाकी राहू नये ही खबरदारी घेण्यात आली. दंड व बाकी वसूल करण्यासाठी दिवान-ए-मुस्तखरिन या वेगळ्या खात्याची स्थापना करण्यात आली.

मुहम्मद बिन तुघलक ने गंगेच्या त्रिभुज प्रदेशा ंतील शेतसारा वाढविण्यासाठी केलेल्या सुधारणा असफल ठरले तरी त्यामागील संयुक्तिक व न्याय्य कारण समजून घेणे आवश्यक ठरते. मुहम्मद बिन तुघलक ने केलेली एक आदर्श गोष्ट म्हणजे त्याने दिवान-ए-कोही नामक स्थापन केलेले कृषी खाते वा विभाग होय. या विभागाने जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी व आळीपाळीने वेगवेगळी पिके घेण्याचे प्रयोग केले. परंतु, हा प्रयोग अयशस्वी झाल्याचे आपल्या निदर्शनास येते. हि योजना तीन वर्षांनंतर बंद करण्यात आली. या प्रयोगासाठी निवडलेल्या शेतजमीनीचा निकृष्ट दर्जा, अधिकाऱ्यांमधील भ्रष्टाचार तसेच शेतकऱ्यांमध्ये याबाबत असलेली उदासीनता ही सदर प्रयोग अपयशी ठरण्याची कारणे होत. तसेच इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, हा प्रयोग घाईघाईमध्ये बंद करण्यात आला.

१३२९-१३३० या वर्षात मुहम्मद बिन तुघलकने चलनविषयक सुधारणा सुरू केल्या. त्याने नाण्यांच्या बाबतीत नवीन प्रयोग केला व हा नवीन प्रयोग म्हणजे प्रतिकात्मक चलन जारी करणे हा होय. बरानी या मध्ययुगीन इतिहासकारानुसार सुलतानाने लष्करावर सततपणे वाढणारा खर्च भागविण्यासाठी तांब्याची व पितळेची नाणी सर्व आर्थिक व्यवहारांत सोने व चांदीच्या नाण्यांप्रमाणे वापरण्यात यावीत व ग्राह्य धरण्यात यावीत असे आदेश वा फर्मान दिले. या नाविन्यपूर्ण प्रयोगामागची अजून काही कारणं म्हणजे खर्चिक युद्धे व बंडामुळे राज्याच्या खजिन्यावर पडलेला ताण व खर्चिक प्रयोग हि होत. प्रतिकात्मक चलन पद्धतीचे परिणाम तर फारच भयंकर झाले. सुलतान बाजारपेठेत बनावट नाणी येण्यापासून रोखण्यासाठी खबरदारीची उपाययोजना करण्यात अपयशी ठरला. बरानीनुसार प्रत्येक हिंदू इसमाचे घर म्हणजे अनधिकृत टांकसाळ बनले. अर्थात, हे मत पूर्वगृहदूषीतपणे मांडल्याचे जाणवते.

शेतकरी त्यांचा शेतसारा (महसूल) प्रतिकात्मक चलनात भरत असत. सामान्य लोकदेखील आपला कर प्रतिकात्मक चलनाच्या स्वरूपात भरत असत व सोन्या-चांदीच्या नाण्यांचा साठा करून ठेवत असत. परकिय व्यापारी सुद्धा भारतीय वस्तू विकत घेताना प्रतिकात्मक चलनाचा वापर करत असत परंतु आपल्या वस्तू भारतीयाना विकत असताना सोन्या- चांदीची नाणीं मागत असत. यामुळे आर्थिक गोंधळाची स्थिती निर्माण झाली. याचा व्यापारावर देखील विपरीत परिणाम झाला व राज्याचे महसूलाबाबत व एकंदरीतच आर्थिक नुकसान झाले.

मुहम्मद बिन तुघलक नंतर सुलतान बनलेल्या फिरोजशहा तुघलकच्या लक्षात आले की, सुलतानशाहीची महसूल व्यवस्था गोंधळाच्या अवस्थेत आहे व सामान्य लोक जबरदस्तीने होणाऱ्या कर वसूलीनें व दुष्काळांनी हैराण आहे. हा नवीन सुलतान शेतकऱ्यांचा खरा मित्र होता. मुहम्मद बिन तुघलक च्या काळातील अन्यायकारक वागणूकीमुळे

कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्यात आली. जमीनीचे व्यवस्थित मोजमाप करून शेतसारा ठरविण्यात येऊ लागला, शेतसाऱ्याचे प्रमाणदेखील कमी करण्यात आले. त्याने अजून दोन मूर्खपणाचे, बेकायदेशीर व अन्यायकारक कर रद्दबातल ठरवून टाकले जे त्याच्या पूर्वीच्या सुलतानांनी गोळा केले होते. त्याचे ते कर शरियतच्या कायद्याला धरून नव्हते असे मत होते. त्याने अस्तित्वात असलेल्या चालीरिती व प्रथांमध्ये पवित्र धार्मिक कायद्याशी सुसंगती होण्याच्या दृष्टीने बदल घडविले. त्यामुळे त्याने मुस्लिमेत्तर जनतेकडून जिझिया कर सक्तीने वसूल केला.

फिरोजशहा तुघलक एक सच्चा वा श्रद्धाळू मुस्लिम असल्यामुळे त्याने सहा प्रकारचे कर गोळा केले. हे सहा प्रकारचे कर पुढीलप्रमाणे होत. खरज म्हणजेच मुस्लिमेत्तर व्यक्तिंनाकडून गोळा केलेला शेतसारा.

या कराचे प्रमाण एकूण उत्पादनाच्या एक पंचमांश ते अर्धे एवढे असे. उन- मुस्लिम शेतकऱ्यांकडून एकूण उत्पादनाच्या एक दशांश एवढा घेतलेला कर. खाम्स- युद्धात केलेल्या लूटीचा एक पंचमांश एवढा भाग. तरकट- वारस नसलेली मालमत्ता. जकात- मुस्लीमांकडून मिळविलेल्या मालमत्तेवरील दोन टक्के कर, हा कर फक्त विशिष्ट धार्मिक कारणांसाठीच वापरला जाई. जिझिया- मुस्लिमेत्तरांकडून गोळा केला जाणारा कर. नंतरच्या काळात सुलतानाने उलेमांच्या संमतीने जे शेतकरी राज्याच्या कालव्यांमधून शेतीसाठी पाणी वापरत असत त्यांच्याकडून सिंचन कर घेण्यास सुरुवात केली. या कराचा दर वा प्रमाण सिंचन केलेल्या शेतीतील उत्पादनाच्या वा उत्पन्नाच्या एक दशांश एवढ होते.

सुलतानाने व्यापार-उदीमाला चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्याने अंतर्गत व्यापारावरील कर व कृत्रिम अडथळे काढून टाकले. त्याने महसूल प्रशासन विकसित करण्याकडे विशेष लक्ष दिले. ज्यांना आपल्या जमीनींपासून बेकायदेशीररित्या वंचित ठेवले होते त्यांना न्यायालयांमध्ये आपली कैफियत मांडण्यास सांगण्यात आले. त्याने राज्याच्या शेतसाऱ्याचा हिस्सा वा प्रमाण कमी केले. त्याने शेतकऱ्यांना 'ताकवी' नामक कर्ज (पतपुरवठा) देण्यास सुरुवात केली तसेच सिंचनविषयक सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या. त्याने निरंतर पाणीपुरवठा (सिंचन) करणारे चार कालवे बांधल्याचे वा निर्माण केल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या टाकलेल्या पावलांचा परिणाम म्हणून कृषी, व वाणिज्य, जनतमधील सुबत्ता व राज्याच्या महसूलात सततपणे वाढच होत गेली. तसेच जीवनावश्यक वस्तू उत्तरोत्तर स्वस्त होत गेल्या. अफिफच्या शब्दांत सांगावयाचे तर लोकांची घरे धान्य, मालमत्ता, अश्व व फर्निचरने परिपूर्ण होते; प्रत्येकाकडे मोठ्या प्रमाणात सोनं व चांदी होते; कुठलिही स्त्री दागिन्यांशिवाय नव्हती व कुठलेही घर चांगल्या बिछान्याशिवाय दिवानाशिवाय नव्हते. संपत्ती मोठ्या प्रमाणात होती व सुखसोयी सहजपणे उपलब्ध होत्या. फिरोजशहा तुघलकने अवलंबिलेली महसूल व्यवस्था त्याच्यानंतरच्या सुलतानांनी देखील स्विकारलेली निदर्शनास येते.

**यादव कालखंडातील महसूल प्रशासन**

शेतसारा हा विजयनगरच्या साम्राज्यातील महसूलाचा मुख्य स्वोत होता. शेतसाऱ्याव्यतिरिक्त खंडणी तसेच मांडलिकांकडून व प्रांताधिकाऱ्यांकडून प्रामुख्याने महानवमीच्या सनादरम्यान मिळालेल्या भेटवस्तू, सीमाशुल्क, विविध व्यवसायांवर आकारलेला कर, घरांवर आकारलेला कर, बाजारपेठांवर आकारलेला कर तसेच परवाना शुल्क, इ. कर हे राज्याच्या महसूलाचे प्रमुख स्वोत होते. याव्यतिरिक्त भरभराटिस आलेली सागरी बंदरेदेखील राज्याच्या महसूलाचा महत्वाचा मार्ग होता. यामुळे सागरी तसेच देशांतर्गत व्यापार हा राज्याच्या महसूलासाठी महत्वपूर्ण होता.

कर पैशाच्या तसेच वस्तूंच्या स्वरूपात गोळा केला जाई. शेतजमीनीचे काळजीपूर्वक सर्वेक्षण करून शेतसारा ठरविला जाई व त्यानंतर ठरल्याप्रमाणे शेतसारा शेतकऱ्याकडून गोळा केला जात असे. जमीनीच्या उत्पादन क्षमतेनुसार तिचे वर्गीकरण पुढील तीन प्रकारांमध्ये केले जात असे पाणथळ जमीन, कोरडवाहू जमीन, फळबागा आणि वनें. विजयनगरच्या साम्राज्यात तीन वर्षे व्यतीत करणाऱ्या फर्नानो न्यूनीझ या पोर्तुगीज प्रवाशानें असे नमूद केले आहे की, शेतकऱ्यांना एकूण उत्पादनाच्या नऊ दशांश एवढा भाग जमीन मालकांना द्यावा लागत असे. जमीन मालक आपल्या

उत्पन्नातील जवळपास अर्धा भाग वा हिस्सा राजाला देत असत. शेतसाऱ्याचा हिशोब व देखरेख ठेवण्यासाठी एका विशिष्ट विभागाची स्थापना करण्यात आली होती. या विभागाला 'आठवणे' असे म्हटले जात असे. राज्यात विविध प्रकारचे कर आकारले जात परंतु लोकांमध्ये सर्वात अप्रिय असलेला कर म्हणजे संपूर्ण सिम्राज्यातून गोळा केला जाणारा लग्नावरील कर होता. हा कर नंतरच्या काळात सळूवा तिम्मा यांच्या सांगण्यावरून रद्द करण्यात आला.

असे निदर्शनास आणले गेले आहे की, या राज्याची एकंदरीतच आर्थिक प्रणाली व करप्रणाली शेतकऱ्यांना पोषक नव्हती. निदर्शनास आलेल्या पुराव्यांनुसार शेतकऱ्यांचे हाल होत असत व जमीन मालक तसेच काही अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून ते इतरत्र स्थलांतर करत असत. कृष्णदेवरायासारख्या शासकांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केलेले निदर्शनास येतात. परंतु कमजोर राजांच्या कारकीर्दीत उमराव व सरदार मंडळी शेतकऱ्यांचे शोषण विनासायास करत असत. दस्तावेजांनुसार राज्याचे दोन खजीनें होते- प्रत्येक दिवशीचा पैसा जमा करण्यासाठी व पैसा काढण्यासाठी लहान खजीना व मोठी रक्कम तसेच मांडलिक राजांकडून प्राप्त झालेल्या भेटवस्तू जमा करण्यासाठी वेगळा मोठा खजिना होता. मंडलेश्वरांकडे राज्याच्या महसूलाच नियंत्रण होते.

**यादव कालखंडातील महसूल प्रशासन**

बाबर व हुमायून या पहिल्या दोन मुघल सम्राटांच्या काळात दिल्लीच्या सुलतानशाहीप्रमाणेच महसूल प्रशासन वा व्यवस्था होती. बाबर हा भारतातील मुघल घराण्याचा संस्थापक असल्याने त्याचा बराचसा वेळ युद्धे लढण्यात व साम्राज्याची घडी बसविण्यात खर्ची पडला त्यामुळे त्याला महसूल प्रशासनाकडे जास्त लक्ष घालता आले नाही. बाबर नंतर मुघल सम्राट बनलेल्या हुमायूनला देखील महसूलाबाबतच्या बाबींकडे म्हणावे तसे लक्ष पुरवतात आले नाही कारण त्यालासुद्धा सिंहासनासाठी लढावे लागले व आपला बराच काळ अज्ञातवासात व्यतीत करावा लागला.

उत्कृष्ट दर्जाची महसूल व्यवस्था सुरू करण्याचे श्रेय शेरशहा सुर याला जाते. शेरशहा हुमायून नंतर व अकबरापूर्वी दिल्लीच्या तख्तावर बसला होता. महसूल सुधारणा है शेरशहाच्या प्रशासनाचे प्रमुख वैशिष्ट्य होते असे म्हणावे लागेल. शेरशहानें अवलंबिलेल्या महसूल सुधारणा म्हणजे भविष्यातील प्रामुख्यानें अकबरच्या काळातील महसूल सुधारणांचा पाया ठरला. सुरूवातीच्या काळात आपल्या वडिलांची जागीर (जहागिरी) व नंतरच्या काळात बिहारचे प्रशासन हाताळण्याचा शेरशहाला अनुभव होता व त्यामुळे त्याला सर्व पातळीवरील महसूल प्रशासनाचा अनुभव होता. कुशल प्रशासकांच्या मदतीने शेरशहानें संपूर्ण महसूल व्यवस्था कार्यक्षम बनविली. महसूल सुधारणांच्या मागे शेरशहाची खालील

दोन उद्दीष्ट्ये होतीः

१. शेतकऱ्यांची स्थिती सुधारणे

२. राज्याचा महसूल वाढवून महसूल व्यवस्था स्थिर करणें

शेरशहानें शेतसारा ठरविण्यासाठी संपूर्ण साम्राज्यभरातील शेतजमीनीचे मोजमाप करण्यावर भर दिला. येथून पुढे अंदाजावर वा शेतीतील उभ्या पिकांचे अंदाजे मोजमाप करून वा खळ्यावर पिकाचे (धान्याचे) अंदाजे मोजमाप करून शेतसारा गोळा करण्याची पद्धत बंद करण्यात आली. लागवडीखालील शेतजमीनीचे मोजमाप करून महसूलाचे मूल्यनिर्धारण वा प्रमाण ठरविण्यात येऊ लागले व कुठल्याही मध्यस्थाच्या मदतीशिवाय सरळ शेतकऱ्यांकडून महसूल गोळा केला जाऊ लागला. शेतजमीनेचे मोजमाप केल्यानंतर तिचे पुढील तीन प्रकारच्या प्रतींमध्ये विभाजन करण्यात आले-चांगली, मध्यम व निकृष्ट दर्जाची. शेततीचे उत्पादन ठरविण्यासाठी या तिन्ही प्रकारच्या शेतजमीनींचा मध्यमान धरला जाई. राज्याचा हिस्सा साधारणपणे एकूण उत्पादनाच्या एक चतुर्थांश वा एक तृतीयांश एवढा असे. शेणकऱ्यास शेतसारा पिकांच्या तसेच चलनाच्या (पैशाच्या) स्वरूपात भरण्याची मुभा होती. शेतकऱ्यांचे अधिकार मान्य व मंजूर केलेले असत. तसेच त्यांच्या जबाबदाऱ्यांची नोंद 'काबुलियत' नामक दस्तावेजावर केली जात, हा एक प्रकारचा

करारनामा असे जो शासक शेतकऱ्यांकडून लिहून घेत. शेतकऱ्यांना शासकांतर्फे 'पट्टा' नामक दस्तावेज दिला जाई ज्यावरून शेतकऱ्याची शेतजमीनीची मालकी प्रतित होत असे. प्रत्येक गावात पटवारी नामक (गावचा लेखापाल वा हिशेबनीस) अधिकारी असे जो कुळांच्या जमीनीबाबत इत्यंभूत माहिती ठेवत असे. सुलतानाच्या (सम्राट वा राजाच्या) मालकिच्या शेतजमीनीचे (खालसा) भाडे पटवारी व मुकादमाच्या सहाय्यानें या कामासाठी पगारावर वा वेतन देऊन नियुक्त केलेले विशेष सरकारी अधिकारी वसूल करत असत.

पेरणी केल्यानंतर शेतकऱ्याला राज्याला शेतसारा म्हणून किती हिस्सा द्यावयाचा आहे हे ठाऊक असे. कुठल्याही अधिकाऱ्याला शेतकऱ्याकडून राज्यानें ठरवून दिलेल्या शेतसाऱ्यापेक्षा जास्त शेतसारा गोळा करता येत नसे वा आकारता येत नसे. दुष्काळासारख्या आणिबाणीच्या स्थितीला वा इतर नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडून प्रत्येक बिघा जमीनीमागे अडिच शेर एवढे धान्य गोळा केले जात असे.

शेरशहाने आपल्या साम्राज्याच्या बहुतांश भागांत रयतवारी शेतसारा पद्धतीचा स्विकार केला होता. रयतवारी पद्धतीमध्ये राज्याचा शेतसारा मोजणीत व तो गोळा करण्याच्या कामात शेतकऱ्याशी थेट संबंध वा संपर्क येत असे. मात्र, मुलतान, माळवा व राजस्थान या भागांमध्ये रयतवारी पद्धतीचा अवलंब झाला नाही कारण तेथे जागिरदारी पद्धत अस्तित्वात होती. शेरशहाने केलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांची स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारण्यास मदत झाली. राज्याच्या महसूलात वा उत्पन्नात देखील लक्षणिय वाढ झाली. त्यानें शेतकऱ्यांचे कल्याण होईल यासाठी विशेष काळजी घेतली. शेरशहा म्हणत असे, "शेतकरी हे निर्दोष असतात, ते ज्यांचे राज्य असते त्यांचे म्हणणे मुकाटपणे ऐकत असतात, मी त्याच्यावर अत्याचार केले तर ते आपले गाव सोडून देतील व मुलूखाचे वाटोळे होईल व प्रदेश भकास होतील व पुन्हा एकदा सुबत्ता येण्यासाठी बराच कालावधी लागेल", शेरशहाने अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले होते व आपत्तीच्या काळात शेतसाऱ्याचे प्रमाण कमी केले जात असे वा शेतकयांना त्यातून सूट दिली जात असे. जरी अधिकाऱ्यांना कर वा शेतसारा ठरविताना शेतकऱ्याबाबत सौम्य भूमिका घेण्याच्या सूचना असल्या तरी तो गोळा करताना कठोरता दाखविली जाई.

त्यामुळे असे म्हणणे अतिशयोक्ती तरू नये की, शेरशहा हा हिंदूस्थानातील पहिला राजा होय त्यानें महसूल विषयक व शेतसऱ्याबाबत दूरगामी सूधारणा घडवून आणल्या ज्याचा राज्याला तसेच रयतेला फायदा झाला. अकबराची महसूल व्यवस्था शेरशहाच्या तत्वांवर आधारित होती तसेच त्याने त्या व्यवस्थेत काही नाविन्यपूर्ण बदल घडवून तिच्यात सुधारणा केल्या होत्या. त्यामुळे आपल्या असे लक्षात येते की, आपले साम्राज्य सुरक्षित करून स्थान बळकट केल्यावर अकबराने (अकबर हुमायून नंतर मुघल सम्राट बनला) खऱ्या अर्थाने महसूल प्रशासनाकडे लक्ष दिले. अकबर शेरशहाच्या महसूल सुधारणांचा प्रशंसक होता व त्याने त्यात सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला. अबूल फउलच्या ऐन-ए- अकबरी या ग्रंथात अकबराच्या महसूल प्रशासनाचे विस्तृत वर्णन आले आहे. राज्यारोहणानंतर म्हणजेच सम्राट बनल्यानतर अकबराने शेरशहाची शेतसारा गोळा करण्याची पद्धत स्विकारली. या पद्धतीनुसार लागवडीखालील शेतजमीनीचे मोजमाप करून शेतसारा गोळा करण्याचे केंद्रीय वेळापत्रक बनविले जाई. शेतजमीनीच्या उत्पादकतेनुसार शेतकऱ्याची पिकनिहाय देणी ठरवली जात. या कार्यक्रमानुसार किंमतीचे केंद्रिय वेळापत्रक ठरविले जाई. अकबराच्या असे लक्षात आले की, केंद्रिय स्तरावर ठरविलेल्या या कार्यक्रमाच्या काहि मर्यादा होत्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे याचा शेतकऱ्यांना खूप त्रास होत असे. सर्वसामान्यपणे या व्यवस्थेमुळे शेतकऱ्याला जास्त भुर्दंड बसे कारण किंमती केंद्रिय दरबारात ठरत असत ज्या ग्रामीण भागापेक्षा जास्त असत.

अकबराने महसूल प्रशासनात अनेक प्रयोग केले. त्याला या कामात मुझफ्फर खान, इतिमाद खान आणि राजा तोडरमल यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली. त्याला शेतकन्यांशी थेट संबंध प्रस्थापित करण्यात रस होता. पिकांची विविधता व जमीनीच्या सुपीकतेत असलेला फरक या कारणामुळे संपूर्ण देशात एकाच स्वरूपाची वा समान स्वरूपाची व्यवस्था आणणे कठीण होते. त्यामुळे अकबराने शेरशहाच्या पद्धतीमध्ये काही बदल केले. १५६० मध्ये ख्वाजा अब्दुल

मजीद खान याला वजीर म्हणून नियुक्त करून अकबराने महसूल प्रशासनात सुधारणा आणण्याचया दृष्टीने पहिला महत्त्वाचा प्रयोग केला. त्याने शेतसारा पैशाच्या स्वरूपात गोळा करण्याचे ठरवून त्याचा दर व प्रमाण जास्त ठेवले, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतसारा देणे कठीण जाऊ लागले, व त्यामुळे शेतकरी नाराज होते. १५६३ मध्ये अकबराने इतिमाद खान याला खालिसा शेतजमीनींचा प्रमुख दिवान म्हणून नियुक्त केले. त्याने खालिसा शेतजमीनीना जहागिरीपासून वेगळे केले. त्याने खालिसा शेतजमीनीचे विभाजन प्रत्येकी वर्षाला एक कोटी दाम एवढा महसूल देणाऱ्या महसूल विभागांमध्ये केली. या प्रत्येक विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्याला करोडी असे संबोधले गेले.

१५६४ साली राजा तोडरमल सोबत मुझफ्फर खान याला दिवान-ए-कूल म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानें महसूल सुधारणा घडवून आणल्या. वेगवेगळ्या परिसरातील कानूगोना त्यांच्या परिसरातील महसूलविषयक आकडेवारी विद्मारतेत पाठविण्यास सांगण्यात आले. विझारतेत या आकडेवारीवरून महसूल वा शेतसाऱ्याचे दर ठरवले जात. १५६९ मध्ये त्यानें वार्षिक मूल्यनिर्धारणाची पद्धती सुरू केली. कानूगो या अधिकान्याला स्थानिक स्थितीचे आकलन असे त्यामुळे त्याला प्रत्यक्ष उत्पादन, स्थानिक पातळीवरील किमती, विक्री व पिकांचे स्वरूप याविषयी अहवाल देण्यास सांगण्यात आले. वार्षिक मूल्यनिर्धारणाचे वा आकारणीचे काही दोष होते त्यामुळे शेतकऱ्याचे हाल झाले व राज्याला देखील त्रास झाला.

१५७३ साली गुजरात जिंकल्यानंतर अकबराने त्या प्रांतात महसूल सुधारणा घडवून आणण्यासाठी राजा तोडरमलला निवडले. तोडरमल शेतजमीनीचे नियमितपणे सर्वेक्षण घेत असे व शेतसाऱ्याची आकारणी शेतजमीनीचा वा गुणवत्ता तसेच ती ज्या परिसरात आहे हे पाहून ठरविण्यात येत असे. जहागिरिंचे रूपांतर राजाच्या (सम्राटाच्या) शैतजमीनींमध्ये करण्यात आले. तत्कालीन साम्राज्याचे विभाजन १८२ परगन्यांमध्ये करण्यात आले. प्रत्येक परगन्याचे उत्पन्न एक कोटी दाम म्हणजेच वर्षाला अडिच लाख रूपये एवढे होते. महसूल सुधारणाची अंमलबजावणी करण्यासाठी अकबराने तोडरमलला दिवान तर ख्वाजा शहा मन्सूर याला त्याचा सहायक वा प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले. तोडरमलने अकबराच्या साम्राजाच्या शेतसाऱ्याच्या प्रशासनाचा पाया रचला. तोडरमलने टाकलेली तीन महत्वाची पावले खालीलप्रमाणे होत.

शेतजमीनीचे पद्धतशीर सर्वेक्षण व मोजणी. पूर्वी शेतजमीनीची मोजणी अबाडीच्या दोरीच्या सहाय्याने केली जात असे जी हवेतील बाष्पाच्या प्रमाणानुसार आकूचन वा प्रसरण पावत असे. या अंबाडीच्या दोरी ऐवजी आता लोखंडी रिंगा लावलेले बाबू शेतजमीनीची मोजणी करण्याकरिता वापरले जाऊ लागले ज्यांच्यात कुठल्याही वातावरणात व तापमानात बदल होत नसे.

शेतजमीनीची मोजणी झाल्यानंतर लागवडीच्या सलगतेच्या आधारे तिचे वर्गीकरण केले जात असे. राज्याचा शेतीच्या उत्पादनातील हिस्सा ठरविण्यासाठी शेतजमीनीचे पुढील चार प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाईः पोलज, परौती, चाचर व बंजर. पोलज या प्रकारातील शेतजमीन नेहमीच वा सातत्याने लागवडीखाली असे. परौती या प्रकारातील शेतजमीनीची सुपिकता टिकविण्यासाठी तिला एक किया दोन वर्षे पडित ठेवावे लागत असे. चाचर या प्रकारातील शेतजमीनीची सुपिकता टिकविण्यासाठी तिला तीन किवा चार वर्षे पडित ठेवावे लागत असे. बंजर हा शेतजमीनीचा चौथा प्रकार होता, हि जमीन वा शेती पडिक म्हणजेच नापिक असे. राज्याचा पिकातील हिस्सा जमीनीची सुपिकता तसेच मागच्या दहा वर्षातील उत्पादन यावर ठरत असे. पोलाज व परौती या शेतजमीनींचे वर्गीकरण चांगली, मध्यम व खराब (कमी प्रतीची) अशा तीन प्रकारामध्ये होत असे. या तिन्ही प्रकारांतील उत्पादनाची सरासरी काढून शेतसारा ठरवला जाई. बंजर जमीनीची लागवड करण्याकरिता प्रोत्साहन दिले जाई.

फक्त प्रत्यक्ष लागवडीखाली असलेली शेतजमीन मोजून शेतसारा ठरवला जाई. राज्याचा उत्पादनातील हिस्सा एक तृतीयांश एवढा असे, परंतु हे प्रमाण जमीनीची उत्पादकता व शेतसारा ठरविण्याची पद्धती यानुसार बदलत असे. वेगवेगळ्या पिकांसाठीचा शेतसाऱ्याचा दर वेगळा असे.

राजा तोडरमलच्या या शेतसारा गोळा करण्याच्या पद्धतीमुळे शेतकरी व राज्य या दोहोंमध्ये शेतसाऱ्याबाबत नाहक रहस्य वा गूढता राहत नसे. शेतकऱ्याला त्याला किती शेतसारा द्यावा लागणार आहे ते ठाऊक असे. राज्याला शेतसारा दिल्यानंतर शेतकऱ्याला त्याची पोच (पोचपावती) दिली जात असे. गोळा करण्यात आलेला शेतसारा, जमीनीची धारणा तसेच, शेतकऱ्याचे देणे, इत्यादींची नोंद ठेवली जात असे. शेतकऱ्याला त्याच्या नावे पट्टा' दिला जात असे व व 'काबुलियत' नामक करारनाम्यावर शेतकऱ्याला स्वाक्षरी करावी लागत असे. या दस्तावेजांमध्ये शेतकऱ्याच्या शेतजमीनीचा तपशील दिलेला असे, ज्यात शेतीचे क्षेत्रफळ व त्यानें द्यावयाचा शेतसारा याबाबतचा समावेश असे. शेतसारा गोळा करणारा अधिकारी गोळा केलेल्या शेतसाऱ्याचा तपशील राज्याच्या खजिन्याकडे पाठवित असे. जमाखर्च (हिशोब) व तत्सम तपशील पर्शियन (फारसी) भाषेत ठेवला जाई.

दशला पद्धती, जब्ती पद्धती, गल्लाबक्ष पद्धती आणि नसक पद्धती अशा महसूल (शेतसारा) गोळा करण्याच्या विविध पद्धती होत्या. या पद्धतीचे वर्णन खालीलप्रमाणे दिले आहे:

दशला पद्धती (दहा वर्षाची शेतसारा गोळा करण्याची पद्धती) बिहार, माळवा, अलाहाबाद, आग्रा, दिल्ली, लाहोर, अवध आणि मुलतानच्या काही भागांमध्ये हि पद्धती अवलंबिण्यात आली होती. या पद्धतीनुसार विविध पिकाच्या उत्पादनाची सरासरी आणि शेवटच्या काही वर्षांतील किंमती यांचा हिशेब केला जाई व त्यानंतर राज्याचा हिस्सा उत्पादनाच्या सरासरीच्या एक तृतीयांश एवढा ठरवला जाई.

जब्ती पद्धतीमध्ये बितिकची नामक महसूल अधिकारी प्रत्येक शेतजमीनीतील विविध पिकांचे क्षेत्रफळ मोजत असे व त्यानंतर त्यावेळी लागू असलेल्या दरानुसार महसूल वा शेतसाऱ्याचा हिशेब करून तो तत्सम शेतकऱ्याकडून गोळा करत असे. या पद्धतीची अंमलबजावणी बिहार, मुलतान, अलाहाबाद अजमेर, आग्रा व दिल्लीमधील काही सुभे तसेच गुजरातच्या काही भागांमध्ये केली जात असे.

गल्लाबक्ष ही सर्वात जुनी व सर्वत्र आढळणारी शेतसारा पद्धती होती. या पद्धतीमध्ये शेतीचे उत्पादन राज्य व शेतकऱ्यामध्ये एका निश्चित प्रमाणात विभागले जाई. हि पद्धती काश्मीर, कंदाहार, आणि सिंध व मुलतानच्या काही भागांमध्ये हि पद्धती अस्तित्वात होती.

नसक पद्धतीस कांकूत पद्धती देखील म्हटले जाई. या पद्धतीची अंमलबजावणी बंगाल, गुजरात व काठियावाड़ या भागांमध्ये केली जाई. या पद्धतीमध्ये शेतसाऱ्याचे मोजमाप करणारे अंदाजे शेतीच्या उत्पादनाचा अंदाज प्रत्यक्ष निरिक्षण करून प्रत्यक्ष ठिकाणी लावत असत व लावलेल्या अंदाजापैकी एक तृतीयांश एवढा हिस्सा राज्याला दिला जाई.

अकबराच्या शेतसारा पद्धतीला स्यतवारी पद्धत म्हटले जाई. या पद्धतीत प्रत्यक्ष शेतकरी ठरलेला वार्षिक महसूल वा शेतसारा भरण्यास जबाबदार असे. पटवारी व मुकादम हे राज्याचे अधिकारी नसत परंतु राज्याने न व सम्राटाने त्यांच्या सेवा ग्राहय धरून मान्य केल्या होत्या व त्यांच्या सहाय्याने शेतसाऱ्याचे मोजमाप करून तो गोळा केला जात असे तसेच त्याची नोंद ठेवली जात असे. याच्या मोबदल्यात त्यांना शेतसाऱ्याचा काही भाग दिला जात असे. अमिल हा शेतसारा (महसूल) गोळा करणारा अधिकारी असे व त्याला बितिकची, फोतेदार व कानूगो हे अधिकारी मदत करत असत. आपल्या असे निदर्शनास येते की, अकबराच्या कारकिर्दीच्या नंतरच्या काळात कानूगौना राज्याचे अधिकारी म्हणून मान्यता मिळाली होती व त्यांना राज्याकडून वेतन दिले जाई. अमिलांच्या वर अमिल गुजर हे अधिकारी असत, जे प्रांतीय दिवानांच्या देखरेखीखाली कार्यरत असत व प्रांतीय दिवान केंद्रिय दिवानाच्या म्हणजेच वजीराच्या नियंत्रणाखाली काम करत असत. अकबराला लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यात आणि शेतीत सुधारणा घडवून आणण्यात खूपच रस होता. त्यानें अमिलांना शेतकऱ्यांसोबत पित्याप्रमाणे वर्तन करण्याच्या सुचेना दिल्या होत्या. त्याला

शेतकऱ्याऱ्यांना बियाण विकत घेण्यासाठी, पशुधन विकत घेण्यासाठी व शेतीच्या इतर कामासाठी कर्ज देण्याच्या व शेतकऱ्याला परवडेल अशा हप्त्यांमध्ये ते वसूल करण्याच्या सुचना होत्या.

अकबराच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांवर कराचा अतिप्रमाणात बोजा नव्हता, तो पारंपारिकरित्या चालत आलेला उत्पादनाचा एक तृतीयांश एवढा हिस्सा शेतकऱ्याऱ्यांकडून शेतसारा म्हणून गोळा करत असे. दशला पद्धतीमध्ये शेतकऱ्याला दहा वर्षे एका ठरलेल्या प्रमाणात शेतसारा द्यावा लागत असे. जर शेतकऱ्यानें स्वबळावर उत्पादनात वाढ केली तर त्याचा फायदा त्याला मिळत असे. याव्यतिरिक्त जहागिरदारीची सर्व जमीन राज्याच्या अधिकाऱ्याऱ्यांच्या नियंत्रणाखाली असे. अशाप्रकारे, अकबराच्या काळात जहागिरदार व जमीनदारांसारखे शेतकऱ्याऱ्यांचे शोषण करणारे मध्यस्थ नव्हते. त्यामुळे अकबरकालिन महसूल व्यवस्था वा शेतसारा पद्धती राज्य तसेच शेतकरी या दोहोंना पुरक होती. या पद्धतीमुळे उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली व त्यामुळे व्यापार उदिमात देखील वाढ झाली. नेमक्या याच कारणामुळे जरी अकबर सातत्याने युद्ध करत असला तरी त्याचा खजिना नेहमीच द्रव्याने भरलेला असे. त्यामुळेच व्हिन्सेंट स्मिथ या इंग्रज इतिहासकाराने अकबराच्या महसूल प्रशासनाची प्रशंसा केली आहे.

मात्र, येथे एक बाब लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे ही की, मुघल सम्राट जनतेकडून इतरही कर गोळा करत असत. अशातर्हेने राज्याच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी शेतकऱ्यांकडून शेतसाऱ्यासोबतच इतरही कर घेतले जात. या इतर कराना 'अवाब' असे म्हटले जाई. या इतर करांमध्ये विक्री केलेल्या मालावरील कर, स्थावर मालमत्तेच्या विक्रीवरील कर, सरकारी अधिकाऱ्याऱ्यांनी कामानिमित्त घेतलेली आगाऊ रक्कम तसेच राज्याच्या वतीने घेतलेले शुल्क व दलाली, काही विशिष्ट प्रकारचे व्यापार करण्यासाठीचा परवाना कर, जबरदस्तीने वसूल केलेली वर्गणी, हिंदूकडून गोळा केली जाणारी पुढील प्रकारची जकात- गंगेत स्नान करण्यासाठी द्यावा लागणारा कर, हिंदूच्या अस्थी गंगेत विसर्जीत करण्यासाठी लागणारा कर, इत्यादींचा समावेश असे. औरंगजेबाने जरी काही 'अवाब' रद्द केलेले निदर्शनास येत असले तरी राज्याच्या महसूलात वृद्धी करण्यासाठी काही नवीन 'अवाब' सुरू केले. मुस्लिमेत्तर जनतेकडून घेतला जाणारा जिझिया हा कर अकबराने रद्द केला होता मात्र औरंगजेबाने तो पुन्हा सुरू केला.

मुघल काळात महसूल प्रशासनात जमीनदार महत्वाची भूमिका निभावत असत. त्यांच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखणे ही त्यांची जबाबदारी असे. परंतु ते अंमल गुजरांप्रमाणे राज्याचे अधिकारी नसत तर गावातील बुल्लक जमीन धारक वा जमीन मालक असत. यातील काहीजण पूर्वीच्या राजघराण्यांतील वंशज होते जे आपली वडिलोपार्जित शेतजमीन कसत होते. जमीनदार आपल्या मालकी हक्काच्या शेतजमीनीची लागवड करत असत. त्याना अनेक गावांचा शेतसारा गोळा करण्याचा वंशपरंपरागत हक्क देखील प्राप्त होता. असे असले तरी, सर्वसामान्य मान्यता होती की, जमीनदार त्याच्या जमीनदारीअंतर्गत येणाऱ्या सर्व शेतजमीनीचा मालक नसे. याचाच अर्थ असा होता की, जोपर्यंत कुछ रितसरपणे शेतसारा वा जमीनीचा महसूल रितसरपणे देत आहे तोपर्यंत जमीनदार कुळाला शेती करण्यापासून रोखू शकत नव्हता वा त्याला शेतजमीनीपासून बेदखल करू शकत नव्हता. बंगाल प्रांतामध्ये जमीनदार एक ठराविक रक्कम राज्याला महसूल म्हणून देत असे व उरलेले उत्पादन वा रक्कम स्वतःचे उत्पन्न म्हणून ठेवून घेत असे. जेथे शेतकऱ्याने राज्याला द्यावयाचा शेतसारा निश्चित झालेला असे अशा ठिकाणी जमीनदार स्वतःच्या फायद्यासाठी शेतकऱ्याऱ्यांवर वेगळा उपकर लावून त्याची वसूली करत असे. जमीनदारांनी शेतक-यांच्या अशाप्रकारे केलेल्या शोषणामुळे त्यांची ख्याती 'शोषणकर्ता वर्ग' अशी झाली.

जमीनदार त्याचे खाजगी सैन्यदेखील बाळगत असत. ते किल्ले वा गढ्यांमध्ये निवास करत असत जे आपसूकच त्यांच्या प्रतिष्ठेचे लक्षण बनले. जोपर्यंत ते राज्याच्या खजिन्यात नित्यनेमाने महसूल जमा करत असत तोपर्यंत त्यांच्या बाबींमध्ये वा व्यवहारामध्ये राज्यातर्फे वा सुलतान वा सम्राटातर्फे हस्तक्षेप केला जात नसे. या जमीनदारांचा स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव तसेच सत्ता असे त्यामुळे साधारणपणे राज्याला वा सम्राटाला त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नसे.

अकबराच्या काळात सरकारी अधिकाऱ्याऱ्यांना प्रामुख्याने मनसबदारांना रोख रक्कमेच्या स्वरूपात वेतन दिले जात असे. मात्र, अकबरानंतर यात बदल करण्यात आला. अकबराच्या उत्तराधिकाऱ्याऱ्यांनी या पद्धतीमध्ये बदल केले. आता मुघल अधिकाऱ्याऱ्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपात वेतन न देता त्यांना ज्या जमीनीतून महसूल मिळेल अशी जमीन दिली जात असे. अशा जमीनीला जहागिर (जहागिरी वा जागिर) म्हटले जाई व ती ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्याला जहागिरदार असे संबोधले जाई. मनसबदाराला त्याची प्रतिष्ठा व हुद्याप्रमाणे जहागिरी मिळत असे. त्याला त्याचे उत्पन्न या जहागिरीतून प्राप्त होत असे. विजारत (वजीराचे कार्यालय) अशा सर्व जहागिरींचे मुल्यमापन करत असे. जहागिरदार हे एकप्रकारे राज्याचे अधिकारी असत व त्यांच्या वेगवेगळ्या ठिकाणी नियुक्त्या व बदल्या केल्या जात. काही वर्षांनंतर जहागिरदाराची रवानगी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केली जात असे जेणेकरून त्याचे तत्सम परिसरात हितसंबंध निर्माण होऊ नयेत. परंतु जहागिरदार साधारणपणे आपल्या जहागिरितील जनतेच्या कल्याणासाठी काही विशेष प्रयत्न करताना निदर्शनास येत नसत. तसेच साम्राज्याच्या प्रशासनाचे अशा जहागिरीवर नियमितपणे नियंत्रण नसे. नतरच्या काळातील मुघल सम्राटाच्या काळात अशा जहागिरी वंशपरंपरागतरित्या त्याच कुटूंबांकडे आल्या त्यामुळे परिस्थिती अजूनच बिकट बनली.

मुघल सम्राट जहांगीर याच्या काळात शेती (कृषी क्षेत्रात) व महसूलात (शेतसारा) उत्तरोत्तर घट आल्याचे वा हर्हास झाल्याचे जाणवते. जहागिरदाराना त्याच्या जमीनीचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य होते. साधारणपणे हे जहागिरदार शेतकऱ्याऱ्यांचा छळ करत असत. खालसा प्रकारच्या जमीनीतून मिळणाऱ्या महसूलात देखील उत्तरोत्तर घट होत गेल्याचे निदर्शनास येते. शहा जहॅान बादशहाने आपल्या शेतकऱ्यांची बिकट होत चाललेल्या था स्थितीत सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला. त्याने जास्त जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला. मनसबदारांना रोख रक्कमेच्या स्वरूपात वेतन देण्याऐवजी जहागिरी देण्याची पद्धत सुरूच ठेवण्यात आली. औरंगजेबाच्या कारकीर्दीत कृषीक्षेत्रातील समस्या खूपच शोचनीय बनली. राज्य शेतकऱ्यांना वा कुळांना शेतजमीनीपासून बेदखल करू शकत नव्हते म्हणून त्यांना शेतीच्या कामात व्यस्त ठेवावे लागत असे. अधिकारी वर्ग व जहागिरदार शेतकऱ्यांवर जुलूम करत असत व दहशत निर्माण करत असत. उत्तरकालीन मुघल शासकांच्या काळात महसूल प्रशासनाचा प्रचंड हॅास व अधोगती होण्यास सुरुवात झाली त्यामुळे एकूण गोळा होणाऱ्या महसूलात मोठ्या प्रमाणात घट झाली आणि साम्राज्याची आर्थिक स्थिती डबघाईला येऊन बिकट झाली.

सुरूवातीलाच असे नमूद करणे संयुक्तिक ठरेल की, सम्राट अकबराने अंगिकारलेल्या जमीन महसूल वा शेतसारा पद्धतीची विद्वानांनी प्रशंसा केली आहे. अबूल फजलच्या प्रशस्तीपत्रानुसार अकबराची शेतसारा पद्धती अतिशय कार्यक्षम होती व या पद्धतीवर शेतकरी खूश होते. शेतसाऱ्याचे प्रमाण निश्चित केलेले असल्याने शेतकऱ्यांकडून जास्त प्रमाणात शेतसारा गोळा करणे वा उकळणे कठिण होते. तसेच दुष्काळात व अतिवृष्टीच्या काळात शेतसाऱ्यात सूट दिली जात असे. या प्रकारची महसूल व्यवस्था वा शेतसारा पद्धती कमी जास्त फरकाने वा कुठलाही बदल न करता संपूर्ण मुघल साम्राज्यात अस्तित्वात होती.

जरी शेतसारा हा प्रमुख कर असला तरी राज्याच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून या व्यतिरिक्त इतरही कर गोळा केले जात असत. हे कर पुढीलप्रमाणे होते वेगवेगळ्या प्रकारच्या जकाती, सीमाशुल्क, टंटसाळीवरील कर, प्रांताधिकारी, मंत्री व जहागिरदारांकडून बादशहाला वा राजाला महत्वाच्या प्रसंगी मिळणाऱ्या भेटवस्तू, पराभूत राजांकडून मिळणारी नुकसानभरपाई, इत्यादी. अशाप्रकारे मध्ययुगीन काळातील महसूल प्रशासनात अनेक बदल झालेले निदर्शनास येतात. गोळा केलेल्या महसूलाचा बराचसा भाग वा मोठा हिस्सा युद्धावर व राजाच्या वैयक्तिक सुखसविधांवर व चैनीवर खर्च केला जाई. येथे आपणास औरंगजेब बादशहाचे उदाहरण देता येईल. त्याने त्याला आपल्या पूर्वजांकडून द्रव्याने भरपूर भरलेल्या प्राप्त झालेल्या खजिन्याची नासाडी दखखनमधील स्वारीने झाली.

**मध्ययुगीन व्यापार उदीम:-**

**प्रस्तावना**

चौदाव्या शतकात जेव्हा इब्न बतूता दिल्लीत आला तेव्हा भारतीय उपखंड पूर्वेकडे चीनपासून पश्चिमेकडे वायव्य आफ्रिका तसेच युरोपपर्यंत जागतिक संपर्काच्या वा दळणवळणाच्या जाळ्याचा भाग बनलेला होता. त्यांच्या असे लक्षात आले की, आवश्यक ती कौशल्ये, इच्छाशक्ती व संसाधने असणाऱ्या व्यक्तींसाठी भारतीय नगरांमध्ये वा शहरांमध्ये विविध क्षेत्रांतील रोमांचक संधी उपलब्ध होत्या. तो आपणास कशाप्रकारे भारतीय नगरांमधील (शहरांमधील) लोकसंख्येची घनता जास्त होती म्हणजेच शहरांतील लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते व सुबत्ता व समृद्धी होती याविषयी देखील माहिती देतो. यावरून तो आपणास हेदेखील सुचवतो की, भारतातील नागरिकरणाचे (शहरीकरणाचे) प्रमाण जास्त होते तसेच व्यापार उदीमाच्या क्षेत्रातदेखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती. आपल्या इतिवृत्तांतात इब्न बतूता भारतीय शहरांचे व प्रामुख्याने दिल्ली व दौलताबादचे वर्णन देतो.

भारतातील बऱ्याचशा शहरांतील रस्त्यांवर तुडुंब गर्दी असे व त्यातील चमकदार (लख्ख) व आकर्षक बाजार विविध वस्तूंनी भरलेले असत. भारतीय उपखंडाचे आंतर-आशियाई व्यापार उदीमाच्या जाळ्याशी दृढ संबंध प्रस्थापित झाले होते व भारतीय उत्पादकांना आग्नेय व पश्चिम आशियात मोठ्या प्रमाणात मागणी होती. याचा भारतीय कलावंत व व्यापाऱ्यांना खूप फायदा होत असे. ज्या भारतीय वस्तूंना मागणी होती त्यात प्रामुख्याने कापडाचा व त्यातल्या त्यात सूती, मलमल, रेशमी, जरीच्या व मुलायम कापडाचा समावेश होता. आपणास बरेचसे भारतीय राजे वेगवेगळ्या प्रकारे व्यापार उदिमाला चालना देत असत असे आढळते. व्यापाऱ्यांना प्रतोत्साहित करण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जात. जवळजवळ सर्वच व्यापारी मार्गावर सुखसुविधांनी परिपूर्ण असलेल्या धर्मशाळा तसेच विश्रामगृहांची व्यवस्था केलेली असे. इब्न बतूता आपणास माहिती देतो की, भारतातील तत्कालीन टपाल खाते फार सक्षम होते. याची प्रचिती आपणास याच्यावरून येते की, व्यापारी या विभागामुळे वा सेवेमुळे दूरच्या ठिकाणी फक्त माहितीच पुखू शकत नव्हते तर त्यांना पैशांचे व्यवहार व अगदी कमी वेळात वस्तू देखील एका ठिकाणाहून दुसऱ्या दुचरच्या ठिकाणी पाठविणे शक्य होते.

**मध्ययुगीन कालखंडातील व्यापाराचे स्वरुप**

सोळाव्या व सतराव्या शतकात ग्रामीण समाजाचे तेथे आढळणारा आर्थिक व सामाजिक भेद हे एक प्रमुख वैशिष्ट्य होते. याचा अर्थ असा की, आपणास एका बाजूला सामाजिक प्रतिष्ठा व विविध अधिकार प्राप्त असलेले गर्भ श्रीमंत जमीनदार आढळत तर दुसरीकडे भूमीहिन अस्पृश्य शेतमजूर नजरेस पडत. या दोन टोकांच्यामध्ये शेतकऱ्याऱ्यांचे स्थान असे जें भाडोत्री मजूरांच्या मदतीने अन्नधान्य व विविध वस्तूंचे उत्पादन करत असत. शेती कमी असणाऱ्या लहान शेतकऱ्यांना त्यांचा उदरनिर्वाह चालवणे देखील कठिण जात असे. असे मानले जाते की, सतराव्या शतकात भारतातील साधारणपणे १५% टक्के एवढे लोक शहरांमध्ये राहत असत व ही संख्या वा प्रमाण सर्वसामान्यपणे त्याच काळात पश्चिम युरोपात जेवढे लोक शहरांमध्ये राहत असत त्यापेक्षा जास्त होती. आपणास बनियर कडून पुढीलप्रकारच्या नगराची माहिती मिळते- व्यापारी नगरे (शहरे), सागरी बदरे असणारी शहरे, पवित्र शहरे, वेगवेगळ्या वस्तूचे उत्पादन करणारी शहरे, यात्रेसाठी प्रसिद्ध असणारी शहरे, इत्यादी. अशी विविध प्रकारची शहरे अस्तित्वात होती याचा अर्थ व्यापारी वर्ग व विविध व्यवसाय करणारे लोक समृद्ध होते असा होतो. शहरांमध्ये राहणाऱ्या इतर लोकांमध्ये वेगवेगळ्या व्यवसायातील पुढील लोकांचा समावेश होत असे वैद्य (हकिम), शिक्षक, वकिल, चित्रकार, वास्तुविद्याविशारद, संगीतकार, सुलेखन करणारे, इत्यादी.

हिंदू व्यापारी देशांतर्गत तसेच देशाबाहेरील व्यापारात महत्वाची भूमिका बजावत असत. तरीसुद्धा आपण एक बाब लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे खुरसानी (परकिय मुस्लिम व्यापारी) व्यापाऱ्याऱ्यांचादेखील व्यापारात मोठा

हिस्सा होता. दख्खनमधील काही किनारपट्टीवरील राज्य व त्याचे शासक परकिय व्यापाऱ्याकडून अतिरिक्त कर वसूल करून त्यांना प्रदेशबाह्य अधिकार व विशेष सवलती देत असत.

आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये प्रामुख्याने उच्च वर्गासाठी लागणाऱ्या महागड्या विलासी वा चैनीच्या वस्तूंचा व घोड्यांचा तसेच खेचरांचा समावेश असे. निर्यातीमध्ये अन्नधान्य, औषधी वनस्पती, मसाले, साखर व कापडाचा अंतर्भाव होता. आग्नेय आशिया व पूर्व आफ्रिकेत निर्यात होणाऱ्या सूती व इतर प्रकारच्या कापडांचा प्रामुख्याने समावेश होता. असे म्हटले जाते की, या काळात पर्शियाच्या आखाताच्या आसपास वसलेले काही देश अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी पूर्णतः भारतीय उपखंडावर अवलंबून होते. जरी कापडाची निर्यात प्रामुख्याने आग्नेय आशिया व पूर्व आफ्रिकेत होत असली तरी भारतीय कापड युरोपमध्ये देखील पोहोचले होते असे निदर्शनास येते. अब व्यापारी या भारतीय वस्तू तांबड्या समुद्राच्या मार्गाने दमास्कस (सिरियाची राजधानी) व अलेक्झाड्रिया (इजिप्तमधील प्रांत) येथे घेऊन जात असत. तेथून पुढे या वस्तूचे वितरण भूमध्य सागराच्या परिसरातील व त्यापलीकडील देशांमध्ये होत असे.

**मध्ययुगीन कालखंडातील उद्योगः**

जरी भारतीय कापड उद्योग फार जूना असला तरी कापडाची विविधता मर्यादित होती. मुस्लिमांनी भारतात आकर्षक प्रकारचे वेगवेगळे कापड आणले. बंगाल हे भारतीय कापड उद्योगाचे मुख्य केंद्र होते व कालांतराने याबाबतीत गुजरात बंगालचा स्पर्धक म्हणून पुढे आलेले आपल्या लक्षात येते. कापड उद्योगानंतर महत्वाचे असलेले उद्योग म्हणजे धातुकाम, साखर बनविणे व कागद बनविणे हे होते. यातील कागद बनविणे हा किरकोळ उद्योग होता. है उद्योग बहुदा खाजगी मालकीचे असत. मात्र, राज्याला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यातील अवजारे शासकीय मालकीची असत व त्यांचे व्यवस्थापन देखील राज्याच्या यंत्रणेकडून केले जाई. दिल्लीतील शाही कारखान्यामध्ये फक्त रेशमाचे कापड बनविण्यासाठी चार हजाराच्या आसपास विनकरांना कामाला लावले जाई. भारत युरोप, चीन व प्रशांत महासागरातील व आसपासच्या देशांसोबत सागरी मार्गाने जोडलेला होता. तसेच जमीनीच्या वा भूमार्गाने वा खुष्कीच्या मार्गाने भारत मध्य आशिया, अफगाणिस्तान, पर्शिया, तिबेट व भुतान सोबत जोडलेला होता. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात व्यापार भरभराटिस होता व परकिय व्यापारी मोठ्या प्रमाणात स्थायिक झाले होते त्यामुळे सुलानशाहीतील शहराना वैश्विक रूप प्राप्त झाले होते.

पैसे व्याजाने दिले जात आणि श्रीमंत सावकार या व्यवसायात वा क्षेत्रात सक्रिय असत. आश्चर्यकारक बाब म्हणजे जरी बऱ्याचदा राजकिय स्थिती अस्थिरतेची असली तरी भारतीयांच्या ठायी असलेल्या प्रामाणिकता या गुणांमुळे भारतासोबत व्यापार करणे सुरक्षित समजले जाई अशी माहिती आपणास त्याकाळात भारतात येणारे व्यापारी आणि परकिय प्रवासी यांच्याकडून मिळते. भारत हा महत्त्वाचा निर्यातदार होता व व जगभरातले व्यापारी विविध वस्तूंची व मालाची खरेदी करण्यासाठी सोन देखील देत असत आणि या मालमध्ये शेतीमाल, कापड, औषधी वनस्पती व इतर अनेक वस्तूंचा समावेश होता. तसेच भारत हा पर्शिया घ्या आखातातील देशासाठी अन्नधान्याचा महत्वाचा खोत होता. सुलानशाहीत चलनाचा (चलनी नाणे) वापर व महत्व वाढत चालले होते व नाणी टंकसाळीत पाडून व्यवहारासाठी वापरली जात. हि नाणी संपूर्ण उत्तर भारतातील शहरामध्ये (नगरांमध्ये) प्रसारित करून वापरात आणली जात. खाण्याचे पदार्थ (अन्न) विविध वस्तू गंगेच्या त्रिभुज प्रदेशात स्वस्त दरात मिळत, जरी या काळात वस्तूंचा तुटवडा व अस्थिरता अशा अनेक बाबीवर किमती अवलबून असत. परकिय प्रवाशांच्या वृत्तांतांनुसार वस्तूंच्या किमती साधारणपणे कमी असत.

परकिय प्रवाशांच्या साक्षीनुसार एक बाब अधोरेखित होते की, विजयनगरचे साम्राज्य देखील श्रीमत होते व सर्वत्र सुबत्ता होती. तेथील शेती चांगल्या प्रतीची होती व कृषी क्षेत्रात भरभराट होती. विजयनगरचे शासक विविध

प्रकारच्या जलसिंचन सुविधा व प्रकल्प विकसित करून कृषी क्षेत्राला बढावा देण्यात रस घेत असत. कृषी क्षत्रासोबतच विविध

उद्योगातून राज्याला अतिरिक्त उत्पन्न मिळत असे किंबहूना हे उद्योग म्हणजे राज्याला अतिरिक्त संपत्ती मिळवून देण्याचे स्त्रोत होते. कापड उद्योग, खाण उद्योग, सुगंधी द्रव्याचा उद्योग आणि धातूशुद्धीकरण उद्योग हे त्याकाळातील काही महत्वाचे उद्योग होत. व्यापार व उद्योग हे चांगल्या व्यापारी संघांमध्ये संघटित झाल्याचे निदर्शनास येते.

अब्दुल रझाक या विजयनगरातील पर्शियन राजदूतानूसार विजयनगरच्या साम्राज्याच्या ताब्यात तीनशेच्या आसपास सागरी बंदर होते. होन्नावर, भटकळ, मंगरूळ, कालिका, कोचिन, क्विलॉन, कावळा, नेगापटनम्, सेंट थॉम आणि पुलिकत ही काही विजयनगरमधील महत्वाची बंदरे होती. येथील परकिय व्यापार प्रामुख्याने पोर्तुगीज, भारतीय व अरबी व्यापाऱ्यांच्या माध्यमातून चालत असे. महत्वाचे म्हणजे विजयनगरच्या साम्राज्याचे मलाया द्वीपसमूह, हिंद महासारातील बेटे, ब्रह्मदेश, पर्शिया, चीन, ॲबिसिनिया, दक्षिण आफ्रिका व पोर्तुगाल या देशांसोबत चांगले व्यापारी संबंध होते. विजयनगरच्या साम्राज्यातून प्रामुख्याने कापड, तांदूळ, लोखंड, साखर, सोरामीठ आणि मसाले या वस्तूची व जिन्नसांची निर्यात होत असे. विजयनगरच्या साम्राज्यात आयात केल्या जाणाऱ्या महत्वाच्या वस्तू व प्राणी पुढीलप्रमाणे होत्या- तांबे, पारा, चीनी रेशमी कापड, मखमल, घोडे व हत्ती. १५१६ साली विजयनगरच्या साम्राज्याला भेट देणारा एदुआर्दो बारबोझा हा पोर्तुगीज प्रवाशी अगोदरच्या प्रवाशांनी दिलेल्या माहितीला दुजोरा देतो. त्याने विजयनगर शहराची पुढील शब्दांमध्ये प्रशसा केली आहे- " शहराची व्याप्ती मोठी होती, लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते व हे शहर देशातील एक सक्रिय व्यापारी केंद्र होते- येथे हिरे व रूबीसारखे खडे पेगूमधून येत असत, रेशीम कापड चीन व अलेक्झांड्रिया मधून येत असे, शेंदूर, कापूर, कस्तुरी, काळी मिरी आणि चंदन मलबार मधून येत असत."

विजयनगरचे साम्राज्य व शेजारच्या राज्यांमधील राजकीय तणावाचा परिणाम व्यापारावर पडत असे. युद्धाचा निर्णय अनेकदा परिणामकारक घोडदळावर अवलंबून असल्यामुळे अरेबिया (अरबस्तान) आणि मध्य आशियातून उत्तम प्रतीच्या घोड्यांची आयात करणे दक्षिणेतील मध्ययुगीन स्पर्धक राज्यांना महत्वाचे होते. तसेच विजयनगरचे साम्राज्य तेथील मसाल्याच्या, कपड्यांच्या आणि मौल्यवान खड्याच्या बाजारपेठांसाठी प्रसिद्ध होते. असे लक्षात येते की, अशा गर्भ श्रीमंतांच्या शहरांमध्ये व्यापार प्रतिष्ठेचे प्रतिक मानला जात असे जेथे श्रीमंत नागरिकांना विदेशी वस्तू, प्रामुख्याने दागिने आणि मौल्यवान खडे लागत असत. राज्याने प्राप्त केलेल्या महसूलाचे विजयनगरच्या साम्राज्यातील सुबत्ता व समृद्धीत महत्वाचे योगदान होते.

जेव्हा हुमायून नंतर व अकबरापूर्वी शेरशहा दिल्लीच्या तख्तावर आला तेव्हा त्याने मोठ्या प्रमाणात व्यापार उदीमाला प्रोत्साहन दिले. त्याने आपल्या साम्राज्यात वस्तूंवर विविध ठिकाणी कर गोळा करण्याची पद्धती बंद करून टाकली व फक्त सीमेवर जेव्हा वस्तू देशात आयात केली जाईल तेथे व जेथे वस्तूंची विक्री केली जाईल तेथे अशा दोनच ठिकाणी वस्तूंवर कर आकारण्याचे निर्देश आपल्या अधिकाऱ्याऱ्यांना दिले. पश्चिमेकडून व मध्य आशियातून आयात होणाऱ्या वस्तूचे सीमाशुल्क सिंधू नदीच्या तीरावर गोळा केले जाई. फक्त व्यापार उदीमाला प्रोत्साहन देणेच पुरेसे नसते तर व्यापार उदिमाचा उत्कर्ष करण्यासाठी त्यात सुधारणा करणे व तो सुस्थितीत ठेवणे आवश्यक असते ज्यामुळे राज्यामध्ये सुबत्ता व समृद्धी येते. शेरशहाने व्यापार उदीमाची उन्नती करण्यासाठी वा बढ़ावा देण्यासाठी व्यापाऱ्याऱ्यांना व्यापारी मार्गावर संरक्षण देणे, कार्यक्षम पोलिस व्यवस्था,चांगल्या प्रतीची नाणी पाडणे, रस्ते व सरांईचे निर्माण, व्यापाऱ्यांच्या मालमत्तेला संरक्षण पुरविणे, अधिकाऱ्याऱ्यांना व्यापात्यांच्या हितांचे रक्षण करण्याच्या सुचना देणे आदि उपाययोजना केल्या.

मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्था बऱ्याच प्रमाणात आत्मनिर्भर होती. मुस्लिम आक्रमणे व त्यांना प्राप्त झालेले विजय याचा परिणाम देशाच्या व्यापार उदीमावर झाला नाही. या काळात मोठे उद्योग विकसित झाले नाहीत असे

आपल्या लक्षात येते. आपण असे पाहतो की, या काळात बरेच उद्योग स्थानिक स्वरूपाचे होते. मध्ययुगीन काळात काही गावपातळीवर भरभराटिस आलेले उद्योग पुढीलप्रमाणे होत कापसावर प्रक्रिया करणे, कलाई वा हातमाग आणि वीणकाम, साखर व गुळ बनविणे, तेलबियांपासून तेल काढणे, नीळ बनविणे, मातीची भांडी बनविणे (कुंभारकाम), चामड्याच्या वस्तू बनविणे, शेतीसाठी लागणारी विविध अवजारे, युद्ध सामुग्री (शस्त्रे), भांडी बनविणे, कांस्य, चांदी व तांबे आदि धातूपासून विविध देवदेवतांच्या मूर्ती बनविणे तसेच सोन, चांदी, कास्य, ताबे तसेच इतर वेगवेगळ्या धातूंच्या मिश्रणापासून बनविलेल्या अनेक प्रकारच्या वस्तू, आणि इतर अनेक तत्सम वस्तू,

कापड उद्योग हा मध्ययुगीन भारतातील सर्वांत मोठा व लोकप्रिय उद्योग होता. तसेच हा उद्योग संपूर्ण देशभर पसरलेला होता. सूती कापड उद्योग हा कुटिरोद्योग व मोठा उद्योग म्हणून देखील प्रसिद्ध होता. बंगाल, गुजरात, ओरिसा आणि माळवा ही सूती कापड उद्योगाची प्रमुख केंद्रे होती. सुरत, कॅम्बे, पाटना, बुर्हानपूर, दिल्ली, आया, सोनारगांव, बनारस, देवगिरी, लाहोर, थट्टा आणि मुलतान ही काही शहरे व नगरे वेगवेगळ्या प्रकारच्या कापडासाठी प्रसिद्ध होती, सूती कापड एवढ्या अप्रतिम प्रतीचे असे की त्याला प्रदेशात मोठ्या प्रमाणात मागणी असे. याव्यतिरिक्त इतरही उत्तम प्रतीचे कापड विणले जाई मात्र ते कापड प्रामुख्याने राजघराण्यातील व कुलीन अमीर-उमराव घराण्यातील लोक वापरत असत. कपड्याचे उत्पादन व त्याची निर्यात याचा विचार केला असता बंगाल आणि गुजरातचे मुख्य स्थान होते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे या प्रदेशांमध्ये व आसपास मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेला कापूस, बंदरे असलेला समुद्र किनारा आणि पारंपारिकरित्या इतर देशांशी असलेले व्यापारी संबंध हे होय. गुजरातचे याबाबतीतले योगदान आपणास कॅम्बे बाबतची विधाने वाचून लक्षात येते. भारताच्या कपड्याच्या एकूण निर्यातीत कॅम्बेचा जवळपास पन्नास टक्के एवढे योगदान होते. येथे मोठ्या प्रमाणात कौशल्यपूर्ण कारागीर होते. त्याचप्रमाणे कॅम्बे येथील कपड्याला पश्चिम युरोप, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण आशियात फार मोठी बाजारपेठ होती.

याकाळातील प्रवासी भारतात विणल्या जाणाऱ्या कपड्यांच्या प्रकाराचे रसभरित वर्णन करत. अमिर खुसरो मलमलीच्या कपड्याला अप्रतिम पोत असलेले बंगालचे कापड असे संबोधतो. चीनी प्रवासी मा हुआन बंगालमधील विविध प्रकारच्या कपड्यांची माहिती देतो तसेच बंगालमध्ये तुतीची झाडे व रेशमाचे किडे होते अशीदेखील माहिती देतो. सूती कापड विणण्याच्या उद्योगावर, कपडा रंगविणे, कापसाच्या वा सूती कपड्यावर खळी किंवा नक्षीकाम करणे तसेच राजस्थानची विशेषता असलेले कड्यावरील बंधनी नामक नक्षीकाम इत्यादी उद्योग विसंबून होते.

अबूल फजल त्यांच्या ऐन-ए-अकबरी या ग्रंथात खानदेशातील सूती धाग्याविषयी माहिती देतो. अक्बराच्या काळात वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक कापडाने उत्पालन वाराणसी, आग्रा, माळवा आणि गुजरातसारख्या ठिकाणी होत असे. सूती कपड उद्योगाचे चार महत्त्वाचे पट्टे होते, हे पट्टे समुद्र किनाऱ्याजलळ होते व त्याची नावे पुढीलप्रमाणे आहेत- सिंधु नदीच्या खोद्यातील मैदानी प्रदेश, कॅम्बेचे आखात (खंबाटकचे आखात) ते दक्षिणेत दाभोळपर्यंतचा सागरी किनारा, कोरोमंडल समुद्र किनारा (भारताचा पूर्वेकडील समुद्र किनारा) आणि बंगाल.

कासिम बाजार, माल्डा, मुर्शिदाबाद, पाटना आणि बनारस ही रेशमाच्या उत्पादनाची प्रमुख केंद्रे होती. आश्वर्य म्हणजे गुजरातमध्ये रेशमाचे उत्पादन होत नसले तरी तेथे रेशीम विणण्याच्या (रेशमाचे कापड विणण्याच्या) उद्योगाचा उत्कर्ष झाला होता. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळापासूनच कॅम्बेच्या रेशमी कापडाला मोठ्या प्रमाणात मागणी होती. मुघलांच्या राजवटीत अहमदाबादच्या रेशमी कापडाचा नावलौकिक होता. रेशमी सूत (धागा) विणून त्यापासून कपडे बनविण्याचा उद्योग लाहोर, आग्रा आणि फतेहपूर सिक्री आदि ठिकाणी नावारूपास आला होता. रेशमी कापड प्रामुख्याने प्रसिद्ध अभिर-उमराव घराण्यातील सदस्य वापरत असत.

लोकरी कापडाचा उद्योग राजस्थान, लाहोर, काबूल, काश्मिर, आग्रा, फतेहपूर सिक्री, अमृतसर, पाटना, जौनपुर आणि बुरहानपूर अशा लहानशा भौगोलिक पड्यापूरता मर्यादित होता. काश्मिरमध्ये विविध प्रकारची कांबळी (घोंगडी), शाली आणि लोकरीचे इतर कपडे काश्मिरमध्ये बनवले जात. काश्मिरी शाली त्यांचा नरमपणा (मुलायमपणा)

व उबेसाठी प्रसिद्ध होती. या शाली लडाख व तिबेटमधून आणलेल्या लोकरीपासून बनवल्या जात. फतेहपूर सिक्री तेथील गालिच्यासाठी (सतरंजी) प्रसिद्ध होते. गालिचा विणण्याचा उद्योग आग्रा व लाहोर येथे उत्कर्षाला आला होता.

भारतात वेगवेगळ्या धातूपासून विविध वस्तू बनविण्याचा उद्योग प्राचिन काळापासूनच विकसित झाला होता. दिल्लीजवळील मेहरोलीचा स्तंभ, देशाच्या विविध भागांतील मंदीरामध्ये आढळणारे लोखंडी स्तभ आणि लोखंडी मूर्त्या प्रचिती देतात की, प्राचिन भारतात लोखंडी वस्तू बनविण्याचा उद्योग भरभराटीस आला होता. दिल्लीच्या सुलतानांच्या काळातदेखील पूर्वीप्रमाणेच हा उद्योग जोमाने सुरू होता. लोखंडाचा उपयोग बचावासाठी तसेच चढाई करण्यासाठी लागणारी तलवार, बंदुका, तोफा, ढाल आणि चिलखत अशी शस्त्राखे बनविण्यासाठी केला जाई. लोखंडाचा वापर घरे, राजवाडे आणि किल्ले बांधण्यासाठी, भांडी बनविण्यासाठी तसेच वेगवेगळ्या प्रकारची शेतीची व घरगुती वापराची अवजारे बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात असे. मूस (रसपात्र) व जहाज आणि बोटी बांधण्यासाठी वापरला जाणारा लोखंड हा प्रमुख धातू होता. लाहोर, मुलतान, मेवाड, गुजरात आणि गोलकोंडा हि लोखंडी व पोलादी वस्तू बनविण्याची मुख्य केंद्र होती. पितळ व तांब्यापासून वस्तू बनविण्याचादेखील मोठा उद्योग होता. या दोन धातूंचा वापर भांडी, निम्न वर्गातील लोकाचे दागिने, बंदुका आणि तोफा तसेच नाणी पाडण्यासाठी होत असे. बनारस पितळ व तांब्याच्या वस्तू बनविण्यासाठी प्रसिद्ध होते. तसेच दिल्ली व लखनौ देऊ पितळ व तांब्याच्या वस्तूसाठी सर्वज्ञात होते. श्रीमंत लोक प्रामुख्याने सोनं व चांदीपासून बनविलेले दागिने वापरत असत. कांस्य धातूपासून बनविलेले दागिनेदेखील वापरले जात. दागिन्यांना जडावाच्या कामाने सुद्धा सजवले जाई. बनारस, दिल्ली, गुजरात आणि आग्रा हि ठिकाणे तेथे बनणाऱ्या सुंदर जडावाच्या दागिन्यांसाठी प्रसिद्ध होती. हा उद्योग अकबर व शहा जॉन यांच्या काळात मोठ्या उंचीवर जाऊन पोहोचला होता.

अमिर खुसरो शमी वा सिरियन कागद बनविला जात असल्याचा संदर्भ देतो. हा कागद साधा व रेशमी या दोन प्रकारांमध्ये बनविला जात असे. बंगालला भेट देणारा मु हुआन हा चिनी प्रवासी झाडाच्या सालीपासून बनविल्या जाणाऱ्या तकतकीत कागदाचा उल्लेख करतो. निकोलो कोन्ती गुजरातमध्ये कागद वापरला जात असल्याचा उल्लेख करतो. मध्ययुगीन काळातील जी वेगवेगळी हस्तलिखित आपणास सापडली आहेत त्यावरून असे सिद्ध होते की, त्याकाळात कागद उद्योग अस्तित्वात होता. मुघलांच्या काळात कागद उद्योगात अजून जास्त प्रमाणात विकसित झाला. हा उद्योग सियालकोट, काश्मिर, दिल्ली, गया, अहमदाबाद, राजगिर, पाटना आणि इतर काही ठिकाणी हा उद्योग एकवटलेला होता. विशेष प्रतिचा कागद अलाहाबादजवळ शहजादपूर येथे बनविला जाई.

मुघल काळात जहाजबांधणी उद्योग चागल्या प्रकारे विकसित झाला होता. मोठ्या सागरी जहाजा पश्चिम तसेच पूर्व किनाऱ्यावर बांधल्या जात. सुरत है जहाजबांधणी उद्योगाचे एक प्रमुख केंद्र होते कारण येथील आसपासच्या परिसरात उत्तम प्रतिचे लाकूड उपलब्ध होते. मल्ला समाजाचे लोक ज्या बोटी वा होड्या चालवित त्या संपूर्ण देशभर बनविल्या जात. भारतीय जहाजबांधणी उद्योग एवढा विकसित झाला होता की, पोर्तुगीजांनी त्यांची काही उत्तम जहाजे भारतात बांधली होती. त्याकाळातील सर्वात वजनदार प्रवासी जहाजा या १००० ते १५०० एवढ्या टन वजनाच्या असत ज्यांचा वापर सोळाव्या आणि सतराव्या शतकात हजच्या यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या वाहतूकिसाठी वाढ रहदारीसाठी होत असे.

याकाळात चामडीच्या वस्तू बनविण्याचा उद्योगदेखील बऱ्याच प्रमाणात विकसित झाला होता. चामडीपासून बनणाऱ्या पुढील वस्तूंना मागणी असे खोगिर, तलवारीची म्यान, पुस्तकाचे आवरण, बुट व पाणी नेण्याची पखाल किया चामडी पिशवी. बंगालमध्ये साखर निर्यातीसाठी चामड्याचे गड्डे वापरले जात. गुजरातमध्ये सोन व चांदीचे नक्षीकाम केलेल्या सुंदर चटया बनविल्या जात ज्यांची प्रशंसा प्रसिद्ध इटालियन प्रवासी मार्को पोलो यानेदेखील केली होती.

मध्ययुगीन काळात इतरही अनेक किरकोळ उद्योग अस्तित्वात होते. सुतारकाम व मातीची भांडी बनविण्याव्यतिरिक्त शोभेच्या वस्तू बनविण्याचे अनेक उद्योग होते. मंगळाच्या आंब्याचे दागिने गुजरात आणि

बंगालमध्ये बनविले जात, हस्तीदताचे कोरिव काम, सोन्याचे नक्षीकाम आणि शोभेचे (नकली) दागिने हे उद्योग भारताच्या विविध भागांमध्ये चालत असत. सुगंधी द्रव्ये (अत्तर) व सुगंधी तेल, दगडी व लाकडी काम, चटया आणि टोपली (परडी) या वस्तू बनविणारे किरकोळ उद्योग मध्ययुगीन भारतात अनेक ठिकाणी विकसित झाले होते.

येथे एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे व तो हा की मध्ययुगीन काळात विविध प्रकारच्या वस्तू हस्तकलेचा उपयोग करून बनविल्या जात. वेगवेगळ्या वस्तू बनविण्यासाठी साध्यासुध्या अवजारांचा वापर केला जात असे. पशुधनाला बळाचे (शक्तीचे उर्जेचे) प्रमुख साधन म्हणून वापरले जात असे. मात्र, वाऱ्याचा व पाण्याचा वापर उर्जेची साधने म्हणून वापरात होती असा पुरावा सापडत नाही. जलशतीवर चालणाऱ्या जनित्राचा झोतयंत्रांचा वापर दळण गिरण्या चालविण्यासाठी केला जात असे. ग्रामीण भागातील विणकर, तेली, लोहार, सुतार आणि कुंभार हे कारागीर वस्तूविनिमयाध्या मोबदल्यात आपल्या सेवा इतर गावकऱ्यांना देत असत. शहर वा नगरातील कारागीर त्यांनी बनविलेल्या सहसा वस्तू पैशाच्या मोबदल्यात खुल्या बाजारात विकून टाकत असत. जहाजबांधणी, खाणकाम आणि किल्ल्याची, राजवाड्याची व पुलाचे निर्माण करताना मोठ्या प्रमाणात कुशल आणि अकुशल मजूरांचा वापर केला जात असे.

मुघलांच्या काळात व्यापार-उदीम चांगल्या प्रकारे विकसित झाला होता. जरी बाजारात विकल्या जाणाऱ्या अधिकांश शेती पेरलेल्या (कृषी) व शेतीत न पेरलेल्या (अकृषी) वस्तू अनेकदा स्थानिक पातळीवर खपल्या जात तरी शहरातील लोकांच्या गरजा प्रामुख्याने त्यांच्या आत्तपासच्या परिसरातील प्रदेशांतून भागवाव्या लागत. वस्तू सुसंघटित पद्धतीने विकल्या जात. विशिष्ट कालावधीने वा वारी भरणारे बाजारदेखील असत त्यांना 'पेठ' वा 'हाट' असे म्हणत. मोठ्या नगरांमध्ये व शहरांमध्ये महत्वाचा व्यापार बाजार वा मंडीतील नियमित दुकानातून चालत असे. सर्व प्रकारच्या पशुधनाची खरेदी व विक्री साधारणतः पशु वा गुराच्या बाजारात होत असे जो कधीकधी भरवला जात असे.

या काळात मोठ्या प्रमाणात देशांतर्गत व्यापार होत असे. बारबोझा, पेस, निकोलो कोन्ती आणि इतर अनेक परकिय व्यापारी भारताच्या अंतर्गत व्यापाराविषयी भरपूर माहिती देतात. त्याच्या भारतातील प्रवासादरम्यान इब्न बतूताने चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात मोठे बाजार व बाजारपेठा असलेले अनेक शहरे पाहिली होती. उत्कृष्ट रस्त्यांमुळे त्या काळात देशांतर्गत व्यापार भरभराटिस आला होता. मात्र मध्ययुगीन काळात रस्त्यांची कल्पना आजच्यापेक्षा वेगळी होती. अनेकदा रस्ते म्हणजे मळलेल्या वाटा (मातीच्या वाटा) असत व रस्त्याच्या दोन्ही बाजूला वा कडेला झाडे असत. या रस्त्यांचे सर्वात वैशिष्ट्य म्हणजे थोड्या थोड्या अंतरावर असलेल्या विहिरी व पाण्याचे हौद असलेल्या सराई हे होते. या सराई प्रवाशांना व प्राण्यांना प्रवासादरम्यान निवारा व पाणी पुरविण्याचे काम करत असत. दिल्ली ते दौलताबाद अशा चाळीस दिवसांच्या प्रवासासाठी एक रस्ता असल्याचे आपल्या निदर्शनास येते. हाच रस्ता पुढे तेलंगणा व मथुरा पर्यंत जात असे व पायाने चालत हे अंतर कापण्यासाठी जवळजवळ सहा महिने लागत असत.

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला गुजरातच्या अंतर्गत भागात असलेल्या लिम्बोदरा या ठिकाणाहून सार्दीच्या खड्याचे (लाल रंगाचे खड़े जे दागिने घडविण्यासाठी वापरले जातात) खड्याचे मणी युरोप व पूर्व आफ्रिकेला निर्यात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कॅम्बेच्या बंदरावर नेले जात. दाभोळ बंदरात आयात करून आणलेले तांबे देशाच्या अंतर्गत भागात नेले जात असे. गुजरातमधील राडेर हे बदर मलाक्का व चीनमधील वस्तूच्या व्यापारासाठीचे सर्वात मोठे केंद्र होते.

अनेक नगरामध्ये व शहरांमध्ये असलेल्या मोठमोठ्या व्यापारीपेता या व्यावसायिक तत्वावर चालणाऱ्या व्यापारासाठी व अंतर्गत व्यापारासाठी महत्वाच्या पूरक घटक होत्या. राजधानी दिल्ली आणि मुलतान, लाहोर, जौनपुर, अजमेर, अलाहाबाद, बनारस पुरीसारखी तीर्थक्षेत्रे त्याचप्रमाणे महामार्गावरील आग्रा, पाटना, अहमदाबाद बुरहानपूर आणि थट्टा ही शहरे तसेच भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे व्यापार-उदिमाची महत्वाची केंद्रे म्हणून भूमिका बजावत असत.

**मध्ययुगीन कालखंडातील समुद्र मार्गे चालणारा व्यापार**

निसर्गाच्या कृपेने प्रदीर्घ समुद्रकिनारा लाभलेला असल्याने भारताचा किनारी क्षेत्रातील व्यापार विकसित झाल्याचे निदर्शनास येते. कॅम्बे, दिव, सुरत, गोवा, कालिकत, कोचिन आणि विथलॉन ही भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील महत्वाची बंदरे होती. इब्न बतूता आणि बार्बोसा यांनी दिलेल्या विस्तृत माहितीनुसार आपणास असे कळते की, भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जहाजांना नांगर टाकण्यासाठी उत्तम सोय व समुद्राची पूरक खोली असणारे अनेक सागरी बंदरे होती. मलबारी व्यापाऱ्यांची गुजरात व मलबारच्या दरम्यान चालणाऱ्या व्यापारावर एकाधिकारशाही होती. दख्खनमधील बंदरांमधून चालणाऱ्या व्यापारात गुजराती तसेच मलबारी व्यापाऱ्यांचा सहभाग असे. कोरोमंडल म्हणजेच भारताच्या पूर्व सागरी किनाऱ्याचा विचार करता असे लक्षात येते की, भारताचा आग्नेय समुद्री किनरा व विजयनगरच्या साम्राज्याच्या व्यापारावर मोठ्या प्रमाणात मलबारमधील शहरातील हिंदू आणि मुस्लिम व्यापाऱ्यांचे वर्चस्व होते. मुस्लिम व्यापाऱ्याऱ्यांच्या जहाजा पुलिकत बंदरात मोठ्या संख्येने येत ती बर्मातील माणिक (दागिने बनविण्यासाठी वापरले जाणारे मौल्यवान लाल खडे) आणि कस्तुरीची मोठी बाजारपेठ होती.

मुघलांच्या काळात पुढील तीन प्रकारचा देशांतर्गत व्यापार चालत असेः देशातर्गत जमीनीवरील व्यापार, समुद्र किनारपट्टीलगतचा व्यापार आणि नदीच्या सहाय्याने चालणारा व्यापार. मात्र, व्यापारी अंतर्गत जमीनीवरील व्यापारापेक्षा किनारपट्टीवरील व्यापारास जास्त पसंती देत कारण हा व्यापार करण्यास फार सोपा, सुरक्षित तसेच सागरी व्यापार जमीनीवरील व्यापारापेक्षा जास्त नफा देणारा समजला जाई. समुद्र किनाऱ्यावरील व्यापारात समुद्री चाचांची भीती व त्यांच्याकडून लूट होण्याचा धोका असे. परंतु ही समस्या काही विशिष्ट क्षेत्रिपुरतीच मर्यादित होती. मुघलांच्या काळात नदीच्या सहाय्याने चालणारा व्यापार प्रामुख्याने पुढील चार नदी प्रणालींच्या परिसरात व मदतीने चालेः सिंधु नदी व तिच्या उपनद्या, गंगा नदी व तिच्या उपनद्या, तापी नदीचे खोरे (प्रणाली) आणि बंगालमधील त्रिभुज प्रदेश.

या नद्याच्या तीरावरील अनेक शहर व्यापारी केंद्र होती. एक विशिष्ट असा साहसी व पुरेसं भांडवल असणारा व्यापारीवर्ग अंतर्गत व्यापार मोठ्या प्रमाणावर नियंत्रित करत असे. जातीव्यवस्थेनुसार व्यापिरीवर्ग वैश्य जातीत मोडत असे. मुलतानी लोक व गुजराती बनिया हे दोन अनुक्रमे उत्तर व पश्चिम भारतातील प्रमुख व्यापारी समाज होते. जरी हिंदू व्यापाऱ्यांचे देशांतर्गत व्यापारावर वर्चस्व असले तरी खुरासाणी म्हणून ओळखले जाणारे परकिय व्यापारीदेखील संपूर्ण देशभर व्यापारात गुंतलेले आढळत.

नियमितपणे व्यापार करणाऱ्या समुदायाव्यतिरिक्त दलाल, मुनीम, शाहू आणि महाजन अशा वर्गातील लोकदेखील आपल्या उदरनिर्वाहासाठी व्यापारावर अवलंबून असत, दलाल विक्रेते तसेच ग्राहकाकडून दलाली घेत असत. ते सहसा वस्तूंच्या किंमती वाढविण्याचा प्रयत्न करत असत. शाहू आणि महाजन हे स्थानिक पातळीवरील सावकार होते. हे लोक हुंडीच्या बदल्यात कर्ज देत असत तसेच जास्त व्याजदरानेदेखील कर्ज देत असत.

तत्कालीन भारतीय तसेच परकिय प्रवाशांचे वृत्तांत अंतर्गत व्यापारासाठी विविध प्रकारची वाहतूकीची साधने वापरली जात असे संदर्भ देतात. सामान्यपणे वापरात असलेली

वाहतूकीची साधने पुढीलप्रमाणे होतीः मालाने या वस्तूंनी लादलेला बैल, बैलगाडी, घोडे, खेचर, उंट व हत्ती. किनारपट्टीलगतच्या व सागरी व्यापारासाठी मोठ्या, मध्यम तसेच लहान आकाराच्या जहाजा वापरल्या जात आणि वेगवेगळ्या आकाराच्या बोटी नदीतून चालणाऱ्या व्यापारासाठी वापरल्या जात. व्यापाऱ्याऱ्यांना देशांतर्गत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल घेऊन जात असताना संक्रमण वा परिवहन शुल्क द्यावे लागत असे. बंदरावर, सीमेवरील नगर वा शहरांमध्ये आणि मोठ्या व्यापारी केंद्रांवर वस्तू किंवा मालाच्या मूल्याच्या अडिच टक्के एवढी किंमत कर म्हणून द्यावी लागत असे. औरंगजेबाने हा कर वा शुल्क हिंदूकरिता पाच टक्के एवढा केला होता. यासोबतच

व्यापाऱ्यांना वेगवेगळ्या व्यापारी मार्गावर नियंत्रण असणाऱ्या स्थानिक अधिकाऱ्याऱ्यांनी लावलेले कर व जकात द्यावी लागत असे.

भारताने तांबडा समुद्र, पूर्व आफ्रिकेचा समुद्र किनारा, मलाया द्वीपसमूह, चौन आणि काही प्रशांत महासागरातील देश अशा पाच महत्वाच्या प्रदेशांतील व्यापारी संबंध राखले होते व विकसित केले होते. पर्शियाच्या आखाताचा मार्ग आणि तांबड्या समुद्राच्या मार्ग हे भारताला पश्चिमेशी जोडणारे प्रमुख दोन सागरी मार्ग (जलमार्ग) होते. पर्शियाच्या आखाताच्या मार्गाचा विचार केला असता इराकच्या बंदरांपर्यंत माल समुद्र मार्गाने आणून नंतर तो जमीनीच्या मार्गाने भूमध्यसागराच्या किनाऱ्यावरील बंदरांपर्यंत नेला जात असे. तांबड्या समुद्राचा विचार केला असता इजीप्त पर्यंत माल सागरी मार्गाने आणून तेथून पुढे तो जमिनीच्या मार्गावरून भूमध्यसागराच्या किनाऱ्यावरील बंदरांपर्यंत नेला जात असे. तद्वतर इटलीतील व्हेनिस या शहरातील व्यापारी व इतर इटालियन व्यापारी त्या मालाचे वितरण संपूर्ण पश्चिम युरोपात करत असत. पर्शियाच्या आखाताच्या मार्गावर ओरमूज ही भव्य व्यापारीपेठ होती तर तांबडा समुद्र मार्गावर एडन आणि जेद्दाह या दोन भव्य व्यापारीपेठा होत्या. इब्न बतूता नमूद करतो की, ओरनूज हे ठिकाण हिंद व सिंधमधील वस्तूच्या आयात-निर्यातीचे केंद्र होते. भारतातील कॅम्बे, ठाणा, क्विलॉन, मगळूरू, होन्नावर, कालिका आणि इतर बंदरांतून येणाऱ्या मोठ्या जहाजांसाठी एडन हे त्यांच्या मूळ बंदराव्यतिरिक्त थांब्याचे व आश्रय घेण्याचे बंदर होते. भारतातील मलबारमधून सागरीमार्गाने पूर्वेकडे व पश्चिमेकडे हिंदमहासागर मार्गाने मोठ्या प्रमाणात मालाची ने-आण केली जात असे

इब्न बतूता, बार्बोसा, बर्नियर यांच्यासारखे प्रवासी व अबूल फजल या काळात भारताचा जो सागरी व जमीनीच्या मार्गाने परकिय व्यापार चालायचा त्याविषयी सखोल माहिती देतात. बार्बोत्ता आपणास माहिती देतो की, भारताचा पूर्व आफ्रिकेशी व्यापार वाढण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे पूर्व आफ्रिकेच्या समुद्रकिनाऱ्यावर झिला, मोगादिशु, मोम्बासा आणि किलवा अशा ठिकाणी असलेल्या अरबांच्या वसाहती हे होय. चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात चीनी व्यापारी जहाजा मलबारमधील इली, कालिकत आणि विवलॉन या बंदरामध्ये नियमितपणे येत असत असे आढळते. पंधराव्या शतकात मलाक्का हे आम्नेय आशियातील आघाडीचे आंतरराष्ट्रीय बंदर म्हणून नावारूपाला आले होते. येथे पेगू, बंगाल, पुलिकत, कोरोमंडल (भारताचा पूर्वेकडील समुद्र किनारा), मलबार आणि गुजरात येथून व्यापारी जहाजे येत असत. त्यामुळे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही की, बार्बोसा मलाक्काचे वर्णन खूप मोठ्या संख्येने घाऊक व्यापारी असलेले आणि संपूर्ण जगात सर्वात जास्त प्रमाणात व्यापारी जहाजांच्या माध्यमातून व्यापार होणारे सर्वात श्रीमंत बंदर असे करतो.

भारत अन्नधान्य, कपडा, मसाले, तेलबिया, साखर, सुगंधी लाकूड, इत्यादी विविध प्रकारच्या वस्तूंची निर्यात करत असे. भारतीय कपडा व मसाले यांना प्रामुख्याने युरोपमधून मोठ्या प्रमाणात मागणी होती. मलमलाचे कापड पर्शिया, अस्वस्तान आणि इंजीतमध्ये निर्यात होत असे. प्रामुख्याने सुरत, बनारस, बंगाल आणि अहमदाबाद येथे तयार होणारे रेशमी कापड प्रामुख्याने युरोपमध्ये निर्यात केले जात. भारतीय मसाल्यांनादेखील युरोपमध्ये मागणी होती. काळ्या मिऱ्यांना खूपच मागणी होती. वेलची, आल (अद्रक), हळद हे मसाले आणि औषधी वनस्पती देखील निर्यात केल्या जात. डिक-लाख, मोती आणि हिरे सुद्धा निर्यात केले जात. प्रवाशांनी असे नमूद केले आहे की, अकबर व जहांगीर यांच्या कारकिर्दीत व्यापार-उदिम मोठ्या प्रमाणात विकसित झाला होता व चालना मिळाली होती.

भारत या काळात सोन, चांदी, पारा, शिसे हे धातू तसेच उत्तम प्रतिचे घोडे आयात करत असे. अर्थात, घोडा हा आयात केला जाणारा सर्वात महत्त्वाचा प्राणी होता कारण त्याला मध्ययुगीन काळातील राजघराण्यांमध्ये खूप मोठ्या मागणी होती. चिकणमाती आणि रेशमी कापड चीनमधून आयात केले जात असे. सोनं आणि चांदी परदेशांतून मोठ्या प्रमाणात आयात केले जात असे. फ्रेंच प्रवासी बर्नियर आपणास माहिती देतो की, भारत सुका मेवा तसेच ताजी फळे, पिवळसर-तपकिरी गेरू, खडबडीत माणिक, इत्यादी वस्तू मोठ्या प्रमाणात मध्य आशिया व अफगाणिस्तानातून आयात

करत असे. हिमालयातील देश व तिबेटमधून कस्तुरी, चीनी लाकूड, पाचू, उत्तम प्रतीची लोकर, सोन, तांबे, शिसे आणि याप्रकारच्या इतर वस्तू आयात केल्या जात

उपलब्ध वृत्तांत आणि परकिय प्रवाशांनी नोंदविलेल्या निरिक्षणांनूसार आपण असे म्हणू शकतो की, व्यापाराचा समतोल हा भारता अनुकूल होता. जरी, व्यापाराचे प्रमाण व उलाढाल दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात कमी असली तरी मुघल काळात व्यापारात वृद्धी झाल्याचे निदर्शनास येते. मुघल शासकांनी युरोपियन देशांसोबत व्यापार वाढविण्यावर भर दिला. त्याचप्रमाणे अनेक युरोपियन कपन्यांना भारताच्या किनाऱ्यावर वखारी उघडून व्यापार करण्याची अनुमती देण्यात आली.

सोळाव्या शतकात मुस्लिमांचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील वर्चस्वाला पोर्तुगीजानी गंभीर आव्हान दिले. त्यांचा व्यापारावरील अधिकार व एकाधिकारशाही याना अजून जास्त प्रमाणात डच आणि इंग्रजांनी दिले. यावरून असे लक्षात येते की, मुघल काळात मुस्लिम, पोर्तुगीज, डच आणि इंग्रज एकमेकांमध्ये सागरी व्यापारावरील नियंत्रणासाठी स्पर्धा करत होते.